स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**जिल्हाधिकारी रायगड**

# परिवर्तन

अंक तिसरा
ऑगस्ट २०२२
(कालावधी - मे २०२२ ते ऑगस्ट २०२२)




प्रतिपच्चं
द्रलेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते

# “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा”




## या अभियानात मोठ्या संख्येने नोंदणी करून सहभागी होण्याचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे आवाहन

### “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा” अभियानाच्या जनजागृतीसाठी जिल्ह्याचे संकेतस्थळ कार्यान्वित

देशात व जिल्ह्यात सर्वत्र दि.१३ ते दि.१५ ऑगस्ट दरम्यान “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा” अभियान सुरू होत आहे. हे अभियान प्रत्येक घर व व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच या अभियानात आबालवृध्द नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रचार प्रसिद्धी आणि जाणीव जागृती मोठ्या प्रमाणावर करणे आवश्यक आहे. लोकसहभागातून “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा” हे अभियान जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्याचे संकेतस्थळ https://www.harghartirangaraigad.in/ कार्यान्वित करण्यात आले आहे.

या अभियानात सहभागी होणाऱ्या नागरिकांना या संकेतस्थळाच्या माध्यमातून स्वत:ची नोंदणी, ध्वज विक्रेते/विक्रेत्यांची नोंदणी, मोहिमेसाठी ध्वज देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांची नोंदणी करता येणार आहे.

**अंक तिसरा :**
**प्रकाशन - १५ ऑगस्ट २०२२**
(कालावधी - मे २०२२ ते ऑगस्ट २०२२)

**संकल्पना व मार्गदर्शन**
**डॉ. महेंद्र कल्याणकर,** भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, रायगड

**विशेष सहकार्य**
**श्री. अमोल यादव**
अपर जिल्हाधिकारी, रायगड
**डॉ. पद्मश्री बैनाडे**
निवासी उपजिल्हाधिकारी
**श्री. सर्जेराव मस्के-पाटील**
उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)
**श्रीमती स्नेहा उबाळे**
उपजिल्हाधिकारी (निवडणूक)
**श्री. मधुकर बोडके**
जिल्हा पुरवठा अधिकारी
**श्री. शाम पोशट्टी**
जिल्हा प्रशासन अधिकारी
**श्री. विशाल दौंडकर**
तहसिलदार (सर्वसाधारण)
**श्री. सचिन शेजाळ**
तहसिलदार (महसूल)
**डॉ. सतिश कदम**
तहसिलदार (पुनर्वसन)
**श्री. ज्ञानदेव यादव**
तहसिलदार (संजय गांधी योजना)
**श्री. गोविंद वाकडे**
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी
**श्री. सागर पाठक**
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
**श्रीम. शशिकला अहिरराव**
प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्रकल्प, पेण

**संपादन**
**श्री. मनोज शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, रायगड

**माहितीस्रोत**
**उपविभागीय अधिकारी-**
**अलिबाग- प्रशांत ढगे**
**पेण - विठ्ठल इनामदार**
**पनवेल - राहुल मुंडके**
**कर्जत - अजित नैराळे**
**माणगाव - प्रशाली दिघावकर/उमेश बिरारी**
**श्रीवर्धन - अमित शेडगे**
**महाड- प्रतिमा पुदलवाड**
**आणि सर्व तहसिलदार, सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत, सर्व कार्यालय प्रमुख**

**माहिती संकलन व छायाचित्रे**
**श्री. विठ्ठल बेंदुगडे**
**श्री. जयंत ठाकूर**
**श्री. प्रसाद ठाकूर**
**जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**





मांडणी मुद्रण
**आग्रावकर्स डिझाईन ग्राफिक्स, अलिबाग**
निर्मिती
**जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड**

**केवळ अंतर्गत वितरणाकरिता...**

# मनोगत



प्रशासन म्हणून जनतेच्या जीवनात खरा बदल घडवून आणण्यासाठी अगदी शेवटच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्यासाठी रायगड जिल्हा प्रशासनातील सर्वांनी ''परिवर्तन'' घडवून आणण्याची ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ महिन्यात मनाशी खूणगाठ बांधली होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने कामकाजास उत्साहाने सुरुवात केली.

दुर्दैवाने मागील दोन वर्षात रायगड जिल्ह्याला विविध नैसर्गिक आपत्तीस सामोरे जावे लागले. कमी अधिक प्रमाणात मनुष्य व वित्तहानी झाली. मात्र खचून न जाता येथील जनतेने आपल्या आयुष्याची पुढील वाटचाल धैर्याने सुरू ठेवली. या वर्षात संभाव्य नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. आपत्ती व्यवस्थापनात कुठेही कमी पडणार नाही, यासाठी सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. शासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी साधन-साहित्य भरभरून उपलब्ध करून दिले. या काळात जिल्हा प्रशासन सर्वतोपरी सज्ज राहिले, सतर्क राहिले... नागरिकांच्या सुरक्षिततेकरिता... अगदी कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली तरीही...!

दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत ''हर घर तिरंगा'' अर्थात ''घरोघरी तिरंगा'' हे अभियान पूर्ण क्षमतेने आणि कल्पकतेने राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. संपूर्ण जिल्हा एकजुटीने ''स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'', ''हर घर जल उत्सव'', ''जलशक्ती मिशन'', ''स्वराज्य महोत्सव'' अभिमानाने, दिमाखात साजरा करण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहे.

या जिल्ह्यातील आदिवासी कातकरी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासनाकडून गेले वर्षभर ''कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्री कार्यक्रम'' नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे.

शासनाच्या ''स्वच्छ सागर, सुरक्षित सागर'' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आपल्या जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर स्वच्छता मोहीम अत्यंत जोमाने राबविण्यात येत आहे.

अशा प्रकारे जिल्हाधिकारी या नात्याने माझ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच विविध सामाजिक व खाजगी संस्थांच्या सहकार्याने मी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता अहोरात्र प्रयत्नशील आहे.


याचाच एक भाग म्हणून ''परिवर्तन'' चा हा तिसरा अंक आपल्या हाती देताना मनस्वी समाधान मिळत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने जिल्ह्यात विविध उपक्रम यशस्वीपणे राबविण्याचा जिल्हा प्रशासन प्रयत्न करीत आहे. जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा प्रशासन म्हणून करीत असलेल्या कामांना आपले सर्वांचे असेच सहकार्य लाभो, अशी अपेक्षा.

सर्वांच्या साथीने जिल्ह्याचा सर्वांगीण विकास नक्कीच घडून येईल,असा विश्वास मला वाटतो.

आपल्या सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार..!

**डॉ. महेंद्र कल्याणकर,** भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, रायगड

## “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा” अभियानाच्या जागृतीसाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत mahaamrut.org http://mahaamrut.org/ संकेतस्थळाची निर्मिती




देशात व राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दि.१३ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत मोठ्या दिमाखात साजरा करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. राज्यातही या उपक्रमांतर्गत अनेक कार्यक्रमांचे सर्वत्र आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाची प्रचार प्रसिद्धी व जाणीव जागृती करणे, झालेल्या कार्यक्रमांचा तपशिल अपलोड करणे, अभियानाविषयी अधिक माहिती देणे, यातून वातावरण निर्मिती करणे, याकरिता राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत mahaamrut.org http://mahaamrut.org/ या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.

या संकेतस्थळावर उपक्रमाबद्दलची माहिती, विविध विभागांमार्फत पार पडलेले कार्यक्रम, वेगवेगळ्या अभियानांची व आगामी कार्यक्रमांची माहिती, छायाचित्र दालन, चित्रफिती दालन, सर्वसाधारण सूचना या व अशा प्रकारच्या विविध सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

हे अभियान प्रत्येक घर व व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच या अभियानात आबालवृध्द नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रचार प्रसिद्धी आणि जाणीव जागृती मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग समन्वयक विभाग म्हणून काम करीत आहे.

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत mahaamrut.org http://mahaamrut.org/ या वेबसाईटवर डाउनलोड या सदराखाली उपलब्ध करून देण्यात आलेल्या जिंगल्स, गीते, पोस्टर्स, ध्वनीचित्रफिती, लघुचित्रपट, फ्लायर बॅनर डाऊनलोड करून त्याचा वापर प्रचार प्रसिद्धी व जाणीव जागृतीसाठी होवू शकतो.

नागरिकांनी आवश्यक तो मजकूर डाऊनलोड करण्यासाठी विविध संकेतस्थळांची निर्मिती करण्यात आली असून mahaamrut.org, http://mahaamrut.org, किंवा http://amritmahotsav.nic.in किंवा amritmahotsav.nic.in, या संकेतस्थळाला भेट द्यावी व या अभियानात मोठ्या संख्येने सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन सांस्कृतिक संचालनालयाकडून करण्यात आले आहे.

# “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा”

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात नागरिकांकरिता “तिरंगा” उपलब्ध







स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत दि.१३ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत देशभरात “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा” हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातही हे अभियान यशस्वीपणे राबविण्याकरिता जिल्हा प्रशासनाने नियोजन केले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तहसिल, नगरपालिका/नगरपंचायत, ग्रामपंचायत कार्यालयाच्या ठिकाणी नागरिकांकरिता तिरंगा उपलब्ध होण्यासाठी विक्री केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातही नागरिकांकरिता तिरंगा उपलब्ध करण्यात आला आहे. नागरिकांना प्रती ध्वज ३० रुपये याप्रमाणे तिरंगा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.







“घरोघरी तिरंगा” अभियानांतर्गत नागरिकांना तिरंगा उपलब्ध करून देण्यासाठी अलिबाग मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांच्या पुढाकारातून अलिबाग नगरपरिषदेतर्फे विक्री केंद्र चालू करण्यात आले.




“घरोघरी तिरंगा” अभियानांतर्गत नागरिकांना तिरंगा उपलब्ध करून देण्यासाठी तहसिलदार कविता जाधव यांच्या पुढाकारातून रोहा तहसील कार्यालयातर्फे विक्री केंद्र चालू करण्यात आले.




“घरोघरी तिरंगा” अभियानांतर्गत नागरिकांना तिरंगा उपलब्ध करून देण्यासाठी तहसिलदार आयुब तांबोळी यांच्या पुढाकारातून खालापूर तहसील कार्यालयाच्या आवारात विक्री केंद्र सुरु करण्यात आले आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# "हर घर तिरंगा" अर्थात "घरोघरी तिरंगा"




पनवेल तहसिलदार कार्यालय येथे तहसिलदार विजय तळेकर यांच्या पुढाकारातून नागरिकांसाठी ध्वज विक्री केंद्र सुरु




नागरिकांना तिरंगा उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्याधिकारी धीरज चव्हाण यांच्या पुढाकारातून रोहा अष्टमी नगरपरिषद येथे ध्वज विक्री केंद्र सुरु



खालापूर नगरपंचायत येथे मुख्याधिकारी रश्मी चव्हाण यांच्या पुढाकारातून ध्वज विक्री केंद्र सुरु.



तहसिल कार्यालय माणगाव येथे तहसिलदार प्रियांका आयरे यांच्या पुढाकारातून ध्वज विक्री केंद्र सुरु.









स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा परिषद शाळा गोळेगणी येथे ''मेंहदी घोषवाक्ये संदेश'' रेखाटन केले गेले. ''घरोघरी तिरंगा'' या उपक्रमाच्या जनजागृतीसाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व मुलामुलींच्या हातावर विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने मेहंदीने तिरंगा व घोषवाक्ये रेखाटले. घराघरात तिरंगा लावण्यासाठी जनजागृती करण्यासाठी माझा अभिमान तिरंगा, विजयी विश्व तिरंगा प्यारा, मेरी जान तिरंगा है, असे संदेश हातावर मेहंदीने लिहिण्यात आले.

# ''हर घर तिरंगा'' अर्थात ''घरोघरी तिरंगा''










रायगड पोलीस दलातर्फे आयोजित अमृत महोत्सवी दौडची रोहा तालुक्यातून सुरूवात झाली. या कार्यक्रमास पोलीस अधिकारी–कर्मचारी, विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी, शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थी व नागरिकांनी आपला सहभाग नोंदविला.









''घरोघरी तिरंगा'' अभियानांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, केंद्रीय संचार ब्युरो कार्यालय, नेहरु युवा केंद्र, प्रिझम सामाजिक विकास संस्था व रायगड जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे व रॅलीचे आयोजन करण्यात आले. या मिनी मॅरेथॉन स्पर्धेमध्ये जवळपास तीनशे युवक–युवती व विद्यार्थी सहभागी झाले होते. तर एकाच वेळी ७५ रॅलींचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, केंद्रीय संचार ब्युरो कार्यालयाचे सहाय्यक क्षेत्रीय प्रचार अधिकारी पी.फणीकुमार, नेहरु युवा केंद्राचे निशांत रौतेला, प्रिझम सामाजिक संस्थेच्या तपस्वी गोंधळी, सुचित्रा साळवी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# ''हर घर तिरंगा'' अर्थात ''घरोघरी तिरंगा''







''घरोघरी तिरंगा'' अभियानांतर्गत तहसील कार्यालय म्हसळा यांच्या वतीने जनजागृतीसाठी तहसिलदार समीर घारे यांच्या पुढाकारातून म्हसळा बस स्थानक येथून मोटार सायकल रॅली आयोजित करण्यात आली.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत ''घरोघरी तिरंगा'' अभियानाच्या जनजागृतीसाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे यांच्या पुढाकारातून पेण तहसील कार्यालय येथे प्रोजेक्टर लावून चित्रफितीच्या माध्यमातून माहिती देण्यात येत आहे.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत ''घरोघरी तिरंगा'' अभियानादरम्यान जागतिक आदिवासी दिन कार्यक्रमात तहसिलदार मीनल दळवी व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण च्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी उपस्थित आदिवासी बांधवांना तिरंगा ध्वज वितरित केले.

# ''हर घर तिरंगा'' अर्थात ''घरोघरी तिरंगा''

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ''तिरंगा यात्रा'' उत्साहात संपन्न देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमले अलिबाग..!




स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्ह्यात दि.१२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या पार्श्वभूमीवर दि.१३ ऑगस्ट २०२२ रोजी अलिबाग येथे ''तिरंगा यात्रा'' मोठ्या उत्साहात संपन्न झाली. संपूर्ण अलिबाग शहर या रॅलीतील देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमून गेले.






या तिरंगा यात्रेत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार विशाल दौंडकर, सचिन शेजाळ, ज्ञानदेव यादव, डॉ.सतिश कदम, अलिबाग तहसिलदार मिनल दळवी, मुरुड तहसिलदार रोहन शिंदे यांच्यासह इतर मान्यवर सहभागी झाले होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# “हर घर तिरंगा” अर्थात “घरोघरी तिरंगा”

## नाविन्यपूर्ण उपक्रम, योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशील

**–जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर**



अलिबाग येथील पोलीस कवायत मैदान येथे भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ७५ वा वर्धापनदिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वांच्या सहकार्याने येणाऱ्या काळात नाविन्यपूर्ण उपक्रम, योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगिण विकास साधण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव मस्के–पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे, अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा नियोजन अधिकारी श्री.जयसिंग मेहत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद गवई, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशेट्टी, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक किर्ती शेडगे, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोशन मेश्राम,उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) निलेश घुले, पोलीस उपअधीक्षक जगदीश काकडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसिलदार विशाल दौंडकर, श्रीमती मिनल दळवी, सचिन शेजाळ, डॉ.सतिश कदम, वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन गुंजकर, डॉ.शितल जोशी, प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख श्री.सचिन इंगळी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# ''हर घर तिरंगा'' अर्थात ''घरोघरी तिरंगा''

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ''घरोघरी तिरंगा'' उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये विजेत्या स्पर्धकांना व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रतिभावंत अधिकारी-कर्मचाऱ्यांना व व्यक्तींना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.













# "हर घर तिरंगा" अर्थात "घरोघरी तिरंगा"

## प्रसारमाध्यमांची उत्तम साथ ...

बित्तंबातमी

### थोडक्यात



## हर घर तिरंगा मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे आवाहन

अलिबाग : लोकसहभागातून हर घर तिरंगा मोहीम जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्हाचे संकेतस्थळ https://www.harghartirangaraigad.in/ कार्यान्वित करण्यात आले आहे.

हर घर तिरंगा मोहिमेत सहभागी होणाऱ्या नागरिकांना या संकेतस्थळाच्या माध्यमातून स्वत:ची नोंदणी, ध्वज विक्रेते/विक्रेत्यांची नोंदणी, मोहिमेसाठी ध्वज देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांची नोंदणी करता येणार आहे.तरी सर्व शासकीय अधिकारी-कर्मचारी, नागरिक, विक्रेते, ध्वज देणगीदार यांनी पोर्टलवर मोठ्या संख्येने नोंदणी करावी. जेणेकरून ध्वज खरेदी, वितरणाचे पुढील आवश्यक ते नियोजन जिल्हा प्रशासनास करता येईल, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

लोकमत

## 'हर घर तिरंगा' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी - कल्याणकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**अलिबाग :** ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. याबाबत शासनाच्यावतीने मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून, जिल्ह्यातील ग्रामीण भागात हर घर झेंडा अभियान प्रभावीपणे राबविण्यात यावे, शासकीय आस्थापना व नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वयंस्फूर्तीने लावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

२० जून २०२२ च्या शासन निर्णयानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक, क्रांतिकारक यांचे तसेच स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटनांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत राहावे व देशभक्तीची भावना जनमानसात कायम राहावी, या उद्देशाने देशात हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात येत आहे. ११ ते १७ ऑगस्ट या कालावधीमध्ये प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतीवर तर नागरिकांनी स्वत:च्या घरावर स्वयंस्फूर्तीने राष्ट्रध्वजाची उभारणी करावी. सर्वसामान्य नागरिकांशी निगडित यंत्रणांचा वापर करून सर्वांनी योग्य नियोजन करावे, असे शासन आदेशात नमूद आहे. नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वयंस्फूर्तीने लावायचा आहे. त्यासाठी मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील, अशी माहिती डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली.

Hallo Raigad

## खोपोली शहरात हर घर तिरंगा प्रसार फेरीच आयोजन



प्रतिनिधी

**खोपोली :** खोपोली नगरपरिषद यांचे वतीने स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमा निमिताने हर घर तिरंगा मोहिमेचा प्रचार प्रसार व्हावा या करीता खोपोली शहरात प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी खोपोली नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी अनुप दुरे यांचे सह खोपोली शहरातील लोकप्रतिनिधी विविध सामाजिक संस्था व शाळा महाविद्यालय विद्यार्थी शिक्षक व खोपोली नगरपरिषदेचे सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी व खोपोली शहरातील नागरिक सहभागी झाले होते.

## 'हर घर तिरंगा' जनजागृती रॅलीत सहा हजार विद्यार्थ्यांचा सहभाग



**खोपोली :** खोपोली नगर परिषदेच्या वतीने शासनाच्या 'हर घर तिरंगा' या उपक्रमाविषयी नागरिकांमध्ये प्रचार, प्रसार आणि जनजागृतीसाठी शहरात रॅलीचे आयोजन सोमवार, १ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता करण्यात आले. मराठी, इंग्रजी माध्यमांच्या सर्व शाळांमधील जवळपास ६ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच केएमसी महाविद्यालयातील एनएससी, एसीसीच्या विद्यार्थी या रॅलीत उपस्थित होते. या रॅलीत विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा, भारत माता की जय, अशा घोषणा दिल्या.

जनता विद्यालयाच्या पटांगणातून रॅलीचा प्रारंभ तहसीलदार अयुब तांबोळी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी, प्रशासक अनुप दुरे, पोलीस निरीक्षक शिरीष पवार, माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, माजी नगराध्यक्षा सुमन औसरमल यांच्यासह मोहन औसरमल, डॉ. सुनील पाटील, राजू गायकवाड, स.पो.नि. हरीश काळसेकर, माधवी रिठे, जिनी सॅम्युअल यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजी मंडई रस्ता, सोमजाईवाडी मार्गे खालची खोपोली, बाजारपेठ, जैन मंदिर रस्त्यावरून फिरून आल्यावर जनता विद्यालयाच्या समोर रॅलीचा समारोप करण्यात आला. नगरपालिकेच्या आवाहनाला साथ देत रॅलीत सहभागी झाल्याबद्दल अनुप दुरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. ही रॅली यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक जगदीश मरागजे, राजाराम कुंभार, संजय नेमाने, धनश्री गौडा-कोंडुस्कर तसेच खोपोली नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी, कामगारांनी विशेष मेहनत घेतली.

Smart Navi Mumbai Raigad

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवनिमित्त स्वातंत्र्याची दिंडी अभियानांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम

**प्रतिनिधी । अलिबाग**

भारतीय स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त केंद्र सरकारने घरोघरी तिरंगा अभियान जाहीर केले आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबत रायगड जिल्हा परिषद स्वातंत्र्याची दिंडी हा उपक्रम ९ ते १६ ऑगस्ट दरम्यान राबविणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती रुजविणे, वृक्षलागवड, स्वच्छता मोहिम राबविणे यासह इतर बाबींचा समावेश असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली.

संपूर्ण देशभरात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. केंद्र सरकारने घरोघरी तिरंगा हे अभियान जाहीर केले आहे. या अंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रत्येक घरावर तिरंगा फडकविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेमार्फत या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमातून

- ९ व १० ऑगस्ट - विद्यार्थ्यांची जनजागृती प्रभातफेरी
- ११ व १२ ऑगस्ट - विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, चित्रकला, रांगोळी स्पर्धा
- ११ ते १५ ऑगस्ट - बचतगट मेळावा
- १३ ऑगस्ट - प्लास्टिक संकलन व स्वच्छता मोहिम
- १३ ते १५ ऑगस्ट - घरोघरी झेंडा फडकवणे
- १४ ऑगस्ट - वृक्ष लागवड
- १५ ऑगस्ट - स्वातंत्र्य सैनिकांच्या पोस्टर्ससह विद्यार्थ्यांची प्रभातफेरी
- १६ ऑगस्ट - विद्यार्थ्यांना देशभक्तीपर चित्रपट दाखविणे

शिवणक्षेत्रात कार्यरत महिला बचत गटांना रोजगार मिळणार आहे. त्यांना झेंडे तयार करण्यास सांगण्यात आले असून, झेंडे विक्रीसाठी महिला महोत्सवात झेंडा विक्री स्टॉल तसेच ग्रामपंचायत स्तरावर सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे. या व्यतिरिक्त शाळांमध्ये झेंडा विक्री सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव निमित्त रायगड जिल्हा परिषद स्वातंत्र्याची दिंडी उपक्रम राबविणार आहे. या अंतर्गत घरोघरी झेंडा अभियानाबाबत जनजागृती करणे, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, बचतगट मेळावे, स्वच्छता मोहिम, वृक्षलागवड, प्रभात फेरी, विद्यार्थ्यांना देशभक्तीपर चित्रपट दाखविणे असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत

नवराष्ट्र

## 'हर घर तिरंगा'साठी तिरंग्याचे घरोघरी वाटप

### वाशी ग्राम पंचायतीचा स्तुत्य उपक्रम



**वडखळ, (वा.)** देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवानिमित्त भारत सरकार द्वारे हर घर तिरंगा ही संकल्पना १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या तीन दिवसात संपूर्ण देशात राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या या संकल्पनेमुळे आपल्या देशाची शान असणाऱ्या आपला राष्ट्रध्वज आपल्या घरासमोर फडकवण्याचे भाग्य आपल्याल मिळणार असल्याने आपल्या गावातील प्रत्येक घरासमोर हा तिरंगा फडकवा यासाठी ग्राम पंचायतीने घरोघरी देशाची शान आणि मान असणारा तिरंगा ध्वज वाटप करण्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. हा राष्ट्रध्वज ग्राम पंचायत कार्यालयात विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अभियानाचे अनावरण देखील ग्राम पंचायत कार्यालयात करण्यात आले आहे.

"माझ्या भारतीय बांधवांना एकच विनंती आहे की ज्याप्रमाणे आपण गुढीपाडव्याला गुढी आपल्या संस्कृतीचे प्रतिक म्हणून दारासमोर उभारतो, त्याचप्रमाणे घरोघरी आरास करून आपला राष्ट्रध्वज उभारूया, मात्र हे करत असताना आपल्या राष्ट्रध्वजाचा कोणताही अपमान होणार नाही याची काळजी घेऊन घराजवळ उभारलेला राष्ट्रध्वज १३ ऑगस्ट रोजी सकाळी सूर्योदयानंतर ध्वजारोहण करून १५ ऑगस्ट रोजी सूर्यास्तापूर्वी उतरवायचा आहे. आपण सर्वांनी भारत सरकारच्या या उपक्रमात सहभागी होऊया.

-गोरख पाटील, सरपंच, वाशी पेण

Raigad Plus Edition
05 August 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

# "हर घर तिरंगा" अर्थात "घरोघरी तिरंगा"

## प्रसारमाध्यमांची उत्तम साथ ...



अलिबाग : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शनिवारी जिल्हाधिकारी व सर्व शासकीय कार्यालयाच्या वतीने 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली होती. यावेळी हजारो नागरिक सहभागी झाले होते. (छायाचित्र : समीर मालेदे)

# घराघरांत फडकला तिरंगा

## उत्स्फूर्त प्रतिसाद; शासकीय, खासगी कार्यालयांत विविध उपक्रम

अलिबाग (बातमीदार) : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' अभियानाची जनजागृती जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून घराघरांत हे अभियान पोहचवण्यात आले आहे. शनिवारी 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी होत घराघरांत राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने सुमारे साडेआठ लाख घरांवर भारताचा

'हर घर तिरंगा' अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रभात फेरी, बाईक रॅली, मेळावे, दौड यासारखे उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने रॅलीमध्ये सहभाग घेत जनजागृती केली. शनिवारी सकाळपासून घरोघरी तिरंगा लावण्यास सुरुवात केली. याशिवाय दुकाने, सरकारी, खासगी कार्यालये, शाळा, हॉटेल अशा अनेक ठिकाणी तिरंगा फडकवण्यात आला. काही ठिकाणी तिरंगा फडकवताना राष्ट्रगीत गायले; तर काही ठिकाणी रांगोळी, फुलांची सजावट करण्यात आली होती. वातावरणात एक प्रकारचा उत्साह जाणवत होता. आबालवृद्ध अभियानात आवर्जून सहभागी झाले होते.

ग्रामीण भागात सुमारे पाच लाख २५ हजार, नगरपालिका व नगरपंचायतीत सुमारे एक लाख; तर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील घरांवर दोन लाख ४० हजार तिरंगा फडकवण्यात



अलिबाग : नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत घराघरांवर तिरंगा फडकवला.

विद्यालयात शुक्रवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शनिवार अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रभात फेरी काढण्यात आली. यात शालेय विद्यार्थ्यांसह शासकीय अधिकारी, कर्मचारी, वेगवेगळ्या संस्था, संघटनांचे पदाधिकारी, महिला बचत गटातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. रविवारी (ता. १४) सकाळी ७.३० वाजता अलिबाग येथील पोलिस अधीक्षक कार्यालयातून १० किलोमीटर अंतरापर्यंत दौड काढण्यात आहे. सागरगड येथे स्वच्छता अभिया[न] १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वा[जता] अलिबाग समुद्रकिनारी देशभक्तीपर गी[तांचा] कार्यक्रम होणार असल्याची माहिती अ[पर] जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी दि[ली].

# एकसंघ राष्ट्रासाठी रायगडात 'तिरंगोत्सव'

## 'भारत माता की जय'च्या घोषणांनी चढले स्फुरण

रायगड : सुयोग आंग्रे

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर 'घर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या जागृतीसाठी रायगड जिल्ह्यात तिरंगोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, शाळा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, पोलीस ठाणे, न्यायालये, शासकीय कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय आणि प्रत्येक घरावर देशाची शान असणारा तिरंगा झेंडा आज डौलाने फडकला. भारत माता कि जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान या घोषणांनी रायगड जिल्हा दुमदुमून गेला. देशभक्तीच्या घोषणांनी रायगडवासीयांना स्फुरण चढलेले पाहावयास मिळाले. रायगड जिल्ह्यात सुमारे साडेआठ लाख घरांवर भारताचा तिरंगा फडकवण्यात आला आहे. ग्रामीण भागात सुमारे पाच लाख २५ हजार, नगरपालिका व नगरपंचायतीत सुमारे एक लाख; तर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील घरांवर दोन लाख ४० हजार तिरंगा फडकवण्यात आला.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्ह्यात १२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी १३ ऑगस्ट २०२२ रोजी अलिबाग येथे तिरंगा यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या तिरंगा यात्रेत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार विशाल दौंडकर, सचिन शेजाळ, ज्ञानदेव यादव, डॉ.सतिश कदम, अलिबाग तहसिलदार मिनल दळवी, मुरुड तहसिलदार रोहन शिंदे यांच्यासह इतर मान्यवर सहभागी झाले होते.

या भव्य तिरंगा यात्रेची सुरुवात जिल्हाधिकारी कार्यालयापासून राष्ट्रगीताने करण्यात आली. ही तिरंगा यात्रा जिल्हाधिकारी कार्यालय-पोलीस अधीक्षक कार्यालय-मारुती नाका-बालाजी नाका-छत्रपती शिवाजी महाराज चौक-अलिबाग नगरपरिषद-डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा-महावीर चौक-जुनी नगरपालिका इमारत मार्गे ब्राह्मण आळी-कन्याशाळा-जिल्हा न्यायालय या मार्गाने मार्गस्थ होऊन हिराकोट तलाव येथे राष्ट्रगीताने यात्रेची सांगता करण्यात आली. या यात्रेदरम्यान क्रांती स्तंभ, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, सरखेल कान्होजी आंग्रे समाधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर असणाऱ्या हिराकोट तलावाच्या पाण्याचा रंग देखील तिरंगा झाला होता. शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस विद्यार्थी, शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हातातील तिरंगा झेंड्याचे प्रतिबिंब हिराकोट तलावामध्ये पाहायला मिळाले.

या तिरंगा यात्रेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, सहाय्यक प्रकल्प विकास अधिकारी अरुण पवार, कामगार उपायुक्त पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्सना शिंदे-पवार, महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितिन मंडलिक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) राजेंद्र भालेराव, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन गुंजकर, महाराष्ट्र राज्य अंग[णवाडी] कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनचे जिल्हा कार्यकारी रत्नशेखर गजभिये, आपत्ती व्यवस्थापन दल, जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ जिल्हाधिकारी कार्यालय आदी मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



### जिल्हाधिकारी कार्यालय ते जंजिरा किल्ला मोटारसायकल रॅली

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात १२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर १३ ऑगस्ट २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ते जंजिरा किल्ला मोटारसायकल रॅली संपन्न झाली.



> आपण सारे या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बलिदान दिलेल्या वीर हुतात्म्यांना अभिवादन करीत आहोत. आज या रॅलीत आपण जो उत्साह दाखविला त्याच उत्साहाने १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण करूया. हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत आपल्या घरावर तिरंगा फडकवावा. आपल्यामधील प्रत्येकाने किमान १० घरांवर झेंडा फडकविण्याचे आवाहन करावे व हे अभियान यशस्वी करावे.
>
> **डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी रायगड**

लोकमत



रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मुलांनी काढलेली प्रभात फ[ेरी]

# 'हर घर तिरंगा' मोहिमेत विद्यार्थ्यांकडून जनजागृ[ती]

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोर्ली-मांडला :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सोहळ्यानिमित्त भारत सरकारने 'हर घर तिरंगा' या मोहिमेची सुरुवात केली आहे. या जनजागृतीसाठी मुरुड तालुक्यातील मजगांव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील मुलांनी प्रभात फेरी काढली. यावेळी त्यांनमी घर तिरंगा मोहिमेसाठी जनजागृतीही केली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दि.१३ ते दि.१७ ऑगस्ट या कालावधीत नागरिकांना घरावर तिरंगा झेंडा फडकवता येणार असून नागरिकांना या मोहिमेत कसे सहभागी करता येईल, य[ासाठी] तहसीलदार कार्यालयात एक [ा] बैठक घेण्यात येऊन आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून तालुक्यातील मजगांव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी गावामध्ये प्रभात फेरी (रॅली) काढण्यात आली. यावेळी हर घर तिरंगा मोहिमेबाबत माहिती देत जनजागृती करण्यात आली. यामध्ये मजगांव ग्रामपंचायत सरपंच पवित्रा चोगले, ग्रामसेवक सुशांत ठाकुर, मुख्याध्यापक दिनेश म्हात्रे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# माणगाव पोलीस ठाण्यातर्फे स्वातंत्र्याची अमृतमहोत्सवी दौड उत्साहात

## नगराध्यक्षांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन



माणगाव : पुढारी वृत्तसेवा

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माणगाव पोलिस ठाण्यातर्फे सोमवार ८ ऑगस्ट रोजी स. ८.३० वा. माणगाव प्रांत कार्यालयासमोर आयोजित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याची अमृतमहोत्सवी दौड कार्यक्रम रा. जि. पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या सूचनेनुसार व तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, माणगाव पोलीस ठाण्याचे पो. नि. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन माणगावचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्याहस्ते करण्यात आले.

स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच ७५ वर्षांच्या गौरवशाली परंपरेला मांडत प्रत्येकाच्या मनात देशाभिमान जागृत करणे हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अभियानांतर्गत ... उपक्रम देशभर ... असून हे अभियान ... ते १५ ऑगस्ट दरम्यान यशस्वीपणे राबविण्यासाठी माणगावकर सज्ज झाले आहेत. माणगाव नगरपंचायत पाठोपाठ माणगाव पोलीस ठाण्यातर्फे याबाबतीत जनजागृती करण्यासाठी सोमवारी अमृत महोत्सवी दौड व प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फुलांच्या हारांनी जीपगाडी सजवून माणगाव प्रांत कार्यालय येथून अमृत महोत्सवी दौड व प्रभात फेरी उत्साहात काढण्यात आली. पुढे बसस्थानकाला वळसा घालून निजामपूर रोड मार्गे कालवा रोड ते पुन्हा प्रांतकार्यालय अशी काढण्यात आली. यामध्ये तळा पो. नि. ओमासे, गोरेगाव पो. नि. नावले यांच्यासह रायगड पोलीस दल, एन.सी.सी पथक गोरेगाव, रायगड पोलीस दलाचे बँड पथक, अशोकदादा साबळे विद्यालय माणगावचे विद्यार्थी, विद्यार्थीनी, छत्रपती करिअर अॅकॅडमी आर्मी व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण

लोकमत

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सोलीत निघाली स्वातंत्र्याची दिंडी

## ... जिल्ह्यात प्रारंभ, रॅलीला मोठ्या संख्येने नागरिकांचा प्रतिसाद

[लोक]मत न्यूज नेटवर्क

... भारतीय स्वातंत्र्याला १५ ... [रो]जी ७५ वर्षे पूर्ण होत [असल्याच्या] पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याचा [अमृत महोत्स]व साजरा करण्यात येत [असून त्यानि]मित्त रायगड जिल्हा ... जिल्ह्यात स्वातंत्र्याची ... राबविण्यात येत असून, [विवि]ध कार्यक्रम राबविण्यात ... [य]ा अभियानाचा प्रारंभ ... जिल्ह्यातील वरसोली ... करण्यात आला. [वरस]ोली जिल्हा परिषद ... एज्युकेशन सोसायटी [च्या] विद्यार्थ्यांसह, गावातील [मोठ्या सं]ख्येने सहभागी झाले ... [परिष]देचे सामान्य प्रशासन ... कार्यकारी अधिकारी ... उपस्थितीत रॅलीला ... [रा]बविण्यात आला.

### पर्यावरण संवर्धनाबाबत उपस्थितांना शपथ

रॅलीला वरसोली ग्रामपंचायत येथून सुरुवात होऊन वरसोली विठ्ठल-रखुमाई मंदिरात सांगता करण्यात आली. रॅलीत भारतमातेची दिंडी काढण्यासोबत विद्यार्थ्यांनी भारतमाता तसेच शिवाजी महाराजांची वेशभूषा केली होती. देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. पथनाट्याच्या माध्यमातून हर घर तिरंगा अभियानाबाबत जनजागृती करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाबाबत उपस्थितांना शपथ देण्यात आली.

> स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण करून देशातील नागरिकांमध्ये देशभावना जागृत करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्याची दिंडी उपक्रमातून करण्यात येत आहे. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान सर्वांनी घरोघरी तिरंगा फडकावून देशाभिमान जपावा. कोणत्याही प्रकारे ध्वजाचा अवमान होणार नाही, याची दक्षता घेऊन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करावा. तसेच अमृत महोत्सव निमित्त प्रत्येक नागरिकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे.
>
> **- नीलेश घुले,** जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन



...या दिंडीत सहभागी झालेले मान्यवर आणि नागरिक.

...डा अधिकारी ... केंद्र जिल्हा ..., अलिबाग ...र अधिकारी ...ोली सरपंच प्रमिला भाटकर, निवृत्त कॅप्टन उमेश वाणी, स्वातंत्र्यसैनिक अमरनाथ राणे, स्वातंत्र्यसैनिक दामोदर पडवळ, जयवंत गायकवाड, मिलिंद कवळे, तपस्वी गोंधळी आदी उपस्थित होते.

# शिळफाटा येथे 'हर घर तिरंगा' अभियानाची जनजागृती



खोपोली : पुढारी वृत्तसेवा

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान सर्वत्र राबविण्यात येणार आहे. याबाबत शासनाच्या वतीने मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असता सर्वत्र ठिकाणी मोठ्या जल्लोषात अमृत महोत्सव साजरा होत आहे, याच अनुषंगाने खोपोली शहरातील सह्याद्री विद्यालयाच्या वतीने ८ ऑगस्ट रोजी शिळफाटा परिसरात रॅली काढून 'हर घर तिरंगा' अभियानाची रॅली काढून जनजागृती करण्यात आल्याने देशभक्तीपर घोषणांनी शिळफाटा दणाणून गेला होता. तर या रॅली उद्घाटन खोपोलीचे माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना शहरप्रमुख डॉ.सुनील पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते.

याप्रसंगी शालेय कमिटी अध्यक्ष नरेंद्र शहा, माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना शहरप्रमुख डॉ. सुनील पाटील, मुख्याध्यापिका समिक्षा ढोके, दिलीप पोरवाल, भास्कर लांडगे, राजेंद्र फक्के, बाबू पुजारी, खेमंत टेलर, उचप्पा बरचाली, बाबू पुजारी, सुरेखा खेडकर, मेघा वाडकर, मोहन केदार, प्रसाद वाडकर, नंदु शेठ, आनंद नायडू, दिनेश राठोड, ओसवाल, फुड ऑफिसर देवानंद वीर, विश्वजीत शिंदे आदी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, शिळफाटा वासिय उपस्थित होते. यावेळी खोपोलीचे माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील म्हणाले की, शासन निर्णयानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र संग्रामातील क्रांतीकारक यांच्या आठवणी जनमानसात कायम राहावी उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत असताना खोपोलीतील शिळफाटा येथे सह्याद्री विद्यालयाच्या माध्यमातून रॅली काढून 'हर घर तिरंगा' या अभियानाची माहिती दिल्याने या रॅली शिळफाटा परिसरातील नागरिकांनी उत्फुर्त प्रतिसाद दिल्याने रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला, असे डॉ. सुनील पाटील यांनी व्यक्त केले.

### सह्याद्री विद्यालयाच्या वतीने रॅली

स्वातंत्र्याच्या महोत्सवानिमित 'हर घर झेंडा' अभियान जल्लोषात साजरा करण्यासाठी शिळफाटा येथील सह्याद्री विद्यालयाच्या वतीने जनजागृती रॅली काढून शिळफाटा परिसरात 'हर घर तिरंगा' अभियानाची जनजागृती केली.

# आपत्ती व्यवस्थापन

## आपत्ती काळात सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे

**-जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर**



जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकारातून आंतर जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समन्वय बैठक महाड येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आमदार भरत गोगावले व आमदार प्रवीण दरेकर तसेच अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, माणगाव प्रांताधिकारी प्रशाली जाधव-दिघावकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसिलदार सुरेश काशिद व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

गेली दोन वर्ष रायगड जिल्हा विविध नैसर्गिक आपत्तींना तोंड देत आहे. यावेळी जिल्हा प्रशासनाने येणाऱ्या आपत्तींचा सामना करण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी व नियोजन योग्य प्रकारे केले आहे. आता संकट आलेच तर हे संकट आपल्या घरावरील संकट आहे, असे समजून सर्व शासकीय विभागप्रमुखांनी प्रांताधिकारी व तहसिलदार यांच्या सूचनेनुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोड वर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित बैठकीत केल्या.



महाड आणि पोलादपूर तालुका व शेजारील रत्नागिरी, सातारा आणि पुणे जिल्हे यांच्यात आपापसात आपत्ती व्यवस्थापन समन्वय साधण्याच्या दृष्टीने ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्ह्यातील १६० कर्मचारी आपत्तीकाळात करावयाच्या कामांचे प्रशिक्षण ओरिसा येथून घेऊन आले आहेत, त्यापैकी ६० कर्मचारी महाड-पोलादपूर मधील असून त्यांनी इतर ४०० लोकांना प्रशिक्षित केले आहे. या प्रशिक्षित स्वयंसेवकांचा व त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा लाभ येणाऱ्या काळात होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी यावेळी व्यक्त केला.

संपूर्ण प्रशासन सेक्टरनिहाय मदतकार्यासाठी अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवकांची नेमणूक, महाड तालुक्यासाठी १४ सेफ हाऊस तर पोलादपूर तालुक्यासाठी ०५ सेफ हाऊसची निर्मिती, तातडीची व्यवस्था म्हणून फूड पॅकेट्स, ड्रायफ्रूट पॅकेट्स, प्रथमोपचार किट आदींची व्यवस्था, आरोग्य साधनांची व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन साधनांची व्यवस्था आदींसह कोणत्याही नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यास सज्ज आहे.

नागरिकांनी कोणत्याही आपत्तीत घाबरू नये, प्रशासन नागरिकांची काळजी घेण्यास, त्यांच्या सुरक्षिततेसाठी सदैव सतर्क आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपत्ती काळात जिल्हा प्रशासनाने जाहीर केलेल्या नियंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी नागरिकांना केले आहे.

# निसर्गाने मारले... मात्र शासनाने तारले...!

मागील वर्षी २०२१ मध्ये जुलै महिन्यातील २२ व २३ जुलै रोजी कोकणात झालेल्या अतिवृष्टीने सर्वच जण हवालदिल झाले होते. निसर्गाचा प्रकोप झाला की लहानमोठ्या सर्वांनाच त्या प्रलयाचा तडाखा बसतो.

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये हे गाव दरड कोसळून पूर्णतः नष्ट झाले. अतिवृष्टीमुळे मौजे तळीये येथील कोंडाळकरवाडी, बौद्धवाडी येथील ६६ घरांवर दरड कोसळून जीवितहानी झाली. या गावात राहात असलेली २७१ कुटुंबे एकाच दिवसात बेघर झाली, ८७ लोक मृत्युमुखी पडले आणि काही जखमी झाले. केवळ मनुष्यच नाही तर ५९ पशुधन आणि ११२ कोंबड्या हे देखील मृत्यूमुखी पडले.

शासनाने या नैसर्गिक आपत्ती आणि अतिवृष्टीने बाधित झालेल्या लोकांना मदतीचा हात दिला आणि गृहनिर्माण विभागांतर्गत म्हाडाने या लोकांचा निवारा परत उभारण्यासाठी कार्य सुरु केले. तर जिल्हाधिकारी कार्यालयाने तात्पुरत्या निवारा शेडसाठी पुढाकार घेवून काही खासगी कंपन्यांच्या मदतीने तळीये येथील आपद्ग्रस्त कुटुंबांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले.

## एकूण घरे, कुटुंब व लोकसंख्या:

कोंडाळकरवाडी व बौध्दवाडी येथील ६६ घरांमधे ३९९ लोक राहतात. मधलीवाडी येथील ४६ घरात २५७ लोक, खालचीवाडी येथील ८६ घरात ३७० लोक, शिंदेवाडी येथील ५२ घरात २९५, कुंभनेवाडी येथील ११ घरात ११ कुटुंबात ६२ लोक आणि चर्मकारवाडी येथील १० घरात ५७ लोक अशा प्रकारे २७१ घरातील २७१ कुटुंबांची लोकसंख्या १ हजार ३६० आहे.

## तात्पुरते पुनर्वसन:

मौजे तळीये येथील बाधित घरांचे तात्पुरते पुनर्वसन म्हणून या बाधितांना एकूण २६ कंटेनर होम मूलभूत सुविधांसह उपलब्ध करुन दिले आहेत.

## कायमस्वरुपी पुनर्वसन:

मौजे तळीये येथील थेट खरेदीने एकूण १५.२३.९९ हे.आर. भूसंपादन करण्यात आले असून २.१४.८४१ हे.आर. भूसंपादन सक्तीने करण्यात आले. असे एकूण १७.३८.८० हे.आर. जागेचे भूसंपादन करण्यात आले.

तळीये येथील एकूण २७१ घरांचे पुनर्वसन करायचे आहे. म्हाडाने येथील सर्व्हे केल्यानंतर एकूण २३१ घरांचा लेआऊट तयार करण्यात आला असून या ठिकाणी ४० घरांच्या पुनर्वसनासाठी कमी पडत असल्यामुळे एकूण ४.५७.१० हे.आर. अतिरिक्त जागा म्हाडा कार्यालयास सुचविण्यात आली. त्यांचा कुटुंब सर्व्हे पूर्ण झाला आहे.

मौजे तळीये येथील मूलभूत सोयीसुविधेचे कामकाज जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात येत आहे. तसेच मौजे तळीये येथील ६६ घरांचे पुनर्वसन म्हाडा कडून प्राधान्याने करण्यात येत आहे.

म्हाडाकडून घरांचे पुनर्वसन करण्यात येत आहे तर इतर सुविधा शासनाच्या इतर विभागाकडून पुरविण्यात येणार आहे. म्हाडातर्फे बांधून देण्यात येणारी घरे ही पक्की आणि कोणत्याही आपत्तीला तोंड देणारी असतील. या कामाला सुरुवात होत असून तळीयेवासियांचे लवकरच पुनर्वसन होणार आहे.



तळीये येथील दुर्देवी घटनेला दिनांक २२ जुलै २०२२ रोजी एक वर्ष पूर्ण झाले. यावेळी तत्कालीन पालकमंत्री कु.आदिती तटकरे, आमदार भरत गोगावले, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के–पाटील, महाड प्रातांधिकारी प्रतिमा पुदलवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसिलदार सुरेश काशिद, सरपंच श्री.संपत तांदळेकर, तळीये ग्रामस्थ, नातेवाईक या सर्वांनी तळीये येथील स्मृतीस्थळास भेट देवून पुष्प अर्पण करुन मृतात्म्यांना श्रध्दांजली वाहिली.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना सरपंच श्री.संपत तांदळेकर, ग्रामस्थ विजय पांडे यांनी शासनाने आतापर्यंत केलेल्या मदतीबद्दल आभार तसेच तळीयेवासियांच्या पुनर्वसन कामासाठी शासन व प्रशासनाकडून आतापर्यंत झालेल्या आणि पुढे होत असलेल्या कार्यवाहीबाबत समाधान व्यक्त केले.

# आपत्ती व्यवस्थापन

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी
## महाड येथे मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक संपन्न; परिसरात मोठ्या प्रमाणात केली बांबू व इतर वृक्षलागवड




गेली दोन वर्ष रायगड जिल्ह्याने अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड दिले आहे. या पार्श्वभूमीवर यावर्षीच्या मान्सूनमध्ये जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापनाची जय्यत तयारी केली. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये सज्ज राहून कोणतीही जीवितहानी व अन्य कोणतीही हानी होणार नाही, यासाठी दक्ष राहण्याचा जिल्हा प्रशासनाने निश्चय केला आहे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, नवी मुंबई परिमंडळ–२ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, इतर सर्व शासकीय विभागांचे विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख, विविध सामाजिक संस्थांची उत्कृष्ठ साथ मिळत आहे.



मान्सूनपूर्व तयारीचा आढावा तत्कालीन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के–पाटील, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांच्या समन्वयातून जिल्हा प्रशासनातील सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक महाडमध्ये संपन्न झाली. या बैठकीदरम्यान महाडमधील पूराच्या व दरडप्रवण क्षेत्राच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजना व सुरू असलेली तयारी यांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण यांच्या अहवालात दरडप्रवण क्षेत्रात भू:स्स्खलन आणि दरड पडण्याचा धोका कमी करण्याकरिता रायगड जिल्ह्यामध्ये बांबू लागवडीची मोहीम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली आहे. सन २०२२ मध्ये रायगड जिल्हा परिषदेद्वारे रायगड जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात बांबू लागवड मोहीम हाती घेण्यात आली आहे. तसेच शाळा कॉलेज व इतर शासकीय व अशासकीय संस्थांद्वारे तसेच सामाजिक वनीकरण विभागाद्वारे मोठ्या प्रमाणात बांबू लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

महाड व पोलादपूर तालुक्यातील तळीये, मधलीवाडी, ता.महाड – ५ हेक्टर, तळीये, तळीये, ता.महाड – ४ हेक्टर, मोरेवाडी, (शिंगरकोंड), ता.महाड – १० हेक्टर, चांडवे खुर्द ता.महाड – १० हेक्टर, साखर, चव्हाण वाडी, ता.पोलादपूर – ११ हेक्टर, साखर आदिवासी वाडी, ता.पोलादपूर – ५ हेक्टर, साखर, पेढे वाडी, ता.पोलादपूर – ५ हेक्टर या गावात प्राधान्याने बांबू लागवड करण्यात येणार आहे.

## जिल्ह्यातील तहसिल कार्यालयांमध्ये आपत्ती व्यवस्थापन व नियंत्रण कक्ष स्थापन




### नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या दुर्घटना तसेच अनुषंगिक माहितीसाठी संपर्क साधण्याचे जिल्हा प्रशासनाने केले आवाहन

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील तहसिल कार्यालयांमध्ये आपत्ती व्यवस्थापन व आपत्ती निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

या आपत्ती व्यवस्थापन कक्षांमध्ये तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या दुर्घटनांबाबत सूचना देण्याकरिता तसेच अनुषंगिक माहितीसाठी तहसिल कार्यालयांमधील दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांकाची माहिती सर्वत्र प्रकाशित करण्यात आली.

# आपत्ती व्यवस्थापन

## आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासनासोबत आम्ही आहोत सदैव सज्ज...!

| अ. क्र. | संस्थेचे नाव | पदाधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था | श्री. गुरुनाथ साठेलकर | ७७७४८१२२२२ |
| २. | यशवंती हायकर्स, खालापूर | श्री. पद्माकर गायकवाड<br>श्री. मच्छिंद्र यादव, | ९०२८३०३९६०<br>७७३८९३६६६६ |
| ३. | ॲडव्हेंचर वॉटर स्पोर्टस्, कोलाड ता. रोहा | श्री. महेश सानप | ९८६०४३८१४४<br>७०८३४४४२२२ |
| ४. | जल जीवरक्षक संस्था, पेण | श्री. दत्ता तरे | ८९८३८९५३०७ |
| ५. | सोशल ॲण्ड डिझास्टर मॅनेजमेंट अवेरनेस असो. | श्री. समाधान कडू<br>श्री. अनिकेत पाटील | ८१६९६८८०८०<br>७२०८५०७०३० |
| ६. | मोरया सामाजिक संस्था, उरण | श्री. हरेश्वर ठाकूर | ९६६४७५३७६९ |
| ७. | इंडियन मेडिकल असो., रायगड-अलिबाग | डॉ. सुधाकर बडगिरे | ०२१४१-२२७१०१<br>९४२२६९४२२२ |
| ८. | रोटरी क्लब, अलिबाग | डॉ. सुनिल भोपाळे<br>डॉ. किरण नाबर | ०२१४१-२२२२९५<br>९४२२६९२४५० |
| ९. | इंडियन मेडिकल असो., महाड | डॉ. चंद्रशेखर दाभाडकर | ०२१४५-२२२७२८<br>९४२२६९१७९१ |
| १०. | रायगडचा युवक फाऊंडेशन, अलिबाग | श्री. जयपाल पाटील | ९६७३७२७२७७ |
| ११. | हॅम रेडिओ हॉबी क्लब, पनवेल | श्री. सुरेश रिसबूड | ७७१८८३८३१८ |
| १२. | हॅम रेडिओ हॉबी क्लब, अलिबाग | श्री. दिलीप बापट | ९८६०९४६३९५<br>८२०८३६३११६ |
| १३. | लायन्स क्लब | श्री. अभिजीत पाटील | ९३२५५२००५७ |
| १४. | जनकल्याण संस्था, महाड | श्री. परांजपे<br>डॉ. माधव पवार | ०२१४५-२२२६०४<br>९४२२०९५१०८<br>९४२२६९१७४२ |
| १५. | प्राईड इंडिया, महाड | डॉ. व्ही.व्ही. कुलकर्णी | ९४२२३७१२८०<br>०२१४५-२२२४९२ |
| १६. | नितीन ॲण्ड कंपनी | श्री. नितीन ऐनापूरे | ८८८८१०५००९ |
| १७. | सह्याद्री ॲडव्हेंचर ट्रेकर्स ॲण्ड स्पोर्टस् असो., महाबळेश्वर | श्री. संजय पार्टे | ९४२१२०८७०२ |
| १८. | महाबळेश्वर ट्रेकर्स | श्री. सुनिल भाटीया | ९४२१४३०१९४ |
| १९. | यंग ब्लड ॲडव्हेंचर क्लब | डॉ. राजेंद्र पाटील | ८००७०७५५८० |
| २०. | व्हाईट आर्मी, कोल्हापूर | श्री. अशोक रोकडे | ८०८७०४०९९१ |
| २१. | दरेकर मित्रमंडळ, पोलादपूर | श्री. दर्पण दरेकर | ८०८७०४०९९१ |
| २२. | सिस्केप संस्था, महाड | श्री. सागर मेस्त्री | ९६५७८६४२९० |
| २३. | रक्षा सामाजिक संस्था, कर्जत | श्री. अमित गुरव | ९४२१००८७७८ |
| २४. | सह्याद्री रेस्क्यू फोर्स | श्री. सचिन देशमुख | ९२७२७१८००८ |
| २५. | मानाचा गणपती आपत्कालीन सेवा, दापोली | श्री. सचिन गायकवाड | ८८८८०६७१९६ |
| २६. | शिवदुर्ग संस्था, लोणावळा | श्री. हरपाल जाधव | ९६६५९००५२३ |

## दामिनी ॲप




वीज पडण्याचा इशारा देणारे, वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाच्या अचूक अंदाजाची पूर्वसूचना नागरिकांना मिळावी, याकरिता हे ॲप विकसित केले आहे.

दामिनी ॲपसाठी आयआयटीएमने लाइटनिंग लोकेशन नेटवर्क हे मॉडेल विकसित केले आहे.

### पावसाळ्यात हवामान विभागातर्फे दिले जाणारे रेड, ऑरेंज, येलो, ग्रीन अलर्ट म्हणजे नेमकं काय.. हे जाणून घेऊया.



जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग

रेड, ऑरेंज, येलो, ग्रीन अलर्ट म्हणजे नेमकं काय ?

| | |
|---|---|
| रेड अलर्ट | नैसर्गिक आपत्ती ओढावल्यानंतर नागरिकांनी सतर्क राहण्यासाठी हा अलर्ट जारी करण्यात येतो. यामध्ये लोकांनी स्वतःला आणि इतरांना सुरक्षित ठेवावे. |
| ऑरेंज अलर्ट | नैसर्गिक आपत्तीमुळे येणाऱ्या संकटासाठी नागरिकांनी तयार रहावे म्हणून प्रशासनाकडून हा अलर्ट जारी करण्यात येतो. |
| येलो अलर्ट | पुढील काही दिवसांमध्ये हवामानाच्या बदलामुळे संकट ओढवू शकते, त्यामुळे सावधगिरी बाळगण्यासाठी हा अलर्ट जारी करण्यात येतो. |
| ग्रीन अलर्ट | हवामान विभागाकडून अनेकदा हा अलर्ट जारी केला जातो. यांचा अर्थ संबंधित ठिकाणी कुठलाही धोका नाही. सर्व काही ठीक आहे. |

## रायगड जिल्हा आपत्कालीन विमोचन (Rescue) साहित्यांसह सज्ज












रायगड जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकारातून विविध आपत्कालीन विमोचन साहित्य तसेच राज्य शासनाकडून ७ आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून ४ असे एकूण ११ सॅटेलाईट फोन खरेदी करण्यात आले.

# आपत्ती व्यवस्थापन




जिल्ह्यातील मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या (एनडीआरएफ) दोन तुकड्या दाखल झाल्या आहेत. जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी या तुकडीचे प्रमुख बी.महेशकुमार व त्याच्या सहकारी जवानांची भेट घेऊन त्यांच्याशी बचाव व मदत कार्याच्या अनुषंगाने संवाद साधला.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी श्री. अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, महाड उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. निलेश तांबे, तहसिलदार श्री.सुरेश काशीद, महाड नगरपालिका मुख्याधिकारी श्री.महादेव रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री.सागर पाठक आदी उपस्थित होते.

एनडीआरएफच्या या दोन तुकडीत प्रत्येकी २५ असे मिळून एकूण ५० जवानांचा समावेश आहे. निरीक्षक बी.महेशकुमार आणि महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडमधील ही पथके महाड उपविभागात काम करतील.





रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात बावळे येथे पावसामुळे येथील परिसरात भेग पडल्याचे निदर्शनास आले होते. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री.हनुमंत संगनोर, वरिष्ठ भूवैज्ञानिक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी श्री.राजेश मेश्राम यांच्यासह प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद यांनी या गाव परिसराला भेट देऊन तेथील जमिनीला पडलेल्या भेगेची तातडीने पाहणी केली.

प्राथमिक पाहणी दरम्यान या भेगांमुळे कोणताही धोका संभवत नसून नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले असून या भेगेची दररोज दोन ते तीन वेळा पाहणी करून काही बदल असल्यास स्थानिक प्रशासनास त्वरित कळविण्याबाबत संबंधित सरपंच व गावकऱ्यांना सूचनाही देण्यात आल्या.

# आपत्ती व्यवस्थापन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव





महाड नगरपरिषद प्रशासकीय इमारतीत महाड तालुका आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाचे उद्घाटन प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या हस्ते व तहसिलदार सुरेश काशीद, मुख्याधिकारी महादेव रोडगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

अलिबाग तालुक्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, पोलिस अधिकारी यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन भवन येथे आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा शिबीर पार पडले.





या शिबिरात अलिबाग तहसिलदार मीनल दळवी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील, अनिकेत पाटील व ओडिसा येथे प्रशिक्षण घेऊन आलेले सहायक गटविकास अधिकारी कैलास चौलकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.







महाड उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत श्री.नितीन ऐनापुरे यांनी हॅम रेडिओ वापराबाबत प्रशिक्षण दिले. यावेळी महाड तहसिलदार सुरेश काशीद, पोलादपूर तहसिलदार दीप्ती देसाई, गटविकास अधिकारी श्री.पोळ, महाड गटविकास अधिकारी श्री.जगताप, पोलादपूर तालुक्यातील सर्व तलाठी, ग्रामसेवक, विविध रेस्क्यू टीम, हॅम रेडिओ वापराचे ज्ञान असलेले स्वयंसेवक उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सावित्री व काळ नदी पात्रातील गाळ उपसा

























# आपत्ती व्यवस्थापन





सावित्री नदी पात्रात आपत्ती व्यवस्थापनांतर्गत महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (एमएमए) यांच्या सहाय्याने आपत्ती व्यवस्थापनाचे मॉक ड्रिल घेण्यात आले. यावेळी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, एमएमए चे अध्यक्ष संभाजी पाठारे, कोलाड रेस्क्यू टीमचे महेश सानप व त्यांचे सहकारी, प्रिवी कंपनीचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.





मौजे करंजखोल येथे दरडग्रस्त भागांची अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी पाहणी केली. उपस्थित ग्रामस्थांशी त्यांनी दरडीच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा केली. यावेळी महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, महाड तहसिलदार सुरेश काशीद, सरपंच श्री.उतेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.






पोलादपूर तालुक्यातील केवनाळे आणि महाड तालुक्यातील तळीये या दरडग्रस्त भागातील वस्तुस्थिती व आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन याबाबत अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला. यावेळी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश तांबे, एमएमए चे अध्यक्ष संभाजी पाठारे, कोलाड रेस्क्यू टीमचे महेश सानप व त्यांचे सहकारी, प्रिवी कंपनीचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन

## जिल्हा प्रशासनाची तत्परता..आपत्ती व्यवस्थापनाच्या जय्यत तयारीची फलश्रुती भर समुद्रात अडकलेल्या खलाशांची हेलिकॉप्टरच्या सहाय्याने केली सुटका





मुरुड तालुक्यातील पद्मदुर्ग किल्ल्याच्या मागील बाजूस गुजरातचे जहाज समुद्रात अडकले होते. त्यावर १० कर्मचारी होते. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार रोहन शिंदे, भारतीय तटरक्षक दल आणि पोलीस विभागाच्या समन्वयातून या सर्व कर्मचाऱ्यांना वाचविण्यात यश आले.

## अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांना मिळाले आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण





अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील अधिकारी–कर्मचारी, शिकावू परिचारिका यांच्यासाठी आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षाविषयक शिबीर अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद गवई, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन गुंजकर, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक जयपाल पाटील हे व्यासपीठावर उपस्थित होते.

## प्रशासनाची आण-बाण-शान.. तत्परतेने वाचविले सहा जणांचे प्राण..



अलिबाग तालुक्यातील ६ आदिवासी तरुण मौजे पळस, ता.रोहा येथे पाण्यात अडकले होते. तहसिलदार कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बचाव पथकांनी त्यांना सुखरूप बाहेर काढण्यास स्थानिक प्रशासनास यश मिळाले.





हे ६ युवक उंदीर व खेकडे पकडण्यासाठी अंबा नदीच्या पलीकडे गेले होते. मात्र भरतीमुळे पाण्याची पातळी अचानक वाढली आणि हे युवक पाण्याने वेढले गेले. याबाबतची माहिती मिळताच रोहा प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, तहसिलदार कविता जाधव, पोलीस निरीक्षक श्री.नारनवर, त्यांचे कार्यालयीन सहकारी आणि महेश सानप यांच्या रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी या सहा युवकांची सहीसलामत सुटका करण्यासाठी तात्काळ उपाययोजना अंमलात आणल्या आणि त्यांना वाचविण्यात यश मिळाले.

# आपत्ती व्यवस्थापन

महाड येथे बी.महेश कुमार यांच्या पथकाने सोसायटी ऑफ इको-एन्डेंजर्ड स्पीसीज कन्झरव्हेशन ॲण्ड प्रोटेक्शन, महाड (SEESCAP) व नगरपालिका बचाव पथकाकरिता बोटींची हाताळणी आणि OBM देखभालीचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षण सत्राचा ३८ बचावकर्त्यांना लाभ मिळाला.





## आपत्कालीन परिस्थितीत मदतकार्य करणारे स्वयंसेवक व शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांचे तिसरे पथक आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाकरिता ओरिसाला रवाना




जिल्ह्यामधील आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदत करणाऱ्या सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक व शासकीय अधिकारी-कर्मचारी यांचे ६० जणांचे तिसरे पथक मधुसूदन दास अकॅडमी ऑफ फायनान्शियल मॅनेजमेंट, भुवनेश्वर, ओरिसा येथे प्रशिक्षणाकरिता रवाना झाले.जिल्ह्यातील नैसर्गिक व भौगोलिक परिस्थिती पाहता या प्रशिक्षणाचे महत्त्व जाणून भुवनेश्वर येथील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाकरिता जिल्ह्यातील स्वयंसेवक व शासकीय अधिकारी कर्मचारी पाठवावेत, असा महत्वाचा निर्णय जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी घेतला.यापूर्वी स्वयंसेवक, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या ५०-५० च्या एकूण दोन बॅचचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून आता ही तिसरी बॅच पाठविण्यात आली आहे.

# आपत्ती व्यवस्थापन

## आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ॲम्ब्युलन्स स्टेशन सुरु करण्याचा जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचा अभिनव उपक्रम

अतिवृष्टी होवून पूरपरिस्थिती, दरड कोसळणे अशा प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास येथील नागरिकांना दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधून आरोग्य सेवेचा लाभ मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून उपजिल्हा रुग्णालय माणगाव, कर्जत व ग्रामीण रुग्णालय महाड, पोलादपूर येथे ॲम्ब्युलन्स स्टेशन कार्यान्वित करण्यात आले.

**उपजिल्हा रुग्णालय माणगाव:** रुग्णवाहिका क्रमांक– एमएच–१४ जेएल ३६६४, रुग्णवाहिका–१०८, वैद्यकीय अधिकारी, डॉ.सय्यद अफजान उल्हा हसेनी, भ्रमणध्वनी क्रमांक– ७२७६१११५९८, वाहन चालक श्री.गजानन दळवी, भ्रमणध्वनी क्रमांक– ८८०६९१७२०९, रुग्णवाहिका क्रमांक– एमएच ०६ बीडब्ल्यू ५३९५, रुग्णवाहिका–१०२, वाहन चालक श्री.अशोक महाडीक, भ्रमणध्वनी क्रमांक– ९१५८९७९७६२.

**उपजिल्हा रुग्णालय कर्जत:** रुग्णवाहिका क्रमांक– एमएच–१४ सीएल ०५८८, रुग्णवाहिका– १०८, वैद्यकीय अधिकारी, डॉ.बाहीद शेख, भ्रमणध्वनी क्रमांक– ७८००९०४०५२, वाहन चालक श्री.प्रकाश देखमुख, भ्रमणध्वनी क्रमांक– ८०८०९६२२५०, रुग्णवाहिका क्रमांक– एमएच ०६ जी ००३९, रुग्णवाहिका– १०२, वाहन चालक श्री.विश्वास नागावकर, भ्रमणध्वनी क्रमांक– ७३५०७१७६४८.


**ग्रामीण रुग्णालय महाड:** रुग्णवाहिका क्रमांक– एमएच–१४ जेएल ३६७९, रुग्णवाहिका– १०८, वैद्यकीय अधिकारी, डॉ.अमनउल्हा पारकर, भ्रमणध्वनी क्रमांक– ८७९३४२५९९२, वाहन चालक श्री.संदिप जाधव, भ्रमणध्वनी क्रमांक– ९८५०६६९९६९, रुग्णवाहिका क्रमांक– एमएच ०६ बीडब्ल्यू ५८१७, रुग्णवाहिका– १०२, वाहन चालक श्री.योगेश नातेकर, भ्रमणध्वनी क्रमांक– ७७९८०२६६७६.

**ग्रामीण रुग्णालय पोलादपूर:** रुग्णवाहिका क्रमांक– एमएच–१४ जेएल ३६६५, रुग्णवाहिका– १०८, वैद्यकीय अधिकारी, डॉ.अदिनाथ नागरे, भ्रमणध्वनी क्रमांक– ९३२२०१०२१९, वाहन चालक श्री.मोतीराम निकम, भ्रमणध्वनी क्रमांक– ९३०७७२८४५५, रुग्णवाहिका क्रमांक– एमएच ०६ बीडब्ल्यू ४४८९, रुग्णवाहिका–१०२, वाहन चालक श्री.सचिन निकम, भ्रमणध्वनी क्रमांक– ७०२००१३७६७.




## नागरिकांची सुरक्षितता अन् उत्तम आरोग्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य यंत्रणा पूर्णतः सज्ज जिल्हा आपत्ती व्यवस्थापन व साथरोग नियंत्रण बैठक दूरदृष्यप्रणालीद्वारे संपन्न



जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाबाबत सध्याच्या परिस्थितीचा आढावा, पिण्याचे पाणी शुद्धीकरण, साथरोग आटोक्यात आणणे, आपत्कालीन घटनांना तात्काळ प्रतिसाद देणे, घटनेचा अहवाल वेळीच वरिष्ठ कार्यालयास सादर करणे इत्यादी विषयांबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, आदी उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन

## प्रसारमाध्यमांची उत्तम साथ ...

# नागरिकांची सुरक्षितता अन् उत्तम आरोग्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य यंत्रणा पूर्णत: सज्ज


### जिल्हा आपत्ती व्यवस्थापन व साथरोग नियंत्रण बैठक दूरदृष्यप्रणालीद्वारे संपन्न

अशोक गायकवाड

अलिबाग : जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाबाबत सध्याच्या परिस्थितीचा आढावा, पिण्याचे पाणी शुद्धीकरण, साथरोग आटोक्यात आणणे, आपत्कालीन घटनांना तात्काळ प्रतिसाद देणे, घटनेचा अहवाल वेळीच वरिष्ठ कार्यालयास सादर करणे इत्यादी विषयांबाबत आज, दि.१४ जुलै २०२२ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, प्रांताधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी निवारा शेड मध्ये स्थलांतरीत झालेल्या नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, येणाऱ्या कालावधीमध्ये मनुष्यबळ, मशिनरी उपलब्ध करणे, पावसाळ्याचे पाणी साठून उद्भवणाऱ्या साथरोग नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करणे, हिवताप, डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस इत्यादी साथरोग नियंत्रणासाठी औषधसाठा उपलब्ध करणे, वैद्यकीय पथके नेमणे, अन्न व औषध प्रशासनामार्फत खाद्यपदार्थ विक्रेते, हॉटेल, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी तपासणी करणे,जेणेकरुन पावसाळ्यामध्ये अन्नपदार्थांची भेसळ होवून अनावश्यक साथरोग व विषबाधा होणार नाही, अशा विविध विषयांबाबत सविस्तर आढावा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी घेतला.



यावेळी त्या म्हणाल्या की, जून ते सप्टेंबर या कालावधीत पाण्याची जैविक तपासणी करणे गरजेचे असून पाण्याची जैविक तपासणी साथरोगाला आळा बसण्याच्या (जसे काविळ, अतिसार, कॉलरा इ.) दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. तरी नागरिकांनी व संबंधित अधिकाऱ्यांनीही प्रयोगशाळेतून पाण्याची गुणवत्ता तपासून घ्यावी.

तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी क्षेत्रीय स्तरावरील सर्व वैद्यकीय अधिकारी व रुग्णवाहिका रुग्णालयांमध्ये उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी, असेही निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.बैनाडे यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांची सुरक्षितता व उत्तम आरोग्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य यंत्रणा पूर्णत: सज्ज आहे. जे अधिकारी-कर्मचारी आपापल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र काम करीत आहेत, त्यांच्यासोबत जिल्हा प्रशासन सदैव आहे, असा विश्वास निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.बैनाडे यांनी या बैठकीत सर्व उपस्थितांना दिला.

रायगड जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या कार्यालयाच्या अंतर्गत ०६ पाणी तपासणी प्रयोगशाळा (०१ जिल्हा व ०५ उपविभागीय प्रयोगशाळा) कार्यरत आहेत. जिल्हा प्रयोगशाळा अलिबाग तालुक्यात व पेण, महाड, माणगाव, कर्जत, रोहा तालुक्यात अशा एकूण ०५ उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत. तसेच आरोग्य विभागांतर्गत ०१ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा अलिबाग तालुक्यात कार्यरत आहेत. या प्रयोगशाळांमार्फत सार्वजनिक तसेच खाजगी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची जैविक व रासायनिक तपासणी करुन पाण्याची गुणवत्ता तपासली जाते. या प्रयोगशाळांचे संनियंत्रण उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग, रायगड जिल्हा परिषद यांच्यामार्फत केले जाते.

अतिवृष्टीमुळे तसेच पूरसदृश्य परिस्थितीमुळे पिण्याचे पाणी दूषित होण्याची दाट संभावना असते. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयोगशाळेतून पाण्याची गुणवत्ता तपासून घ्यावी, असे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचित केले असल्याचेही श्रीम. डॉ.बैनाडे यांनी सांगितले.

---

लोकमत

### जिल्हाधिकाऱ्यांनी साधला पथकाशी संवाद

# एनडीआरएफचे जवान ॲक्शन मोडमध्ये...

लोकमत न्यूज नेटवर्क

अलिबाग : जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या (एनडीआरएफ) दोन तुकड्या महाड येथे दाखल झाल्या आहेत. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या तुकडीचे प्रमुख बी. महेशकुमार व त्यांच्या सहकारी जवानांची भेट घेऊन त्यांच्याशी बचाव व मदत कार्याच्या अनुषंगाने संवाद साधला. आपत्तीच्या दृष्टीने जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

एनडीआरएफच्या दोन तुकड्या असून प्रत्येकी २५ असे मिळून एकूण ५० जवानांचा समावेश आहे. निरीक्षक बी. महेश कुमार आणि महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडमधील ही पथके महाड उपविभागात काम करत आहेत. जिल्ह्यात गेली दोन वर्षे नैसर्गिक आपत्तीचे संकट येत असल्याने जिल्हा प्रशासनाने यावर्षी आधीच खबरदारी घेतली आहे. सर्व यंत्रणा ह्या आपत्तीला तोंड देण्यासाठी सज्ज करून ठेवल्या आहेत.



महाड शहरात दाखल झालेले एनडीआरएफचे पथक

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसीलदार सुरेश काशीद, महाड नगरपालिका मुख्याधिकारी महादेव रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक आदी उपस्थित होते.

आपत्कालीन परिस्थितीत एनडीआरएफचे जवान व जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक बचाव व मदत कार्य उत्तम प्रकारे करतील, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर, एनडीआरएफ पथकाचे निरीक्षक बी. महेश कुमार, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी व्यक्त केला आहे.

Hello Raigad
Page No. 1 Jul 07, 2022
Powered by: erelego.com

---

# रायगडमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी सॅटेलाईट फोन आणि हॅम रेडिओची मदत

हर्षद कशाळकर, लोकसत्ता

अलिबाग : निसर्ग, तोक्ते चक्रीवादळे आणि मागील वर्षीचा महापूर लक्षात घेऊन आपत्तीकाळात संपर्क यंत्रणा प्रस्थापित ठेवण्यासाठी सॅटेलाइट फोन आणि हॅम रेडिओची मदत घेतली जाणार आहे. यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने राज्य सरकारकडे २४ सॅटेलाइट फोन्स उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. यापैकी सध्या एक सॅटेलाइट फोन उपलब्ध करून देण्यात आला आहे.

गेल्या तीन वर्षांत रायगड जिल्ह्याला दोन चक्रीवादळे आणि महापुराचा सामना करावा लागला. या आपत्तीच्या काळात संपर्क यंत्रणा कोलमडल्याचे दिसून आले. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन करणे कठीण होऊन बसले होते. हे अनुभव लक्षात घेऊन आता रायगड जिल्हा प्रशासनाने राज्य सरकारकडे सॅटेलाइट फोन्स उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. जेणेकरून प्रतिकूल परिस्थितीत जिल्हा प्रशासनाशी संपर्क प्रस्थापित करणे शक्य होणार आहे.



जिल्हा प्रशासनाने २४ सॅटेलाइट फोन उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. यापैकी एक सॅटेलाइट फोन तातडीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. आणखी चार लवकरच उपलब्ध होणार आहेत. तर १४ सॅटेलाइट फोन टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यामुळे पूर, भूस्खलन, चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या संपर्क ... मदत ...



निसर्ग वादळानंतर आणि महाड येथील महापुरानंतर संपर्क यंत्रणा कोलमडल्या होत्या. हा अनुभव लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आपत्ती व्यवस्थापनासाठी २४ सॅटेलाईट फोन उपलब्ध व्हावे यासाठी मागणी केली आहे. यातील एक युनिट उपलब्ध झाले असून उर्वरित सॅटेलाईट फोन्स टप्प्याटप्प्याने उपलब्ध होतील.
- डॉ. पद्मश्री बैनाडे, निवासी उपजिल्हाधिकारी

या शिवाय महाड पोलादपूर परिसरासाठी ५४ वायरलेस युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहे. किल्ले रायगड आणि माथेरान अशा दोन ठिकाणी वायरलेस रीपिटर सेंटर्स कार्यान्वित करण्यात आले आहेत. याशिवाय हॅम रेडिओचीही मदत घेतली जाणार आहे. याशिवाय पूरप्रवण क्षेत्रातील मोबाइल टॉवर्स ... आहेत. या मोबाइल टॉवर्सला २४ तास जनरेटर सुविधा तैनात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सॅटेलाइट फोनला सॅट फोन असेही म्हणतात. त्यामुळे ज्या ठिकाणी कुठलीच संपर्क यंत्रणा काम करत नाही त्या ठिकाणी हा फोन कार्य... आवश्यक असते. अतिवृष्टीमुळे फायबर केबल नेटवर्क यंत्रणा आणि वायरलेस यंत्रणा कोलमडल्यास सॅटेलाइट फोन सुविधा उपयुक्त ठरू शकते. रत्नागिरी जिल्ह्याने यापूर्वी आपत्ती व्यवस्थापनासाठी दोन वेळा सॅटेलाइट फोनची मदत घेतली होती. हा अनुभव ... घेऊन आता ... सॅटेलाइट ... आपत्ती ... केली जाणार ...

---

पुढारी

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ॲम्ब्युलन्स स्टेशन

### मोफत सेवा मिळणार : जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचा अभिनव उपक्रम

रायगड : पुढारी वृत्तसेवा

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अभिनव उपक्रमातून नागरिकांना रुग्णसेवेसाठीचा दिलासा मिळाला आहे. रायगड जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्ती दरम्यान नागरिकांसाठी आता ॲम्ब्युलन्स स्टेशन उभारण्यात आले आहेत. कर्जत , माणगाव , महाड आणि पोलाद पोलादपूर या चार ठिकाणी यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. या चारही ठिकाणी आपत्ती कालादरम्यान नागरिकांनी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**नागरिकांनी आरोग्य सेवेसाठी संपर्क साधण्याचे आवाहन**



**उपजिल्हा रुग्णालय कर्जत**

रुग्णवाहिका क्रमांक- एमएच-१४ सीएल ०५८८, रुग्णवाहिका- १०८, वैद्यकीय अधिकारी, डॉ.वाहीद शेख, भ्रमणध्वनी क्रमांक- ७८००९०४०५२, वाहन चालक श्री.प्रकाश देशमुख, भ्रमणध्वनी क्रमांक- ८०८०९६२२५०, रुग्णवाहिका क्रमांक- एमएच ०६ जी ००३९, रुग्णवाहिका- १०२, वाहन चालक श्री.विश्वास नागावकर, भ्रमणध्वनी क्रमांक- ७३५०७१७६४८.

अतिवृष्टी होवून पूरपरिस्थिती, दरड कोसळणे अशा प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्या ठिकाणच्या जनतेला तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हा रुग्णालय रायगड-अलिबाग यांच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालय माणगाव, कर्जत व ग्रामीण रुग्णालय महाड आणि पोलादपूर या ठिकाणी ॲम्ब्युलन्स स्टेशन तयार करण्याबाबत कल्याणकर यांनी निर्देश दिले होते, त्यानुसार उपजिल्हा रुग्णालय माणगाव, कर्जत व ग्रामीण रुग्णालय महाड आणि पोलादपूर या ठिकाणी ॲम्ब्युलन्स स्टेशन तयार /...२

Raigad Edition

---

पुढारी

# महाड-पोलादपूरमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी अत्यावश्यक बोटी तैनात

- एनडीआरएफच्या चाळीस जवानांसह सुमारे दीडशे जणांची नियुक्ती
- शासनाकडून सर्व जणांचा उतरविला विमा

महाड : श्रीकृष्ण बाळ

रायगडसह कोकणात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाकडून तसेच शासनाकडून प्राप्त झालेल्या वीस बोटींची व्यवस्था महाड पोलादपूर तालुक्यामधील विविध ठिकाणी करण्यात आल्याची माहिती महाडच्या प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी दिली आहे.

या संदर्भात पुदलवाड यांनी स्पष्ट केले की, महाड शहरातील नगरपालिका हद्दीमध्ये रमाई समाजमंदिर, वीरेश्वर मंदिर, चवदार तळे, तालुका पोलिस स्टेशन, शाळा नंबर पाच व राष्ट्रीय स्मारक येथे बोटी ठेवण्यात आल्या आहेत. या ठिकाणी सिस्केप व न.पा. चे कर्मचारी व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. याशिवाय महाड तालुक्यात राजेवाडी २, शिरगाव १, लाडवली, दासगाव, गांधारपाले १, आकले भोराव २, संवाद माटवण १, एमआयडीसी पोलिस स्टेशन १, प्रिव्ही कंपनी १, लक्ष्मी कंपनी १ आहे. याशिवाय महाडमध्ये एनडीआरएफचे पंचवीस जवान चार बोटींसह तर चार बोटींसह एकोणीस जवान पोलादपूर येथे कार्यरत ठेवण्यात आल्याचे पुदलवाड यांनी स्पष्ट केले. जिल्हा आपत्ती यंत्रणेकडून नऊ आसका लाईट महाड विभागाला प्राप्त झाले असून याशिवाय विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शासकीय नगरपालिका एनडीआरएफ याशिवाय साळुंखे रेस्क्यू टीम, सिस्केप ॲडव्हेंचर तसेच महेश सानप यांच्या खाजगी संस्थांचे स्वयंसेवक देखील या आपत्तीकाळात महाड-पोलादपूरमध्ये कार्यरत ठेवण्यात आले असून या सर्वांचा विमा शासनामार्फत काढण्यात आला असल्याचेही प्रतिमा पुदलवाड यांनी निदर्शनास आणले. नागरिकांनी शासनाच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन पुदलवाड यांनी केले आहे.

Raigad Edition
Jul 11, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

---

आपलं महानगर | my महानगर.com

# रायगड जिल्ह्यातील तहसील कार्यालयात आपत्ती नियंत्रण कक्ष

▶ अलिबाग : जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयामध्ये आपत्ती व्यवस्थापन व आपत्ती निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या घटनाबाबत सूचना देण्याकरिता तसेच अनुषंगिक माहितीसाठी तहसील कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

> प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुर्णतः सज्ज असून जिल्ह्यातील नागरिकांनी नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या दुर्घटनाबाबत सूचना देण्याकरिता तसेच अनुषंगिक माहितीसाठी या क्रमांकावर संपर्क साधून प्रशासनाला सहकार्य करावे.
> -डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड

आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी तहसील कार्यालय अलिबाग ०२१४१-२२२०५४/ ८२७५२७८२१८, पेण ०२१४३-२५२०३६/ ८४५९४८२९३७, मुरुड ०२१४४-२७४०२६/ ७०२०५७३६२०, पनवेल ०२२-२७४५२३९९/ ८३६९८९९९०२, उरण ०२२-२७२२२३५२/ ९८९२५३८४०९, कर्जत ०२१४८-२२२०३७/ ९३७३९२२९०९, खालापूर ०२१९२-२७५०४८/ ८२६२८९८७८८, तळा ०२१४०-२६९३१७/ ७०६६०६९३१७, माणगाव ०२१४०-२६२६३२/ ७४९८१९१२४४, रोहा ०२१९४-२३३२२२/ ९०२२९७०३९४, सुधागड ०२१४२-२४२६६५/ ८८३०३३३७४७, श्रीवर्धन ०२१४७-२२२२२६/ ९२८४७३०७५३/ ७२४९५७९१५८, म्हसळा ०२१४९- २३२२२४/ ८४५९७९५३२६, महाड ०२१४५-२२२१४२ /२२३७८३/ ८२६३०८६३५५, पोलादपूर ०२१९१- २४००२६/ ८९९९०६७५१० येथे संपर्क साधावा.

AaplaMahanagar Edition
Jul 6, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

# आपत्ती व्यवस्थापन

## प्रसारमाध्यमांची उत्तम साथ ...

# आपत्कालीन दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासन सज्ज

। नेरळ । प्रतिनिधी ।

आपत्कालीन घटनांवर तात्काळ कार्यवाही करता यावी आणि स्थानिकांना कमी प्रमाणात त्याची झळ बसावी आणि येथील पर्यटन सुखरूप पणे पार पडावे यासाठी माथेरान नगरपरिषदमध्ये आपत्कालीन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.दरम्यान,माथेरान गिरीस्थन नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी २४ तास हा कक्ष कार्यान्वित ठेवण्यावर भर दिला आहे.



माथेरान या डोंगरावर वसलेल्या पर्यटन स्थळावर पावसाळ्यात झाडे कोसळण्याची आणि जमिनीचे भुस्खंलन आदी संशय आणि दरडी कोसळण्याच्या घटना सतत घडत असतात. त्यात वीज वाहिन्या झाडांच्या फांद्यांसोबत जमिनीवर कोसळत असतात आणि त्यात घोड्यांचे अपघात देखील होत असतात.

माथेरानची भौगोलिक पारिस्थिती लक्षात घेऊन मान्सून आणि आपत्तीच्या काळी सर्वांना घडणाऱ्या घटनांची माहिती मिळावी आणि त्यावर तात्काळ कार्यवाही करता यावी यासाठी माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेने आपत्कालीन कक्ष कार्यान्वित केला आहे.

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेने तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखडा नुसार मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे, बंधारे बांधण्याची कामे पूर्ण झाली असून, लोकवस्तीच्या ठिकाणच्या फेवर ब्लॉक वर ब्लिचिंग पावडर मारण्यास सुरुवात केली आहे. तसेच पालिकेच्या रुग्णालयात अत्यावश्यक वस्तु, अत्यावशक औषधे यांचा पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवण्यात आला आहे.

### तात्पुरते निवारे

आपत्कालीन काळात कड्याच्या जवळ राहणाऱ्या नागरिकांना सूचना देण्यात आल्या आहेत. सतत पाऊस सुरु झाल्यास त्याभागात लोकांनी जवळील समाजमंदिर शाळा आणि कम्युनिटी सेंटर येथे त्यांच्या तात्पुरत्या निवाऱ्यांची सोय करण्याचे नियोजन पालिकेने केले आहे. माथेरानच्या जंगलात आणि परिसरात आपत्तीची परिस्थिती निर्माण झाल्यास रेस्कु टीमसाठी लागणारे अत्यावशक साहित्याची पालिकेकडे उपलब्ध होत असून ते साहित्य सह्याद्री रेस्क्यू टीमकडे देण्यात येतील असे नियोजन आपतकालीन व्यवस्थापन यांच्याकडून करण्यात आले. तर पालिकेच्या मुख्यालयात २४ तास कार्यरत असलेले कक्ष कार्यरत राहणार असून त्या ठिकाणी रात्रपाळीत काम करणारे कर्मचारी यांची नियुक्ती आठवडा आठवडा अशी जाहीर करण्यात आली आहे. त्यात आपत्काळात आवश्यकता लक्षात घेऊन टोल फ्री क्रमांक यांची माहिती शहरात प्रसारित केली जाणार असून पालिकेच्या मुख्याधिकारी यांचा मोबाईल क्रमांक आणि पालिकेचे कार्यालयीन अधीक्षक यांचे मोबाईल क्रमांक जाहीर करण्यात आले असून, त्या क्रमांकावर देखील संपर्क साधून आपत्तीची माहिती देता येणार आहे.

> माथेरानमध्ये पाऊस सतत कोसळत असेल तर नेहमी आपत्तीची स्थिती निर्माण होते. त्यासाठी आम्ही आपती व्यवस्थापन आराखडानुसार नियोजन केले असून आपण स्वतः जनतेसाठी २४ तास उपलब्ध असणार आहोत, त्याचवेळी आपतकालीन कक्ष देखील २४ तास कार्यन्वित असणार आहे. आपतीची माहिती देण्यासाठी मात्र सर्वांनी जागरूक राहुल पालिकेला सहकार्य करावे हे आवाहन करीत आहे.
>
> सुरेखा भणगे–मुख्याधिकारी

पुढारी

# आपत्ती व्यवस्थापनासाठी शेजारी जिल्ह्यांशी समन्वय

## पुणे, सातारा, रत्नागिरी,रायगड जिल्हाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक संपन्न

- शेजारी जिल्ह्यांच्या समन्वयाचा प्रथमच प्रयत्न
- आपत्ती निवारण उपाययोजना प्रभावी होणार

महाड : श्रीकृष्ण द. बाळ

[illegible]



[illegible]

या बैठकीला पुणे, सातारा, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांसह सार्वजनिक बांधकाम पाटबंधारे व संबंधित प्रमुख यंत्रणांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश होता. [illegible]

पुढारी

२ राम प्रहर गुरुवार, १४ जुलै २०२२ संमिश्र

# राज्यातील आपत्कालीन परिस्थितीवर पूर्ण लक्ष

■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती; प्रत्येक जिल्ह्याच्या संपर्कात

मुंबई : प्रतिनिधी

राज्यात पावसामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीवर पूर्ण लक्ष असून, सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क आणि समन्वय ठेवण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १३) येथे सांगितले. याबाबत राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्याशी चर्चा झाली असून त्यांना राज्यातील परिस्थितीबाबत तात्पर्यपूर्ण समन्वय ठेवण्याचे निर्देश दिल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

गुरू पौर्णिमेनिमित्त मुख्यमंत्री शिंदे यांनी आज दादर शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळावर वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले. त्यानंतर ते माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सकाळपासूनच सर्व जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बोलतो आहे. त्याचबरोबर रात्री उशिरादेखील मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्याशीही चर्चा झाली आहे. धरणांतून सोडण्यात येणारे पाणी आणि त्याबाबतच्या वेळांबाबत नागरिकांना माहिती देण्याबाबत सूचना दिल्या आहेत. एकंदरीत राज्यातील सर्व यंत्रणा सतर्क आणि सज्ज आहे.



कुठलीही दुर्घटना घडू नये असे प्रयत्न आहेत. मात्र दुर्दैवाने तशी वेळ आल्यास त्या ठिकाणी तत्काळ आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणा पोहचतील असे प्रयत्न आहेत. आतापर्यंत ज्यांना स्थलांतरित केले आहे, त्यांना जेवण तसेच आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दरम्यान, हवामान खात्याने अंदाज दिल्याप्रमाणे जुलैमध्ये पावसाने कहर केला आहे. राज्यातील विविध भागात पावसाचा जोर वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसाची बॅटिंग सुरु आहे. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात मुसळधार पाऊस कोसळणार असून काही जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, आता पुढील काही तासात महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. त्यामुळे मुंबई, कोकण, पुणे, नाशिकच्या काही भागात पावसाचा जोर आणखी वाढणार आहे. या जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या मुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या संपर्कात आहेत.

पुढारी

# आपत्तीकाळात सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे

## महाड येथील आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे निर्देष

- आ.गोगावले यांच्या प्रयत्नाने आपत्ती निवारणासाठी दीड कोटीचा निधी
- आपत्ती काळात सरकारकडून सर्वोतोपरी मदत देण्याचा आ. प्रविण दरेकर यांचा विश्वास



महाड : पुढारी वृत्तसेवा

आपत्तीकाळात आपल्या घरावरील संकट आहे असे समजून योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात यासाठी सर्व शासकिय विभाग प्रमुखांनी प्रांताधिकारी व तहसिलदार यांच्या सुचनेनुसार एकजिनसीपणाने काम करावे असे आवाहन रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी महाड येथील आढावा बैठकीत केले.

महाड पोलादपूर तालुक्यात पावसाळ्यात येणार्या आपत्ती निवारणासाठी राज्यात नवीन स्थापन झालेल्या शिंदे व फडणवीस सरकार मार्फत आ. भरत गोगावले यांच्या प्रयत्नातून दीड कोटीचा निधी मिळणार असल्याची माहिती यावेळी जिल्हाधिकारी यांनी दिली तर आ. प्रविण गोगावले यांनी आपत्ती निवारणासाठी जिल्हाधिकारी यांचे कडून राबवण्यात येणार्या नाविन्यपूर्ण योजनांचे कौतुक करीत आपत्ती काळात नवीन सरकारकडून सर्वोतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन दिले.

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आंतर जिल्हास्तरीय आपत्ती निवारणासाठी आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीला अँडीशनल जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलिस आयुक्त श्री. अतुल झेंडे, डिवायएसपी तांबे, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड आदी उपस्थित होते.

सुरुवातीस सर्व शासकिय विभागाकडून आपत्ती निवारणासाठी केलेल्या उपाय योजनांची माहिती जिल्हाधिकारी यांनी घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी आपत्ती काळात आपदग्रस्तांना तातडीने मदत पोचली जावी यासाठी महाड तालुक्यासाठी १४ सेफ हाऊस व पोलादपूर तालुक्यासाठी ५ सेफ हाऊस असतील असे सांगितले. वीज मंडळासह अन्य शासकिय विभागातील कर्मचारी यांनी आपत्ती काळात केवळ आपल्या विभागाच्या कामापुरते मर्यादीत न राहता प्रांताधिकारी यांच्या सुचनेनुसार सर्व कामे करण्याची तयारी ठेवावी असे आदेश दिले. ओरीसा येथून जिल्ह्यातील १६० कर्मचारी आपत्तीकाळात करावयाच्या कामांचे प्रशिक्षण घेऊन आले आहेत त्यापैकी ६० कर्मचारी महाड पोलादपूर मधील असून त्यांनी इतर ४०० लोकांना प्रशिक्षित केले आहे त्याचा फायदा या काळात होईल असा विश्वास कल्याणकर यांनी व्यक्त केला.

आ. प्रविण दरेकर यांनी स्थानिक पातळीवरील रेस्क्यु टिम मजबुत करण्याचा प्रयत्न करा त्यासाठी आवश्यक तो निधी शासन व सीएसआर फंडातून उपलब्ध करून दिला जाईल असे सांगत जिल्हाधिकारी कल्याणकर यांचा आपत्ती काळात काम करण्याचा पॅटर्न संपुर्ण महाराष्ट्रात गाजला जाईल असे काम करा असे आवाहन दरेकर यांनी केले.

■ यावेळी आपत्ती काळात जिल्हा प्रशासनाकडून महाड उपविभागासाठी २० बोटी प्राप्त झाल्या असून त्यातील २ बोटी महाड नगर परिषद प्रशासन, ४ बोटी सानप रेस्क्यु टीम, ४ बोटी एनडीआरएफ टीम, २ बोटी साळुंखे रेस्क्यु टिम, १ बोट राजेवाडी, १ बोट दासगांव / गांधारपाले / साहिलनगर ', १ बोट आकले / भोराव, २ बोटी पोलिस स्टेशन, २ बोटी महाड औद्योगिक वसाहती मधील प्रिव्ही ऑरगॅनिक व लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनी आणि १ बोट पोलादपूर येथील नरवीर रेस्क्यु टिम कडे असेल असे प्रांताधिकारी पुदलवाड यांनी सांगितले .

Raigad Edition
Jul 6, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ''टेहळणी दिन''

## टेहळणी दिन... जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांची अभिनव संकल्पना

### दरडप्रवण गावांमध्ये शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांनी केली टेहळणी
### आपत्ती व्यवस्थापन तयारीची झाली उजळणी...!





सध्याच्या मान्सून कालावधीमध्ये रायगड जिल्ह्याच्या दरडप्रवण भागांमध्ये नैसर्गिक आपत्तींच्या घटना घडल्यास तात्काळ मदत पोहोचविणे, स्थलांतरीत करण्यात आलेल्या निवारा केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे तसेच मागील काही दिवसांमध्ये अतिवृष्टीमुळे दरडप्रवण गावांमध्ये दरड कोसळण्याची लक्षणे आढळतात किंवा कसे याची टेहळणी करण्यासाठी तसेच तेथील नागरिकांशी संपर्क साधून अतिवृष्टीच्या वेळी सतर्क राहणे व त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी दि.१६ जुलै २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून टेहळणी दिन ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली.

त्यानुषंगाने उपवनसंरक्षक- रोहा, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी- माणगाव, श्रीवर्धन, रोहा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, तहसिलदार- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, निवासी नायब तहसिलदार- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, गटविकास अधिकारी- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत- महाड, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपविभागीय अभियंता- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपअभियंता- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, परिक्षेत्र वन अधिकारी- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, तालुका कृषी अधिकारी- महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपअभियंता, पाणीपुरवठा- महाड पोलादपूर, श्रीवर्धन म्हसळा, माणगाव, तळा, रोहा या जिल्हास्तरीय तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांनी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्याशी समन्वय साधला. यासाठी त्यांना रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसिलदार सुरेश काशिद, तहसिलदार दिप्ती देसाई, महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, महसूल व पोलीस व नगरपरिषद प्रशासनातील स्थानिक अधिकारी- कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

दरडप्रवण गावांमध्ये प्रत्यक्ष भेट देणे, तेथील नागरिकांशी संपर्क व संवाद साधणे, नागरिकांच्या सुरक्षिततेची तसेच अन्य गोष्टींची काळजी घेण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव त्यांच्या सोबत असल्याचा नागरिकांना विश्वास देणे, दरडप्रवण गावांच्या परिसराच्या टेहळणी दरम्यान आढळलेल्या विशेष बाबींचे निरीक्षण करून त्या बाबी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे, अशा विविध जबाबदाऱ्या या सर्व अधिकाऱ्यांना नेमून दिल्या होत्या.

**त्याप्रमाणे या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी मांडले, गोंडाळे (कडवेवाडी), काळभैरव नगर (नडगाव), करंजखोल, विर, मराठवाडी (विर), टोळ बु., दासगाव (भोईवाडा), कुर्ले दंडवाडी, पातेरेवाडी (आंबिवली बु.), नातोंडी (धारेचीवाडी), करंजाडी (मस्केकोंड), मोरेवाडी (शिंगरकोंड), पांगारी (मनवेधार), रावतळी (मानेची धार), कोंडीवते (नवीन), कोंडीवते (मूळ गावठाण), चांढवे खुर्द, कोथेरी जंगमवाडी, कोथेरी (तांदळेकरवाडी), कोथेरी (मूळ गावठाण), मुठवली, सव,**

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ''टेहळणी दिन''

चोचिंदे, चोचिंदे कोंड, गोठे बु., कोसबी, सापे वामणे, सोनघर, जुई बु., लोअर तुडील (नामावले कोंड), कुंथळे, रोहन, वलंग, आदिस्ते, खैरे तर्फे तुडील, ओवळे, वराठी (बौद्धवाडी), चिंभावे (बौद्धवाडी), पिंपळकोंड, आंब्याचा कोंड, मुमुर्शी गावठाण, मुमुर्शी (बौद्धवाडी), तळोशी, खर्डी, हिरकणीवाडी, परडीवाडी (गोठण), सांदोशी, हेटकर कोंड (सांदोशी), पाचाडवाडी, पुनाडेवाडी, नानेमाची / नानावाडी / वाकी बु., आड्राई, वाघेरी (आदिवासीवाडी), वाळण बु., झोळीचा कोंड, केतकीचा कोंड, वेरखोले (बिरवाडी), शेलटोली, पिंपळवाडी-शेडगेवाडी, दुधाणेवाडी, जोगळेवाडी, रुपवली-बौद्धवाडी, सुंभेकोंड, निगडे खोतवाडी, मोहोत (सुतारवाडी व भिसेवाडी), खरवली (बौद्धवाडी), भिवघर, आंबेनळी (आंबेशिवथर), बारसगाव, तळीये, माझेरी, पारमाचीवाडी, वरंध (पोकळेवाडी- कुंभारकोंड), वरंध (बौद्धवाडी), माटवण, हावरे, कालवली भोसलेवाडी, लोहारे, पाले, सडवली, धामणदिवी, चरई, बोरावळे कोंडगेकोंड, मोरसडे आडाचाकोंड, मोरसडे बालमाची, मोरसडे सडेकोंड, मोरसडे दिवाळवाडी, कुडपण बु., कुडपण खु., परसुले, चांदके, खोपड, ढवळे आदिवासीवाडी, नानेघोळ कडूवाडी व कदमवाडी, नानेघोळ गावठाण, नानेघोळ बाबरवाडी, साखर चव्हाणवाडी, साखर सुतारवाडी, साखर पेठेवाडी, गोवेले गावठाण, केवनाळे आंबेमाची, रानकडसरी चिरेखिंड, वाकण मुरावाडी, किनेश्वर, किनेश्वर पेठेवाडी, किनेश्वर शिववाडी, भोगाव येलंगेवाडी, कातळी कामतवाडी, कोंढवी, कापडे खु. रयतळवाडी, कापडे कुंभळवणे, कापडे खु. कोसमवाडी, कामथे, कामथे फौजदारवाडी, चिखली, वदघर सोनारवाडी, तुटवली, ओंबळी, कोतवाल खु. लहुळसे, रानकडसरी, दाभोळ, महाळुंगे, वाकण धामणीचीवाडी, चांभारगणी खू., हळदुळे, केवनाळे, चांदले, खांडज, नावाळे, बोरघर महादेवाचा मुरा, आडावळे बु., तुर्भेकोंड या दरडप्रवण गावांना भेट दिली.

या अधिकाऱ्यांनी तेथील ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांना दरडीची पूर्व लक्षणे, घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करून अतिवृष्टीच्या काळात सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले. त्यांना जिल्हा प्रशासनाने जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी केलेल्या तयारीची, उपलब्ध साहित्य सामुग्रीविषयीची माहिती दिली. तसेच त्यांच्याशी चर्चा करीत, त्यांच्या समस्या जाणून घेत त्यावर उपाययोजना करण्याबाबतची कार्यवाही देखील तात्काळ सुरु केली.

या टेहळणी दिनानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी पोलादपूर तालुक्यातील मौजे कुडपण, भोगाव (येलंगेवाडी) आणि कोंढवी या दरडप्रवण गावांना भेट देऊन पाहणी केली. तसेच त्यांनी मौजे तळीये येथे भेट देऊन दरडग्रस्त गावाचे पुनर्वसन होत असलेल्या कामाची पाहणी करून तेथील ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या.

जिल्हा व स्थानिक प्रशासनातील प्रत्येक अधिकारी-कर्मचारी नागरिकांची सुरक्षितता व त्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत सदैव दक्ष आहेत, ग्रामस्थांनी अतिवृष्टीच्या काळात स्वत:ची काळजी घ्यावी, प्रशासन देत असलेल्या सूचनांचे पालन करावे व कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी स्थानिक प्रशासनाशी तात्काळ साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्यावतीने या दरडप्रवण भागात टेहळणी दिनानिमित्त टेहळणी केलेल्या अधिकाऱ्यांनी येथील ग्रामस्थांना केले.





# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ‘‘टेहळणी दिन’’









टेहळणी दिनानिमित्त पोलादपूर तालुक्यात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी मौजे कुडपण, भोगाव (येलंगेवाडी) आणि कोंढवी या दरडप्रवण गावांना भेट देऊन पाहणी केली. आणि उपस्थित ग्रामस्थांना दरडीची पूर्व लक्षणे, घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करून अतिवृष्टीच्या काळात सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहनही केले. तसेच ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेत त्यावर उपाययोजना करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.





निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी मौजे तळीये येथे भेट देऊन दरडग्रस्त गावाचे पुनर्वसन होत असलेल्या कामाची पाहणी करून इतर समस्या जाणून घेतल्या.

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ''टेहळणी दिन''




महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी पोलादपूर तालुक्यातील मौजे कुडपण खु., कुडपण बु., परसुले, तुटवली, ओंबळी या दरडप्रवण गावांना भेट देवून ग्रामस्थांना दरडीची लक्षणे आणि उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले तसेच सतर्क राहून प्रशासनाच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले. यावेळी तहसिलदार दिप्ती देसाई, मंडळ अधिकारी, तलाठी, गावांचे संपर्क अधिकारी, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, माजी सरपंच, ग्रामस्थ उपस्थित होते.




टेहळणी दिनानिमित्त जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी महाड तालुक्यातील परडीवाडी आणि हिरकणीवाडी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांना नैसर्गिक आपत्तीबाबतच्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.




महाड-पोलादपूर तालुक्यांतील दरडप्रवण गावांमध्ये टेहळणी दिन राबविण्यात आला. यांतर्गत तहसिलदार प्रियंका कांबळे -आयरे आणि तळा तहसिलदार अण्णाप्पा कनशेट्टी यांनी अतिवृष्टीमुळे दरडप्रवण गावांमध्ये दरड कोसळण्याची लक्षणे आढळतात किंवा कसे याची पाहणी तसेच तेथील नागरिकांशी संवाद साधून अतिवृष्टीच्या वेळी सतर्क राहण्याच्या सूचना देत त्यांचे मनोधैर्य वाढविण्यात आले.

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत "टेहळणी दिन"

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव





टेहळणी दिनानिमित्त माणगाव उपविभागीय अधिकारी प्रशाली दिघावकर व महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी मौजे कुरले व पातेरेवाडी आंबिवली बुद्रुक येथील दरडग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अतिवृष्टीच्या काळात तेथील नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित होण्याबाबत सूचना केल्या तसेच सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले



टेहळणी दिनाच्या निमित्ताने उप अभियंता श्री.गणगणे यांनी मौजे रावतळी मानेधार येथील दरडग्रस्त गावांना भेट देत ग्रामस्थांना अतिवृष्टीमध्ये सुरक्षित राहण्याबाबत मार्गदर्शन केले.



टेहळणी दिनानिमित्त महाड तालुक्यातील चोचिंदे, चोचिंदेकोंड, मुठवली, सव येथील दरडग्रस्त भागांची श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे व तहसिलदार सचिन गोसावी यांनी पाहणी केली.





महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी पोलादपूर तालुक्यातील महादेवाचा मुरा, मोरसडे (बालमाची) या दरडप्रवण गावांना भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांना दरडीची लक्षणे, धोका व उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

# आपत्ती व्यवस्थापनांतर्गत ''टेहळणी दिन''





जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी पोलादपूर तालुक्यातील मौजे हळदुले या दरडप्रवण गावास भेट देवून तेथील नागरिकांना दरडीची लक्षणे, धोका आणि उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी तहसिलदार पोलादपूर दिप्ती देसाई, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (NDRF) पथक प्रमुख गौरव चौहान, सरपंच श्री.दळवी, तलाठी, पोलिस पाटील, कोतवाल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (NDRF) इतर कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.





जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी पोलादपूर तालुक्यातील मौजे कोसमवाडी या दरडप्रवण गावास भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांना दरडीची लक्षणे, धोका व उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.





महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी पोलादपूर तालुक्यातील मौजे किनेश्वर शिववाडी, किनेश्वर पेठवाडी, किनेश्वर वाडी या दरडप्रवण गावांना भेट दिली व तेथील ग्रामस्थांना दरडीची लक्षणे, धोका आणि उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.. यावेळी पोलादपूर तहसिलदार दिप्ती देसाई, तलाठी जया फुलवर, पोलिस पाटील, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (NDRF) पथक प्रमुख गौरव चौहान व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (NDRF) इतर कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# कातकरी उत्थान अभियानाची "सप्तसूत्री"

खालापूर तालुक्यातील खोपोली मंडळात, मौजे मिळ आदिवासीवाडी येथे कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे व खालापूर तहसिलदार आयुब तांबोली यांच्या पुढाकारातून कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जातीचे प्रमाणपत्रे, शिधापत्रिकांचे अद्यावतीकरण, उत्पन्नाचे दाखले व आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती व उपाययोजनांबाबतची माहिती देण्यात आली.





उपविभागीय अधिकारी श्री.राहुल मुंडके यांच्या मार्गदर्शनाखाली व पनवेल तहसिलदार विजय तळेकर यांच्या पुढाकारातून कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत पनवेल तालुक्यातील मौजे चावणे, खुंटल्याचा पाडा व पेरूवाडी येथे आरोग्य, विविध दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.








# कातकरी उत्थान अभियानाची "सप्तसूत्री"





पेण तालुक्यात आदिवासी कातकरी जमातीच्या विकासासाठी कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके आणि पेण प्रांत अधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली पेण तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे व पेण तालुका पुरवठा अधिकारी सुरेश थळे यांच्या पुढाकारातून पेण आदिवासी पट्ट्यातील कॅम्प क्र १–हेटवणे कामारली येथील १८६ कॅम्प क्र २– घोटे, वरसई वाशिवली येथील १६८ , कॅम्प क्र ३– बोरगाव येथील १०५ आदिवासी बांधवांना हेटवणे , वरसई, बोरगाव येथे अंत्योदय योजनेंतर्गत पिवळे रेशनकार्ड वाटप करण्यात आले.






कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली पेण तहसिलदार पेण श्रीमती स्वप्नाली डोईफोडे यांच्या हस्ते कातकरी बांधवांना जातीचा दाखला व रेशनकार्ड वाटप करण्यात आले.






कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत मौजे कडाव आदिवासीवाडी येथे ई–श्रम कार्ड नोंदणी मोहीम संपन्न. यावेळी २३० आदिवासी बांधवांची ई–श्रम कार्ड नोंदणी केली व त्यांना जात प्रमाणपत्र व रेशनकार्डचेही वाटप करण्यात आले.

# कातकरी उत्थान अभियानाची ''सप्तसूत्री''

खालापूर तालुक्यातील वावोशी मंडळात माडप ग्रामपंचायत हद्दीत माडप आदिवासी वाडी येथे तहसिलदार आयुब तांबोळी यांच्या पुढाकारातून कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले.





कातकरी उत्थान अभियान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील नेरळ–आनंदवाडी, कातकरवाडी येथे तहसिलदार विक्रम देशमुख यांच्या पुढाकारातून आदिवासी मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात जात प्रमाणपत्र वाटप, रेशन कार्ड वाटप, नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी असे विविध उपक्रम राबविण्यात आले.






खालापूर तालुक्यातील वावोशी मंडळात चिलठण हायस्कूल येथे ''महाराजस्व'' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कारणानिमित्त लागणारे विविध प्रकारचे दाखले उपलब्ध करून देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





# कातकरी उत्थान अभियानाची ''सप्तसूत्री''

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव





मुरुड तालुक्यातील मौजे घर भोईघर टेंभूर्डे आदिवासीवाडी येथे कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्री कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास मुरुड तहसिलदार गोविंद वाकडे, मुरुड गटविकास अधिकारी, आरोग्य विभाग, महसूल कर्मचारी व पंचायत समिती कर्मचारी यांच्या उपस्थितीत आदिवासी बांधवांना जातीचे दाखले, रेशन कार्ड, आरोग्य तपासणी व कोविड लसीचे डोस देण्यात आले.




जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील मौजे पोयंजे कातकरीवाडी येथे कातकरी उत्थान अभियान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




पोलादपूर तालुक्यातील रानवडी येथे स्थलांतरित केलेल्या ग्रामस्थांची तहसिलदार दिप्ती देसाई यांच्या पुढाकारातून आरोग्य तपासणी करून गरजूंवर औषधोपचार करण्यात आले. यावेळी पितळवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शिवानंद विभूते, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कातकरी उत्थान अभियानाची "सप्तसूत्री"





अतिवृष्टीमुळे उरण मधील जांभूळपाडा कातकरीवाडी येथे झोपडी कोसळून निधन झालेल्या राम कातकरी या आदिवासी बांधवाच्या कुटुंबास जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत रु.०४ लाख ५० हजार रुपयांची शासकीय मदत सुपूर्द करण्यात आली. यासाठी एकात्मिक विकास प्रकल्प पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार, नियोजन अधिकारी आनंद हेमाडे, कार्यालय अधीक्षक आनंद पाटील यांनी समन्वय साधला.



अलिबाग तालुक्यातील मौजे भेरसे, वेल्हटवाडी येथील आदिवासीवाडीतील २३ कुटुंबांना पावसामुळे त्यांच्या कच्च्या घरांचे नुकसान होऊ नये, याकरिता अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार मीनल दळवी यांच्या हस्ते प्रत्येकी ३ ताडपत्र्यांचे वाटप करण्यात आले.




महाड–पोलादपूर येथे आपत्ती व्यवस्थापनाकरिता आवश्यक असणारे साहित्य पुरविण्यात आले आहे. या साहित्यामुळे संभाव्य दरडप्रवण आणि पूरप्रवण भागात आपत्ती व्यवस्थानासाठी मदत मिळणार आहे.






कामगार उपायुक्त कार्यालय, रायगड अंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सौजन्याने महाड पंचायत समिती मधील हिंदूहृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे सभागृहात महाड, पोलादपूर व माणगाव तालुक्यातील बांधकाम व बांधकाम क्षेत्राशी निगडित कामगारांची आरोग्य तपासणी व सेफ्टी किटचे वाटप करण्यात आले.

# कातकरी उत्थान अभियानाची ''सप्तसूत्री''







जागतिक आदिवासी दिनानिमित्त रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी सामाजिक सेवा संस्थेतर्फे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचा '' कातकरी उत्थान'' अंतर्गत ''सप्तसूत्री'' च्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या विकासासाठी केलेल्या कार्याबद्दल '' आदिवासी मित्र'' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी महोदयांच्या वतीने माणगाव उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी यांनी माणगाव येथे झालेल्या कार्यक्रमास हा पुरस्कार स्विकारला.



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण या कार्यालयांतर्गत आदिवासी संघटनांनी जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात न्यूक्लिअस बजेट योजनेंतर्गत आदिवासी मत्स्य सहकारी संस्था/गटांना यांत्रिकी बोट व मत्स्य जाळी खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे, या योजनेंतर्गत एकूण १० गटांना प्रति गट रक्कम रु. ३ लाख ५० हजार अनुदान मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ८ गटांना ६०% रक्कम प्रति गट रु. २ लाख १० हजार याप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात आले. यामधून ८ गटांनी यांत्रिकी बोट खरेदी केली असून त्याचे वितरण प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव व अलिबाग तहसिलदार मीनल दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार, विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेला आणि सुधांशू शिवपूजे दिग्दर्शित व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण या कार्यालयाची निर्मिती असलेला ''सप्तसूत्री'' हा लघुपट उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आला. या लघुपटात प्रमुख भूमिकेत सुप्रसिद्ध अभिनेते भालचंद्र (भाऊ) कदम, सागर कारंडे हे आहेत. या लघुपटाच्या निर्मितीस प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार तसेच जिल्हा माहिती कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, प्रांताधिकारी प्रशांत ढगे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# कातकरी उत्थान अभियानाची "सप्तसूत्री"

## अन्..अमित कातकरीला मिळाला जातीचा दाखला..!

### जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील कातकरी उत्थान अभियानाची फलश्रुती




उरण तालुक्यातील सातघर कातकरीवाडी येथील अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याला औद्योगिक तंत्रशिक्षण संस्थेत (ITI) मध्ये प्रवेश हवा होता. परंतू त्याच्याकडे जातीचा दाखला नसल्याने त्याच्या आयटीआयमधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास तांत्रिक अडथळा येत होता. ही बाब प्रा.राजेंद्र मढवी यांना समजल्यावर त्यांनी उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आणि नायब तहसिलदार नरेश पेडवी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमितचा अर्ज स्वतः भरुन दिला. त्या अर्जावर चानजे ग्रामपंचायतीचे तलाठी तेजस चोरगे, मंडल अधिकारी श्री.भंडारी अन् आदिवासी विकास निरीक्षक श्री.पांढरे यांच्या स्वाक्षरीसह आवश्यक ते अभिप्राय घेतले.

सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून अमितचा हा अर्ज सेतू कार्यालयात ऑनलाईन प्रक्रियेसाठी सादर करण्यात आला. तेथे सेतू कार्यालयातील श्रीमती शरयू यांनी ऑनलाईन प्राथमिक कार्यवाही पूर्ण केली. तहसील कार्यालयातील लिपिक श्रीमती सोनिया आणि श्री.गिरी यांनीही अमितचा अर्ज ऑनलाईन तपासून पुढील कार्यवाहीसाठी तहसिलदार श्री.अंधारे यांच्याकडे तातडीने पाठविला.

एका विद्यार्थ्याच्या तोही कातकरी समाजातील.. त्याच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशासंबंधीची अडचण कर्तव्यतत्पर, संवेदनशील तहसिलदार श्री.भाऊसाहेब अंधारे यांनी लक्षात घेतली. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांना ''कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्रीच्या'' माध्यमातून कातकरी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यास वेळोवेळी प्रोत्साहन देत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आदिवासी बांधवांसाठी, कातकरी उत्थानासाठी तालुकास्तरावर दाखले वाटप मेळावे, आरोग्य शिबिरे, वन हक्क दाखले वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल उपविभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आलेल्या अमित कातकरीच्या अर्जास न्याय मिळाला नसता तर नवलच..

एक प्रामाणिक, कार्यतत्पर अधिकारी अशी ओळख असलेले पनवेल उपविभागीय अधिकारी श्री.मुंडके यांनीदेखील अमितच्या अर्जास तात्काळ ऑनलाईन मंजूरी देवून अमितला जातीचा दाखला मिळवून दिला.

विशेष म्हणजे ही संपूर्ण कार्यवाही फक्त एका दिवसात पूर्ण करण्यात आली. त्यामुळे अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याचा आयटीआय मधील प्रवेश सुकर झाला. हा जातीचा दाखला पनवेल उपविभागीय श्री.राहुल मुंडके यांच्या हस्ते आणि उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, आदिवासी मित्र प्रा.राजेंद्र मढवी, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांच्या उपस्थितीत अमितला देण्यात आला.

अमित अमृत कातकरी या कातकरी समाजातील विद्यार्थ्याला आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटायझेशनचा प्रभावी वापर आणि सामान्य जनतेप्रती संवेदनशिलता या सर्वांच्या संगमातून मिळालेला जातीचा दाखला हे सर्व शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी एक आदर्श आणि प्रेरणादायी उदाहरण ठरेल, यात शंकाच नाही.

# कातकरी उत्थान अभियानाची ''सप्तसूत्री''

## काही मान्यवरांच्या ''प्रतिक्रिया''

### मधुकर पाटील, कष्टकरी मुक्ती संघटना-रायगड



महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या २० टक्के आदिवासी जमातीची माणसे किमान मूलभूत सुविधांच्या अभावाने हलाखीचे जीवन जगत असताना रायगड जिल्ह्यातील ठाकूर व कातकरी जमातीच्या आदिवासींचे जीवन जगणे सुसह्य व्हावे, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रायगड जिल्ह्यातील सामाजिक संस्था व जनसंघटना तसेच विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सुरु केलेल्या आदिवासी सप्तसूत्री कार्यक्रमामुळे आदिवासींचे जटील व महत्वाचे प्रश्न सुटत आहेत. या कार्यक्रमामुळे आदिवासींना आशेचे किरण दिसू लागले आहेत.

### फादर रिचर्ड क्राड्रोस, सर्व विकासदीप, माणगाव



मी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्यामध्ये एक सामाजिक बांधिलकी आणि समर्पणाची भावना असलेली व्यक्ती पाहतो. त्यांच्याशी झालेल्या माझ्या पहिल्या संवादात मला त्यांच्यामध्ये गरिबांसाठी आणि तीही रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाज बांधवांसाठी तीव्र चिंता दिसली. त्यांनी जनतेशी केलेला संवाद, प्रशासनातील लोकसहभागाचे निमंत्रण विशेषत: सरकारी योजनांना आर्थिक शिडीच्या खालच्या स्तरावरील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कौतुकास्पद काम केले आहे. गेल्या एक वर्षात त्यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जनहितमंच आणि सर्वविकासदीप, माणगाव या आमच्या सहकारी संस्थांनी जात प्रमाणपत्रे, बी.पी.एल. शिधापत्रिका, पॅनकार्ड, आधारकार्ड, वनजमिनीच्या कागदपत्रांविषयीच्या प्रमाणपत्रांचे युद्धपातळीवर वितरण करण्यात यश मिळविले त्यांची आदिवासी बांधवांबद्दलची बांधिलकी, समर्पण आणि कळकळ यामुळेच ते शक्य झाले. ते एक दूरदर्शी, विचारवंत आणि डाउन टू अर्थ फॅसिलिटेटर आहेत.

### प्रा. राजेंद्र मढवी, उरण सामाजिक संस्था, उरण



**सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना चांगल्या सुविधा देण्याचा जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचा प्रामाणिक प्रयत्न...**

जिल्हाधिकारी कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार कार्यालय यांच्या एकत्रित प्रयत्नातून व उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हजारो कातकरी आदिवासी बांधवांना जातीचे दाखले, आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदानाचे कार्ड, घरपट्टी, बँक पास बुक अशी अनेक आवश्यक कागदपत्रे तयार करून देण्यात यश आले.

जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांचा आदिवासी समाजापोटी असलेल्या सकारात्मक दृष्टीकोनामुळेच ते शक्य झाले आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वांना हक्काचे घर मिळावे, याकरिता घरकुल योजना राबविली. आदिवासी बांधवांच्या घरी कोणीही उपाशी राहू नये, याकरिता नवीन रेशन कार्ड देवून त्यांना धान्य सुरू केले. निराधार आणि विधवा महिलांसाठी संजय गांधी निराधार योजना राबवून त्या निराधार महिलांना मदत केली. ज्या आदिवासी बांधवांच्या जमिनी इतर समाजातील लोकांनी हडप केल्या होत्या त्या जमिनी आदिवासी लोकांना परत मिळवून दिल्या. कधीही जिल्हाधिकारी कार्यालयात गेलो असता त्यांनी तातडीने आदिवासी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना तात्काळ आदेश दिले. असे जिल्हाधिकारी मिळणे हे आपल्या जिल्ह्याचे मी भाग्यच समजतो. कातकरी उत्थान अभियानांतर्गत ''सप्तसूत्री कार्यक्रम'' यशस्वी करण्यामध्ये आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव, पनवेल उपविभागीय अधिकारी श्री.राहुल मुंडके, उरण तहसिलदार श्री. भाऊसाहेब अंधारे, पनवेल तहसिलदार श्री.विजय तळेकर आणि त्यांच्या सर्व सहकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मी विशेष आभार मानतो कारण त्यांच्या मार्गदर्शनामुळे उरण सामाजिक संस्थेला आदिवासी कातकरी बंधूंचे जीवनमान उंचावणे शक्य झाले आहे. कातकरी उत्थान अभियानामुळे आदिवासी बांधवांना विविध शासकीय लाभ मिळवून देण्याच्या कामाला खूपच गती मिळाली. त्यामुळे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि इतर सर्वांचेच पुनःश्च एकदा आभार...!

# "कातकरी उत्थान अभियान"
# प्रसारमाध्यमांची उत्तम साथ ...

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## खालापूर तहसिल कार्यालयात मिशन वात्सल्य शिबीर



**दै.वादळवारा**

चौक, २४ जून (अर्जुन कदम): खालापूर तहसिलदार आयुब तांबोळी यांनी नेताजी पालकर सभागृहात मिशन वात्सल्य समितीतर्फे शासन आपल्या दारी हे शिबीर आयोजित केले होते. त्यास तालुक्यातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे आपल्या दोन्ही पालकांचे निधन होवून अनाथ ... महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता करुन त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन आपल्या दारी या संकल्पनेवर आधारित मिशन ...

या शासकीय योजनांचा लाभ प्रत्येकाने घ्यावा व तो प्रसारित करून सर्व सामान्य माणसापर्यंत पोहचवून शासनाला व लाभार्थी यांना लाभ द्यावा असे आवाहन तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले. यावेळी तालुकास्तरीय मिशन ...

## नवराष्ट्र

### खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांचे आवाहन

## योजनांचा फायदा सर्वांनी घ्या!



खोपोली, (वा.) रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र ... यांच्या मार्गदर्शनाखाली ... अभियान व कातकरी ... क्रमांतर्गत शैक्षणिक व ... मित्ताने लागणारे ... दाखले निर्गमित ... तहसीलदार आयुब ... खालापूर यांच्या ... मंडळ अधिकारी ... मत वावोशी यांच्या ... न हरिओम मंगळ ... वावोशी फाटा येथे आयोजन करण्यात आले

... शिबिरातील लोकांना ... करतांना तहसीलदार ... तांबोळी यांनी शासनाच्या ... योजनांची माहिती देतांना या ... फायदा सर्वसामान्य ... मिळावा यासाठी तहसील ... याच्या माध्यमातून अशा ... च्या शिबिराचे आयोजन ... ग्रामीण भागात ... हे.

❝ कामातील तत्परता आणि लोकांच्या कामाची काळजी बाळगणारे अधिकारी असल्यास कोणत्याही कामात अडचण निर्माण होत नाही. हे चित्र खालापूर तालुक्यात पहायला मिळत आहे, याचा अभिमान आम्हा खालापूर वासियांना वाटतो. तहसीलदार म्हणून खालापूर मध्ये कार्यरत असलेले आयुब तांबोळी यांची कामातील तत्परता पाहून तालुक्यातील जनता समाधानी आहे.

–विजय पाटील, स्थानिक नेते

### आदिवासी बांधवांचे जातीचे प्रमाणपत्र वाटप

मंडळ अधिकारी वावोशी तुषार कामत यांनी माहे जानेवारी २०२२ रोजी आपल्या कार्यक्षेत्रातील आदिवासी बांधवांना त्यांच्या जातीचे दाखले मिळावेत यासाठी शिबिराच्या माध्यमातून आदिवासी बांधवांची माहिती जमा करून त्यासाठी लागणारे अर्ज भरून घेत सर्व आदिवासी बांधवांचे जातीचे दाखले तयार करून ते फाटू नयेत यासाठी लॅमिनिशन करून आज तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान अभियान - तहसिलदार विक्रम देशमुख

**अशोक गायकवाड**

कर्जत : जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान अभियान आयोजित करण्यात आल्याची माहिती तहसिलदार विक्रम देशमुख यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार महाराजस्व अभियान, कातकरी उत्थान अभियान तसेच आदिवासी बांधवांचा विकास साधण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या सप्तसूत्री कार्यक्रमानुसार कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार विक्रम देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कर्जत तालुक्यातील मौजे कडाव आदिवासीवाडी येथे दि.२७ मे २०२२ रोजी ई-... आयोजन ... शिबिरास ... प्रमाणात ... होती. य... बांधवांचे ...



शिधापत्रिका याचे वाटप करण्यात केले. आले ...

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र ...

करण्यासाठी कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत तालुका महसूल क्षेत्रात योग्य नियोजन करण्यात आले असून त्यावर अंमल बजावणी करत आदिवासी समाजाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी कर्जत तालुका महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी सतत कार्यरत असल्याचे तहसिलदार विक्रम देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. यावेळी समता केंद्र सामाजिक शिक्षण संस्था सचिव स्मिता काळे, आदिवासी कष्टकरी संघटना पनवेल मधुकर पाटील, कडाव मंडळ अधिकारी भगवान बुरुड, तलाठी कडाव आशिष राऊत., तलाठी हुमगाव पि. पि. पवार., तलाठी पोसरी जयश्री मोरे, तलाठी भालिवडी अश्विनी भामरे, ...

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित कृषी उत्पादन निर्यातवाढ कार्यशाळेत शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन

**अशोक गायकवाड**

अलिबाग :जिल्ह्यांना निर्यात केंद्र म्हणून विकसित करून निर्यात वाढीकरिता जिल्हा निर्यात प्रचालन समिती अंतर्गत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून जिल्हा उद्योग केंद्र व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) अलिबाग येथे मार्गदर्शन कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेकरिता अपेडा (gricultural and Processed Food Products Export Development uthority) या संस्थेचे सहाय्यक संचालक प्रशांत वाघमारे, उद्योग सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे सतीश भामरे हे उपस्थित होते.



शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन जिल्हा उद्योग केंद्रामार्फत करण्यात येईल व जिल्हा निर्यात कृती आराखड्यात या गोष्टींचा समावेश करण्यात आल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे ... यांनी स्पष्ट केले.

कृषी माल निर्यातीकरिताची प्रक्रिया, जागतिक उपलब्ध बाजारपेठ निर्यात विषयक कार्यपध्दती व कृषी मालाची जागतिक स्तरावरील ...

विभागाकडील आर्थिक अनुदानासंबंधी शासकीय योजना तसेच शेतकऱ्यांनी व्यापारी पद्धतीने कृषी उत्पादन घेवून उपलब्ध बाजारपेठेचा फायदा करून घेवून स्वत:चा आर्थिक फायदा करून घ्यावा, असे आवाहन उद्योग सहसंचालक श्री. सतीश भामरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले.

उपस्थित शेतकऱ्यांना वित्तीय व्यवस्थापनाविषयी नाबार्ड चे सहाय्यक महाव्यवस्थापक प्रदीप अपसुदे व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील पांढरा कांदा उत्पादक शेतकरी व आंबा उत्पादक शेतकरी यांची मोठ्या ...

## आदिवासी ई-श्रम नोंदणी शिबीर

। कर्जत । प्रतिनिधी ।

आदिवासी उत्थान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील कडाव येथे आदिवासी ई-श्रम नोंदणी शिबीर घेण्यात आले.

समता केंद्र सामाजिक शैक्षणिक संस्था कर्जत आणि कष्टकरी मुक्ती संघटना कामगार आयुक्त कार्यालय पनवेल आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास तहसीलदार विक्रम देशमुख यांनी उपस्थित राहून आदिवासी बंधू भगिनींसोबत चर्चा केली. कष्टकरी मुक्ती संघटना मधु पाटील, समता केंद्र



(छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जत सचिव स्मिता काळे, समता केंद्र कायदेशीर सल्लागार ॲड. कादंबरी काळे, सरपंच अशोक पवार, माजी उपसभापती भीमाबाई पवार, माजी ग्रामपंचायत सदस्य किसन पवार तसेच तालुक्यातील तलाठी व मंडळ आधिकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी २३० आदिवासी बांधवांची ई-श्रमकार्ड नोंदणी करण्यात आली.

Raigad Plus Edition
Page No. 3

## ... अन् एका दिवसात मिळाला जातीचा दाखला!

### 'कातकरी उत्थान' अभियानाची 'फलश्रुती'

लोकमत न्यूज नेटवर्क

**अलिबाग :** उरण तालुक्यातील सातघर कातकरीवाडी येथील अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याला औद्योगिक तंत्रशिक्षण संस्थेमधील प्रवेश जातीचा दाखला नसल्याने अडचणीत आला होता. अखेर जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेने अमित याला एका दिवसात जातीचा दाखला मिळवून देण्यात मदत झाल्याने त्याचा प्रवेश सुकर झाला आहे. जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर याच्या संकल्पनेतील सुरू असलेल्या कातकरी उत्थान अभियानाची फलश्रुती अमितच्या रूपाने झाली आहे.

अरुण कातकरी याला औद्योगिक तंत्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश हवा होता; परंतु त्याच्याकडे जातीचा दाखला नसल्याने त्याच्या आयटीआयमधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास तांत्रिक अडथळा येत होता. ही बाब प्रा. राजेंद्र मढवी यांना समजल्यावर त्यांनी उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे आणि नायब तहसीलदार नरेश पेडवी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमितचा अर्ज स्वतः भरून दिला. त्या अर्जावर चानजे ग्रामपंचायतीचे तलाठी तेजस चोरगे, मंडल अधिकारी भंडारी अन् आदिवासी विकास निरीक्षक पांढरे यांच्या स्वाक्षरीसह आवश्यक ते अभिप्राय घेतले. सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून अमितचा हा अर्ज सेतू कार्यालयात ऑनलाईन प्रक्रियेसाठी सादर करण्यात आला. सेतू कार्यालयातून सर्व ऑनलाईन तपासून पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार अंधारे यांच्याकडे तातडीने पाठविला. पनवेल उपविभागीय अधिकारी मुंडके यांनी अमितच्या अर्जास तत्काळ ऑनलाईन मंजुरी देऊन जातीचा दाखला दिला.

विशेष म्हणजे ही संपूर्ण कार्यवाही फक्त एका दिवसात पूर्ण करण्यात आली. त्यामुळे अमितचा आयटीआयमधील प्रवेश सुकर झाला. पनवेलचे उपविभागीय राहुल मुंडके यांच्या हस्ते उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, आदिवासी मित्र प्रा. राजेंद्र मढवी, संतोष पवार यांच्या उपस्थितीत अमितला दाखला दिला.

# स्वच्छ सागर... सुरक्षित सागर ...





स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहिमेंतर्गतप्रांताधिकारी अमित शेडगे, तहसिलदार सचिन गोसावी यांच्या पुढाकारातून हरिहरेश्वर-मारळ समुद्रकिनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये श्रीवर्धन महसूल विभाग, पंचायत समिती, ग्रामपंचायत हरिहरेश्वर, हरिहरेश्वर देवस्थान ट्रस्ट, हरिहरेश्वर माध्यमिक विद्यालयांनी सहभाग घेतला.





जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहिमेंतर्गत मुरुड समुद्रकिनारी अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्या उपस्थितीत तहसिलदार रोहन शिंदे, मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या पुढाकारातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानात मुरुड महसूल विभाग, मुरुड नगरपरिषद यांनी सहभाग घेतला.



## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सागरी स्वच्छतेने साजरा

### किहीम किनाऱ्यावर विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती; काम करणाऱ्या संस्थांसह नागरिकांचा सहभाग

- प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी सांगितले स्वच्छतेचे महत्त्व
- विविध सामाजिक संस्थांचा स्वच्छता मोहिमेत सहभाग
- ज्येष्ठ नागरिकांनी घेतला स्वच्छता मोहिमेत पुढाकार

"समुद्रकिनाऱ्यांवर टाकण्यात येणारा कचरा, विशेषतः प्लास्टिकमुळे सागरी जीवनाचा नाश कसा होतो, याची माहिती देण्यात येत आहे. किनाऱ्यांवर स्वच्छता, सुशोभीकरण, वृक्ष लागवड, सूचना फलक व इतर सोयी-सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने समुद्रकिनाऱ्यांची माहिती दिली जाणार आहे. भरती-ओहोटीचे वेळापत्रक लावले जाणार आहे. समुद्रकिनाऱ्यांवरील सौंदर्य वाढवण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जाणार आहेत. त्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे.

प्रशांत ढगे, प्रांताधिकारी अलिबाग

अलिबाग : हर घर तिरंगा आणि सागर स्वच्छता अभियानांतर्गत किहीम येथील समुद्रकिनाऱ्यावर जिल्हा प्रशासन विविध सामाजिक संस्था व विद्यार्थी यांनी मिळून साफसफाई केली. (छाया : रमेश कांबळे)



## पुण्यनगरी

## किहीम समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

### दोन टन कचरा केला गोळा

**अलिबाग :** भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या सूचनेनुसार, देशभर विविध उपक्रम राबवले जात आहेत. रायगड जिल्ह्यात देखील घरोघरी तिरंगा आणि सागर स्वच्छता अभियान राबवले जात आहे. त्या अंतर्गत अलिबाग तालुक्यातील किहीम येथील समुद्रकिनारी शनिवारी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय कार्यालय अलिबाग, तहसील कार्यालय अलिबागचे कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शालेय विद्यार्थी तसेच ग्रामस्थ यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. तहसीलदार मीनल दळवी यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले. या वेळी नायब तहसीलदार अजित टोळकर, मानसी पाटील, किहीम ग्रामपंचायतीचे सदस्य, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, वडके हायस्कूलचे विद्यार्थी, माणूसकी प्रतिष्ठान, लाइफ फाऊंडेशन, लायन्स क्लब, जयहिंद फाऊंडेशन, रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते. या वेळी सुमारे २ टन कचरा गोळा करण्यात आला.

# स्वच्छ सागर... सुरक्षित सागर ...

## प्रसारमाध्यमांची उत्तम साथ...

लोकमत



मेरिटाईम विभागाकडून समुद्रकिनारी स्वच्छता करण्यात आली.

### आरावी, दिघी समुद्रकिनारा चकाचक

**बंदर विभागाकडून 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' मोहीम**

लोकमत न्यूज नेटवर्क

**दिघी :** श्रावणसरींचा आनंद लुटण्यास, आता पर्यटकांची पाऊले पुन्हा कोकणाकडे वळली आहेत. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील विकासाची दूरदृष्टी ठेवून येथील महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड व ग्रामस्थांकडून स्वछ व सुंदर समुद्रकिनारे मोहीम राबविली जात आहे.

प्लास्टिक हे पर्यावरणावर विघातक परिणाम करत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी प्रत्येक किनाऱ्यावरील ३० पेक्षा अधिक बॅग कचरा जमा करण्यात आला. या उपक्रमात मोठ्या प्रमाणात कचऱ्याची विल्हेवाट लावून श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारे प्लास्टिकमुक्त करण्यात आले.

तालुक्यातील, आरावी बीच तसेच दिघी येथील प्रवासी टर्मिनल अशा प्रमुख ठिकाणी पर्यटकांची तशीच स्थानिक प्रवाशांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. सध्या पावसाळी वाहून आलेल्या कचऱ्यामुळे अस्वच्छता पसरली आहे. त्यामुळेच स्वच्छतेसाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डामार्फत घेण्यात आलेल्या "स्वच्छ सागर, सुरक्षित सागर" या उपक्रमांतर्गत स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. चार दिवस सुरू असलेल्या स्वच्छता अभियानातून पर्यटन वाढीस आलेल्या श्रीवर्धनच्या सौंदर्यात भर पडत आहे.

समुद्रकिनाऱ्यावर होणारा प्लास्टिक व इतर कचरा त्यामुळे होणारी अस्वच्छता हे पर्यावरणासाठी धोकादायक बाब ठरत असल्याने महाराष्ट्र सागरी मंडळ, संस्था, ग्रामस्थांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. सदर मोहिमेत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डचे बंदर निरीक्षक प्रकाश गुंजाळ, राहुल धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिघी जल वाहतूक संस्थेचे कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेतला.

### स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मुरुड समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम संपन्न




अलिबाग, दि.१२ (जिमाका):- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्ह्यात दि.१२ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर आज दि.१२ ऑगस्ट २०२२ रोजी मुरुड तहसिलदार रोहन शिंदे यांच्या समन्वयातून मुरुड समुद्रकिनारा येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेत मुरुड तालुक्यातील शासकीय कार्यालये, पोलीस विभाग, एन.एस.एस, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### थळ सागरीकिनारी स्वच्छता अभियान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रांताधिकारी प्रशांत ढगे व तहसिलदार मीनल दळवी यांच्या पुढाकारातून अलिबाग तहसील कार्यालय, माणुसकी प्रतिष्ठान, लाईफ फाउंडेशन, वा. ग. रानडे हायस्कूल, थळ ग्रामपंचायत व थळ ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने थळ-चालमळा समुद्रकिनारा येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या वेळी नायब तहसीलदार अजित टोळकर यांनी स्वच्छतेबद्दल जागृत झाले पाहिजे व आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे, असे सांगितले. माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान यांनी आरोग्य व स्वच्छतेचे महत्त्व सर्व शालेय विद्यार्थ्यांना सांगत आपला परिसर, आपली शाळा, आपले घर स्वच्छ ठेवून आपण स्वतः निरोगी कसे राहावे, याबद्दल मार्गदर्शन केले. या स्वच्छता अभियानात अंदाजे ८५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. उपस्थित स्वयंसेवकांना प्लॅस्टिक मुक्तीची व वृक्ष संवर्धनाची शपथ देण्यात आली.



### प्लास्टिकमुक्त किनारा

**बंदर विभागाचा निर्धार | श्रीवर्धन तालुक्यात समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता**



। दिघी । वार्ताहर ।

पावसाळी हंगाम मध्यावर्ती येऊन ठेपला आहे. अधूनमधून बरसणाऱ्या श्रावणसरींचा आनंद लुटण्यास, आता पर्यटकांची पाउले पुन्हा कोकणाकडे वळली आहेत. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील विकासाची दूरदृष्टी ठेवून येथील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व ग्रामस्थांकडून स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारे मोहीम राबवली जात आहे.

तालुक्यातील, आरावी बीच तसेच दिघी येथील प्रवासी टर्मिनल अशा प्रमुख ठिकाणी पर्यटकांची तसेच स्थानिक प्रवाशांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. सध्या पावसाळी वाहून आलेल्या कचऱ्यामुळे अस्वच्छतेचा आपल्या पर्यावरणावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये याचा विचार करण्यात आला. स्वच्छतेसाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत घेण्यात आलेल्या 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' या उपक्रमांतर्गत स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या चार दिवस सुरू असलेल्या स्वच्छता अभियानातून पर्यटन वाढीस आलेल्या श्रीवर्धनच्या सौंदर्यात भर पडत आहे.

समुद्रकिना-यावर होणारा प्लास्टिक व इतर कचरा त्यामुळे होणारी अस्वच्छता हे पर्यावरणासाठी धोकादायक बाब ठरत असल्याने महाराष्ट्र सागरी मंडळ, संस्था, ग्रामस्थ यांच्या संयुक्तीने स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. सदर मोहिमेत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे बंदर निरीक्षक प्रकाश गुंजाळ, राहुल धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिघी जलवाहतूक संस्थेचे कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेतला. प्लास्टिक हे पर्यावरणावर विघातक परिणाम करत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी प्रत्येक किनाऱ्यावरील ३० पेक्षा अधिक बॅग कचरा जमा करण्यात आला. या उपक्रमात मोठ्या प्रमाणात कचऱ्याची विल्हेवाट लावून श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारे प्लास्टिक मुक्त करण्यात आले.

### पीरवाडी समुद्र किनारी स्वच्छता अभियान

**उरण : वार्ताहर**

जेएनपीएच्या वतीने बंदरात केंद्र सरकारच्या बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या स्वच्छ सागर, सुरक्षित सागर स्वच्छ किनारा, सुरक्षित समुद्र उपक्रमांतर्गत उरणनजीक असलेल्या पीरवाडी सागरी किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.


या मोहिमेमध्ये जेएनपीएचे सर्व विभागाध्यक्ष व कर्मचाऱ्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला. या मोहिमेद्वारे, प्लास्टिकच्या वापरामुळे आपले सागरी जीवन कसे नष्ट होत आहे, याविषयी जनजागृती करुन जनसामान्यांमध्ये स्वच्छतेसंबंधी वर्तनात्मक बदल घडवून आणणे हा मुख्य हेतू आहे.



याव्यतिरिक्त, जेएन पोर्टने आपले कर्मचारी आणि इतर टर्मिनल्सच्या अधिकाऱ्यांसाठी पर्यावरणासाठी स्वच्छ आणि सुरक्षित समुद्र किनाऱ्याचे महत्त्व पठविण्यासाठी आणि त्यासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण सत्र झाले. अभियानादरम्यान जेएनपीए कर्मचाऱ्यांनी प्लास्टिक कचऱ्याचा सागरी जीवनावर होणारा घातक परिणाम याविषयी सामाजिक संदेश देण्यासाठी पथनाट्याचे आयोजन केले होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी साधला संवाद रायगड जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन




स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमांतर्गत विविध केंद्रीय योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांशी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दि. ३० मे २०२२ रोजी संवाद साधला. रायगड जिल्ह्यात या कार्यक्रमाचे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून येथील पी.एन.पी नाट्यगृह येथे थेट प्रक्षेपण करण्यात आले.




अलिबाग येथील पी.एन.पी नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमासाठी तत्कालीन पालकमंत्री कु.आदिती तटकरे या ऑनलाईन तर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पनवेल महानगरपालिका महापौर डॉ.कविता चौतमोल, पनवेल महानगरपालिका आयुक्त डॉ.गणेश देशमुख, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अमित सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी श्याम पोशट्टी, पनवेल महानगरपालिका उपायुक्त सचिन पवार, जिल्हा परिषद सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, जलजीवन मिशनचे कार्यकारी अभियंता सुधीर वेंगुर्लेकर, तहसिलदार विशाल दौंडकर, राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, मुख्याधिकारी जीवन पाटील, अंगाई साळुंखे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक श्री.कुलकर्णी, विविध राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी तसेच इतर विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम केअर फॉर चिल्ड्रन योजनेंतर्गत अनाथ बालकांना विविध लाभ केले जारी जिल्ह्यात केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न







पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम–केअर्स फॉर चिल्ड्रन योजनेंतर्गत देशभरातील कोविड–१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांना व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे लाभ जारी करण्यात आले. यावेळी केंद्रीय महिला व बालविकास मंत्री श्रीमती स्मृती इराणी, मंत्रीपरिषदेचे इतर सदस्य आणि मुख्यमंत्री या कार्यक्रमाशी दूरदृष्यप्रणालीद्वारे जोडलेले होते.

रायगड जिल्ह्यात पंचायत राज, केंद्रीय राज्यमंत्री श्री.कपिल मोरेश्वर पाटील यांच्या हस्ते बालकांना लाभाचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अमित सानप, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अशोक पाटील, राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्राचे श्री.चिंतामणी मिश्रा व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.




कोविड–१९ मुळे अनाथ झालेल्या रायगड जिल्ह्यातल्या २६ बालकांना लाभ आणि सेवा बाबतच्या किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील रायगड येथून केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील सहभागी झाले आणि रायगड परिसरात कोविड महामारीमुळे पालक गमावलेल्या २६ अनाथ मुलांना त्यांनी मुलांसाठीच्या पीएम केअर्स लाभार्थी किट्सचे वाटप केले. यामध्ये १८ वर्षावरील ०६ तर १८ वर्षाखालील २० अनाथ बालकांचा समावेश आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## समाजाच्या राहणीमानाला उपयुक्त असे हे गाव निर्माण केले जाईल
## गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी तळीये दुर्घटनाग्रस्तांसाठी सुरू असलेल्या पुनर्वसन कामाचा घेतला आढावा





तत्कालीन गृहनिर्माण मंत्री श्री.जितेंद्र आव्हाड यांनी तळीये येथे भेट दिली. यावेळी त्यांनी तळीये दुर्घटनाग्रस्तांसाठी सुरू असलेल्या पुनर्वसन कामाचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणी दरम्यान गृहनिर्माण मंत्री श्री.आव्हाड यांनी कंटेनर घरांची पाहणी केली. तसेच पुनर्वसित गावासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या पाणी, रस्ते, वीज, वृक्षारोपण इत्यादी सुविधांचा आढावा घेतला. यावेळी तळीये दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली तसेच मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

## जिल्हा वार्षिक नियोजन निधीच्या माध्यमातून पोलीस विभागाचे बळकटीकरण
## १ स्कॉर्पिओ, १६ बोलेरो जीप व २२ मोटारसायकली रायगड पोलीस विभागाकडे सुपूर्द




जिल्हा वार्षिक नियोजनच्या निधीतून खरेदी करण्यात आलेल्या १ स्कॉर्पिओ, १६ बोलेरो जीप व २२ मोटारसायकली तत्कालीन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान, अलिबाग येथे पोलीस विभागाकडे सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी आमदार महेंद्र दळवी, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे, अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार मिनल दळवी, पोलीस विभागाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## जिल्ह्यात विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सुरू असलेली सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत – खासदार श्रीरंग बारणे




सर्वसामान्य गरजू नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणे, हा त्यांचा हक्क आहे. त्यांना हा हक्क मिळवून देणे हे शासकीय अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. यानुषंगाने जिल्ह्यात विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सुरू असलेली सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत, अशा सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्व विभागाच्या खातेप्रमुखांना केल्या.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) आढावा बैठक समिती अध्यक्ष खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.






यावेळी खासदार सुनील तटकरे, सर्वश्री आमदार भरत गोगावले, आ.रविंद्र पाटील, आ.महेंद्र थोरवे, आ.महेश बालदी, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपवनसंरक्षक (अलिबाग) आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक (रोहा) आप्पासाहेब निकत, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्यासह समिती सदस्य, विशेष निमंत्रित सदस्य व शासकीय विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यामधील आपत्ती व्यवस्थापन आराखडा आणि दरड प्रवण गावांमध्ये सुरक्षा कार्यात त्यांच्यासाठी महिलांचा सहभाग हवा – डॉ.नीलम गोऱ्हे

### कोविड काळातील एकल महिलांसाठी अधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय समिती स्थापन



अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कोरोना काळातील उपाययोजना तसेच आपत्ती व्यवस्थापन विषयावरील आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीस आमदार महेंद्र दळवी, मुंबईच्या माजी महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर, राज्य महिला आयोगाच्या सदस्या श्रीमती सुप्रदा फातरपेकर, मुंबई महानगरपालिकेतील नगरसेविका शितल म्हात्रे, किशोर जैन, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपायुक्त शिवराज पाटील, अलिबाग वनसंरक्षक आशिष ठाकरे, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव व विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

## केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा जिल्ह्यातील गरजू लाभार्थ्यांना लाभ द्यावा –राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे



अन्न धान्याच्या योजनेपासून कोणताही लाभार्थी वंचित राहू नये, म्हणून केंद्र व राज्य शासन अनेक योजना राबवित आहे. केंद्र व राज्य शासनाच्या या योजनांचा लाभ जिल्ह्यातील गरजू लाभार्थ्यांना द्यावा, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासमवेत Aepds अंतर्गत नियतन, उचल वाटपाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, सहायक पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी नितीन मंडलिक तसेच पुरवठा विभाग व जिल्हा परिषद विभागाचे इतर अधिकारी कर्मचारी, उपस्थित होते.

## मिशन ५.२५ लक्ष वृक्ष वन महोत्सवांतर्गत
## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात वृक्षलागवड मोहीम उत्साहात सुरू




कुरुळ येथील दत्त टेकडी येथे जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार सचिन शेजाळ, मीनल दळवी, महसूल व वनविभागाचे इतर अधिकारी-कर्मचारी, सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय, कुरुळ या शाळेतील शिक्षक-विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.









## इपिलेप्सी/आकडी/अपस्मार (फेफरे/फिट) आजाराविषयीच्या जनजागृती शिबिरास उत्तम प्रतिसाद
## जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि इपिलेप्सी फाउंडेशन, मुंबई चे अध्यक्ष डॉ.निर्मल सूर्या यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न





राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अलिबाग जिल्हा रुग्णालय व इपिलेप्सी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग जिल्हा रुग्णालय येथे इपिलेप्सी,आकडी,अपस्मार (फेफरे/फिट) आजाराविषयीच्या जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि इपिलेप्सी फाउंडेशन, मुंबई चे अध्यक्ष डॉ. निर्मल सूर्या यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी डॉ.सायली, पी.पी.पी कॉर्डीनेटर, एन.एच.एम, मुंबई तसेच आशिष बनसोडे, पी. पी.पी. कॉर्डीनेटर, डी.डी. ऑफिस, मुंबई यांची प्रमुख उपस्थिती होती.

## सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचा २९३ वा स्मृतीदिन अलिबाग येथे संपन्न कमांडिंग ऑफिसर कमोडोर आदित्य हाडा, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आदी मान्यवरांनी केले समाधीस्थळी अभिवादन





सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या २९३ व्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय नौदलाचे पश्चिमी क्षेत्र मुख्यालय भारतीय नौसेना पोत आंग्रे या नौदल तळाचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर आदित्य हाडा यांनी भारतीय नौदलाच्या वतीने पुष्पचक्र तर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, रघुजीराजे आंग्रे सरखेल, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंके यांच्यासह विविध मान्यवरांनी मराठा आरमाराच्या सरखेलांच्या समाधीवर पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली.

दरवर्षी दि.०४ जुलै रोजी या महान सागर वीराला अलिबाग नगरपरिषदेद्वारे अभिवादन केले जाते. या वर्षी गाज या सरखेल रघुजीराजे आंग्रे यांच्या उपक्रमांतर्गत भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करून नौदल तथा महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यात संवाद प्रस्थापित करण्याकरिता जेएसएम महाविद्यालय येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# इतर महत्वाचे

**बॉब कॅट हे बीच क्लिनिंग मशीन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आले. या मशीनमुळे जिल्ह्यातील समुद्रकिनारे स्वच्छ करण्यासाठी मदत होईल.**





या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा नियोजन अधिकारी श्री.मेहेत्रे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के –पाटील, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी श्री.पोशेट्टी , तहसिलदार विशाल दौंडकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी वि.वि.किल्लेदार, क्षेत्र अधिकारी योगेश देशमुख व अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, दीक्षा शिरसाठ, इंजिनिअर उपस्थित होते. हे मशीन सध्या अलिबाग नगरपरिषदेमार्फत वापरले जाणार आहे.



**जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी डॉ. हिम्मतराव बावस्कर यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांची सदिच्छा भेट घेतली.**






दै.पुढारी व आयटीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने करियर गाईडन्स सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी दै.पुढारीचे निवासी संपादक शशिकांत सावंत, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड.गौतम पाटील, जेएसएमचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील, आयटीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स पनवेलचे संचालक डॉ.संकल्प राव आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# इतर महत्वाचे




जिल्हा नियोजन भवन येथे तत्कालीन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक २०२२ संपन्न झाली. यावेळी कृषी विभागाच्या योजनांच्या माहिती पुस्तिकेचेही मान्यवरांच्या प्रकाशन हस्ते करण्यात आले. यावेळी खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.भालेराव, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, जिल्हा कृषी अधीक्षक श्रीमती उज्वला बाणखेले व क्षेत्रीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.





आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त केंद्रीय लोकसंपर्क ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर, महाराष्ट्र व गोवा, रायगड जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने अलिबाग येथील पोलिस कवायत मैदान येथे विशेष योग अभ्यास कार्यक्रमाचे आयोजन. यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाये, सहाय्यक प्रचार अधिकारी फणीकुमार, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या तपस्वी गोंधळी आदी मान्यवर उपस्थित होते.





०१ ऑगस्ट २०२२ रोजी महसूल दिनानिमित्त जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली व उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांच्या समन्वयातून मतदार यादी प्रमाणीकरण करण्यासाठी आधार क्रमांकाच्या माहितीबाबतचे पत्र नमुना ६(ब) चे सर्वांना वाटप करण्यात आले. यावेळी काही अधिकाऱ्यांनी हे अर्ज भरलेही.

# इतर महत्वाचे

## काम करताना एकजूटीची भावना महत्वाची
## – जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर

### महसूल दिनाच्या निमित्ताने महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा संपन्न





महसूल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांचा उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी म्हणून तर खालापूर तहसिलदार आयुब तांबोळी यांचा उत्कृष्ट तहसिलदार म्हणून गौरव करण्यात आला. याप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, स्नेहा उबाळे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार व इतर महसूल अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



















स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## महसूल दिनाच्या निमित्ताने महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा संपन्न



















# इतर महत्वाचे

## दिलीप पाटील यांची एमपीएससीत गरुडझेप कर सहाय्यक व मंत्रालय लिपिक पदाच्या पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण



जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गरुडझेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनङ्क केंद्रातील धोकवडे येथील सदस्य, माजी सैनिक दिलीप बाळकृष्ण पाटील हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या गट-क मधील कर सहाय्यक व मंत्रालय लिपिक या पदाच्या पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

श्री.दिलीप पाटील यांनी या यशाबद्दल जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे विशेष आभार मानून जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या गरुडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र व गरुडझेप ॲप या उपक्रमांचा लाभ घेण्याचे स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवाहन केले.

## ई-पिक पाहणी





महसूल दिनाचे औचित्य साधून खालापूर तालुक्यातील वावोशी मंडळात मौजे आपटी या गावी ई-पीक पाहणी अंतर्गत प्रत्यक्ष शेतावर जाऊन ई-पीक पाहणी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत संबंधित खातेदारांच्या कुटुंबातील व्यक्तीस ई-पीक पाहणी App व्दारे प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांच्याद्वारे प्रत्यक्षात ई-पीक पाहणी करण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी तुषार कामत व संबंधित तलाठी उपस्थित होते.






मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, सनियंत्रण समितीचे निर्देश व जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा चाचणी यशस्वीपणे संपन्न झाली. यावेळी मुख्याधिकारी सुरेखा भणगे, मोटर वाहन निरीक्षक चंद्रकांत माने, संजय पाटील, अजय कराळे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री.किल्लेदार, उपप्रादेशिक अधिकारी श्री.कामत, वनपरिक्षेत्र अधिकारी उमेश जंगम, सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, अधीक्षक दीक्षांत देशपांडे उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## मालदीव प्रजासत्ताकचे राष्ट्रपती इब्राहिम मोहम्मद सोलिह यांची मालदीव प्रजासत्ताकातील वरिष्ठ मान्यवरांसह भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणास भेट




यावेळी जेएनपीए चे अध्यक्ष श्री. संजय सेठी, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जेएनपीए चे उपाध्यक्ष श्री.उन्मेष शरद वाघ, नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, उपायुक्त शिवराज पाटील, उपायुक्त पुरुषोत्तम कराड, उपायुक्त रुपाली अंबुरे, प्रांताधिकारी राहुल मुंडके, तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, मुख्याधिकारी संतोष माळी व जेएनपीए चे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

## किल्ले रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन सोहळा शिवभक्तांच्या अभूतपूर्व उत्साहात संपन्न




छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन सोहळा किल्ले रायगडावर मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शिवभक्तांच्या अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाला. युवराज संभाजी राजे छत्रपती व युवराजकुमार शहाजी राजे छत्रपती यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला मंत्रोच्चारांच्या जयघोषात जलाभिषेक तसेच दुग्धाभिषेक करण्यात आला. तसेच मेघडंबरीतील शिवपुतळ्याला मुद्राभिषेक करण्यात आला.

यावेळी युवराज्ञी संयोगिताराजे, आमदार अनिकेत तटकरे, आमदार प्रमोद (राजू) पाटील, आमदार मनोज चव्हाण, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार सुरेश काशिद आदी मान्यवर उपस्थित होते.

# इतर महत्वाचे

## पेणचे गणपती आता आंतरराष्ट्रीय ब्रँड





पेण हे शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तीसाठी प्रसिद्ध असलेलं शहर. पेण शहर आणि तालुक्यात आजमितीस एक हजाराहून अधिक गणपतीच्या मूर्ती घडविण्याचे कारखाने आहेत. तब्बल एक लाखाहून अधिक व्यक्ती या व्यवसायात या ना त्या स्वरुपात जोडला गेला आहे. साहजिकच इतकी मोठी रोजगार क्षमता या व्यवसायानं निर्माण केली आहे. महाराष्ट्रातल्या गावागावात आणि घराघरात गणपतीच्या आगमनाची लगबग सुरु होते. तेव्हा पेण शहरातून गणपती बाप्पा रवाना झालेले असतात. वर्षभर इथले लोक हाच व्यवसाय करतात. वर्षभरातले ११ महिने मूर्तीकाम आणि शेवटच्या महिन्यात विक्री, असे या व्यवसायाचे स्वरुप. थोडक्यात, अकरा महिने आर्थिक गुंतवणूक, श्रम गुंतवणूक आणि शेवटच्या महिन्यात प्रत्यक्ष उलाढाल. असं गेली अनेक वर्ष सुरु आहे.





जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागामार्फत जिल्ह्यात भात शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी यंत्राद्वारे भात लागवड, नाविन्यपूर्ण पिकांच्या फळबाग लागवडीस चालना तसेच शेतकऱ्यांना परसबाग, भाजीपाला बियाणे किटचे वाटप व कृषी संजीवनी सप्ताहाचे आयोजन करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## शासनाच्या भौगोलिक मानांकन पत्रिकेमध्ये अलिबागच्या पांढरा कांद्याचा GI उत्पादन म्हणून समावेश



रायगड जिल्ह्यात १०० वर्षाच्याही आधीपासून लागवडीची परंपरा जोपासलेल्या अलिबागच्या गोड पांढरा कांद्याचा शासनाच्या भौगोलिक मानांकन पत्रिकेमध्ये समावेश करण्यात आला आहे. अलिबाग पांढरा कांदा उत्पादक संघाच्या नावाने भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. तत्कालीन पालकमंत्री कु. आदिती तटकरे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर तसेच कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे हे यश आहे. या यशामुळे अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांना आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कांद्याला देशासह जागतिक बाजारपेठेत स्थान मिळविणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्रात होणाऱ्या कांद्याच्या विविध प्रकारांपैकी अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची मोत्यासारखा पांढराशुभ्र, मोदकासारखा आकर्षक आकार, गोड चवीचा व विविध औषधी गुणधर्मांनी युक्त अशी ओळख आहे. म्हणूनच ग्राहकांकडून या कांद्याला पसंती मिळू लागली आहे.

# इतर महत्वाचे

जिल्हा उद्योग केंद्र व कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (अपेडा) यांच्या संयुक्त विद्यमाने पांढरा कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी निर्यात प्रचालन कार्यशाळेचे अलिबाग येथे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री.जी. एस.हरळय्या व इतर मान्यवर.





प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना सन २०२१-२२ अंतर्गत श्री. मंदार गायकवाड यांनी मौजे दिघोडे, ता. उरण येथे ५० मे.टन क्षमतेचा व रु. १ कोटी ५० लक्ष प्रकल्प किंमत असलेल्या बर्फ कारखान्याची उभारणी केली आहे.





## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील यशस्वी उद्योजक



उद्योजकाचे नाव - श्री. अनिकेत रविंद्र बेर्डे
पत्ता - पारीजात निवास, मुभोर्शी, ता. अलिबाग
प्रकल्प किंमत - रु. १० लक्ष ८० हजार
अनुदान रक्कम - ३ लक्ष
व्यवसाय - वजन काटा तयार करणे



उद्योजकाचे नाव - श्रीमती पौर्णिमा दिनेश सोनावणे
पत्ता - १३०२, टॉवर ३-सी, पनवेल, ता. पनवेल
प्रकल्प किंमत - रु. ४१ लक्ष
अनुदान रक्कम - १५ लक्ष १० हजार ५२६
व्यवसाय - पेपर बॅग तयार करणे




उद्योजकाचे नाव - श्रीमती अर्पिता अर्केश राणे
पत्ता - मु.पो.झिराड, गुरवआळी, ता. अलिबाग
प्रकल्प किंमत - रु. ५३ हजार २००
अनुदान रक्कम - रु. १९ हजार ६००
व्यवसाय - कॉम्प्युटर डाटा सेंटर



उद्योजकाचे नाव - शेषगोपालन श्रीनिवासन अय्यर
पत्ता - बी-३, व्यंकेटेश हेरीटेज् कॉम्प्लेक्स, पनवेल
प्रकल्प किंमत - रु. २६ लक्ष ९७ हजार १००
अनुदान रक्कम - रु. ४ लक्ष ७४ हजार ७११
व्यवसाय - खाद्य पदार्थ तयार करणे

# इतर महत्वाचे




रायगड जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिनस्त ६ पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत. त्यापैकी १ जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा अलिबाग येथे व उपविभागीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा कर्जत, पेण, माणगाव, रोहा, महाड येथे कार्यरत आहेत. अलिबाग येथील जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेच सन २०२१ मध्ये राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण (NABL) मानांकन प्राप्त झाले असून, कर्जत व पेण येथील उपविभागीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांचे राष्ट्रीय अधिस्विकृतीकरण मानांकनासाठी यावर्षी प्रस्तावित आहे.

या ६ प्रयोगशाळांमधून दरवर्षी साधारणतः १५ हजार रासायनिक व जैविक पाणी नमुने तपासले जातात. रासायनिक घटकांचे पाणी तपासणी शिबिर पावसाळ्यापूर्वी मार्च–मे मध्ये व पावसाळ्यानंतर ऑक्टोबर–डिसेंबरमध्ये तसेच जैविक पाणी तपासणी पावसाळ्यात जून–सप्टेंबर व पावसाळ्यानंतर नोव्हेंबर–फेब्रुवारी या कालावधीत केले जाते. तपासलेल्या घटकांचे विश्लेषण जलजीवन मिशन – पाणी गुणवत्ता व्यवस्थापन माहिती प्रणाली (WQMIS- Water Quality Management Information System ) या केंद्रशासनाच्या संकेतस्थळावर नोंदविले जाते. संकेतस्थळावर नोंदविण्यात आलेली माहिती जनतेस संबधित ग्रामपंचायतीमार्फ़त उपलब्ध केली जाते.

या ६ प्रयोगशाळांमध्ये शासकीय / खाजगी व विंधन विहिरीतील पाण्याचे नमुने तपासले जातात. या प्रयोगशाळेतील पाणी नमुने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संनियत्रणाखालील गटविकास अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या ग्रामस्तरावरील जलसुरक्षकांमार्फ़त पाणी नमुने गोळा करुन संबधित प्रयोगशाळेतून वेळावेळी तपासून दिले जातात. या ६ पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री. एच.एम. संगनोर व श्रीमती स्नेहा सु. घासे, रसायनी यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहेत.

जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या प्रयत्नांनी जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेच्या प्रशासकीय इमारत बाधंकामासाठी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग येथे ६ हजार चौ.फूट शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.




राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास बोर्ड, हैद्राबाद आणि मत्स्यव्यवसाय विभाग, रायगड यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मत्स्यव्यवसायाबाबत ''कौशल्य विकास कार्यशाळा'' आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमांतर्गत मौजे कोंदिवडे, ता. कर्जत येथील अनुसूचित जाती प्रवर्गातील ३० महिलांना मत्स्यसंवर्धन, माशांपासून चकली, वडा, शेव, समोसा, कोळंबी/ माशांचे लोणचे यासारखे खाद्य पदार्थ बनविणे, माशांच्या कातडीपासून शोभिवंत वस्तू बनविणे आणि शोभिवंत माशांचे मत्स्यसंवर्धन याबाबत माहिती देण्यात आली.

# इतर महत्वाचे

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाची एकनाथ शिंदे यांनी, तर उपमुख्यमंत्री पदाची देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक ३० जुलै २०२२ रोजी शपथ घेतली. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राजभवनच्या दरबार हॉलमध्ये आयोजित शपथविधी सोहळ्यात त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.





शपथविधीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दि.१४ मे २०२२ रोजी जगद्गुरू प.पू.श्री.आप्पासाहेब धर्माधिकारी यांना वाढदिवसानिमित्त रेवदंडा येथील त्यांच्या निवासस्थानी जावून शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, सचिनदादा धर्माधिकारी व राहुलदादा धर्माधिकारी उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सोशल मिडीया

## जिल्हाधिकारी कार्यालय सोशल मिडीयावर होतेय लोकप्रिय...










| समाजमाध्यम | फॉलोअर्स |
|---|---|
| ट्विटर | ७ हजार २०८ |
| फेसबुक | १६ हजार ३५३ |
| इन्स्टाग्राम | ४४७ |

@CollectorRaigad @collector.raigad @collector_raigad जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड

## नागरिकांना माहिती देण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय आहे सदैव तत्पर










| समाजमाध्यम | फॉलोअर्स |
|---|---|
| ट्विटर | ७ हजार ४२१ |
| फेसबुक | ५ हजार ५६० |
| इन्स्टाग्राम | १४२ |

रायगड जिल्ह्यातील शासकीय उपक्रमांची अधिकृत माहिती मिळविण्यासाठी आमच्या पेजला फॉलो करा.

@inforaigad @dioraigad06 dioraigad जिल्हा माहिती कार्यालय रायगड-अलिबाग

# इतर महत्वाचे



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सदिच्छा भेट घेतली



महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांची जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सदिच्छा भेट घेतली

## उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या वाड्याचे लोकार्पण





भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव असलेल्या पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील त्यांच्या नूतनीकृत वाड्याचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्वश्री आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार गणपत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा प्रशासनाच्या कामाला प्रसारमाध्यमांची भरभरुन दाद...!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पुण्य नगरी

## रायगड जिल्ह्याची जैविक भिंत होणार मजबूत

### किनारपट्टीचे होणार संरक्षण



**अलिबाग :** समुद्रातून येणारी नैसर्गिक संकटे थोपवण्याबरोबर सागरी जैवविविधतेमध्ये समतोल राखण्याचे महत्त्वाचे काम कांदळवने करतात. कांदळवनाचे हे महत्त्व ओळखून सर्वोच्च न्यायालयाने कडक कायदे अमलात आणले आहेत. मात्र, या परिसराला वनाचा दर्जा नसल्याने कायदेशीर कारवाई करता येत नव्हती. यामुळे नैसर्गिकपणे उगवलेल्या कांदळवन परिसराला खासगी वनाचा दर्जा देण्यात यावा, अशी पर्यावरणवादी सातत्याने मागणी करत होते. ड्रोनसर्व्हे, स्थळपाहणी झाल्यानंतर शासनाने रायगड जिल्ह्यातील ८८४४.२४ हेक्टर क्षेत्र कांदळवन म्हणून घोषित केले आहे. यामुळे रायगड जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यावर कांदळवनाची जैविक भिंत अधिक मजबूत होणार असून समुद्रमार्गे येणाऱ्या धोक्यापासून संरक्षण मिळणार आहे.

रायगड जिल्ह्यात खारफुटी जातीच्या झाडांनी व्यापलेले साधारण ८० हजारांहून अधिक हेक्टर इतके क्षेत्र आहे. यातील फक्त १४३६ हेक्टर इतकेच राखीव वने म्हणून संरक्षित होते. तर अन्य जमीन शेतकऱ्यांची खासगी जमीन आहे. कांदळवनाच्या संरक्षणासाठी निदान सरकारी जमीन राखीव कांदळवने म्हणून घोषित करावी, अशी मागणी अनेक वर्षे केली जात होती. कायद्यातील पळवाटांमुळे खारफुटी झाडांची तोड करून जमीन हडप करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई वन विभागाला करता येत नव्हती. त्यामुळे रायगड जिल्ह्यात कांदळवनाची कत्तल करणाऱ्या फारच थोड्या लोकांना शिक्षा झाली. आता कांदळवनाला राखीव वनाचा दर्जा मिळाल्यामुळे तोड करणाऱ्यांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल करता येणार आहे.

> टप्प्याटप्प्याने खारफुटीने व्यापलेली जमीन राखीव वने म्हणून वर्ग करण्याबाबत अधिसूचना काढण्यात येत आहेत. या वनांचा ताबा वन विभागाकडे आल्यानंतर कांदळवन संरक्षणाच्या बाबतीत असलेल्या कलमांची अंमलबजावणी करणे शक्य होईल.
>
> – समीर शिंदे, वनक्षेत्रपाल, कांदळवन कक्ष – रायगड

**अधिसूचित केलेले क्षेत्र**

पेण – ५४३.५९ (हे.आर.)
रोहा – ९०८.६५ (हे.आर.)
म्हसळा –२५५२.१९ (हे.आर.)
अलिबाग – १४११.७७ (हे.आर.)
तळा – ५५७.५१(हे.आर.)
महाड – ३८.६१(हे.आर.)
उरण – ११०६.३० (हे.आर.)
मुरुड – ५५४.२९ (हे.आर.)
श्रीवर्धन – ११३२.२० (हे.आर.)

लोकमत

## प्रेक्षणीय स्थळांना संकेतस्थळावर मान

### पर्यटन वाढीसाठी प्रशासनाचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अलिबाग :** रायगड हा पर्यटन जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. रायगडात दरवर्षी लाखो पर्यटक पर्यटनास येत असतात. त्यामुळे जिल्ह्याचा आर्थिकस्तर वाढला जात आहे. जिल्ह्यातील पर्यटनाला अजून चालना मिळावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत महत्त्वाच्या अशी प्रेक्षणीय स्थळे, समुद्रकिनारे, धार्मिक स्थळांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या फेसबुकवर प्रसिद्ध केली आहेत.

रायगड जिल्ह्यात विस्तीर्ण समुद्र किनारे, अष्टविनायकांपैकी दोन गणपती मंदिर, ऐतिहासिक गड, किल्ले, माथेरान थंड हवेचे ठिकाण, कर्नाळा पक्षी अभयारण्य, प्रेक्षणीय स्थळे असल्याने पर्यटकांची नेहमीच रेलचेल




जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले पर्यटनस्थळ.

### हिवाळी, पावसाळी पर्यटनाला वाव

धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, प्रेक्षणीय स्थळे पाहण्यास देश-विदेशातील पर्यटक येत असतात.

लोकमत

## तळियेवासीयांच्या पुनर्वसनासाठी सर्वोतोपरी पुढाकार

जिल्हा प्रशासनाकडून माहिती : वारसांना अनुदानाचे वाटप



### दरडग्रस्तांची घरे तातडीने बांधून पूर्ण करणार - गोगावले

### केवनाळे-सुतारवाडीचे पावसाळ्यानंतर पुनर्वसन



### पेज नदी-वंजारवाडी रस्ता धोकादायक

## समुद्रकिनाऱ्यांची यांत्रिक पद्धतीने स्वच्छता





आपलं सामान्य | शनिवार २३ जुलै २०२२

## निसर्गाने मारले, शासनाने तारले..



### अमित कातकरीला मिळाला जातीचा दाखला..!

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील कातकरी उत्थान अभियानाची फलश्रुती

दै.रायगड नगरी। अलिबाग

उरण तालुक्यातील सातघर कातकरीवाडी येथील अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याला औद्योगिक तंत्रशिक्षण संस्थेत (ITI) मध्ये प्रवेश हवा होता. परंतु त्याच्याकडे जातीचा दाखला नसल्याने त्याच्या आयटीआयमधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास तांत्रिक अडथळा येत होता. ही बाब प्रा.राजेंद्र मढवी यांना समजल्यावर त्यांनी उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आणि नायब तहसिलदार नरेश पेडवी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमितचा अर्ज स्वतः भरून दिला. त्या अर्जावर चानजे ग्रामपंचायतीचे तलाठी तेजस चोरगे, मंडल अधिकारी श्री.भंडारी अन् आदिवासी विकास निरीक्षक पांढरे यांच्या स्वाक्षरीसह आवश्यक ते अभिप्राय घेतले.

सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून अमितचा हा अर्ज सेतू कार्यालयात ऑनलाईन प्रक्रियेसाठी सादर करण्यात आला. तेथे सेतू कार्यालयातील श्रीमती शरयू यांनी ऑनलाईन प्राथमिक कार्यवाही पूर्ण केली. तहसील कार्यालयातील लिपिक श्रीमती सोनिया आणि श्री.गिरी यांनीही अमितचा अर्ज ऑनलाईन तपासून पुढील कार्यवाहीसाठी तहसिलदार अंधारे यांच्याकडे तातडीने पाठविला.

एका विद्यार्थ्याच्या तोही कातकरी समाजातील.. त्याच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशासंबंधीची अडचण कर्तव्यतत्पर, संवेदनशील तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी लक्षात घेतली. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांना कातकरी उत्थान अभियानांतर्गत सामसूत्रीच्या माध्यमातून कातकरी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यास वेळोवेळी प्रोत्साहन देत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आदिवासी बांधवांसाठी, कातकरी उत्थानासाठी तालुकास्तरावर दाखले वाटप मेळावे, आरोग्य शिबिरे, वन हक्क दाखले वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल उपविभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आलेल्या अमित कातकरीच्या अर्जास न्याय मिळाला नसता तर नवलच..



एक प्रामाणिक, कार्यतत्पर अधिकारी अशी ओळख असलेले पनवेल उपविभागीय अधिकारी मुंडके यांनीदेखील अमितच्या अर्जास तात्काळ ऑनलाईन मंजूरी देवून अमितला जातीचा दाखला मिळवून दिला.

विशेष म्हणजे ही संपूर्ण कार्यवाही फक्त एका दिवसात पूर्ण करण्यात आली. त्यामुळे अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याचा आयटीआय मधील प्रवेश सुकर झाला. हा जातीचा दाखला पनवेल उपविभागीय राहुल मुंडके यांच्या हस्ते आणि उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, आदिवासी मित्र प्रा.राजेंद्र मढवी, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांच्या उपस्थितीत अमितला देण्यात आला.

अमित अमृत कातकरी या कातकरी समाजातील विद्यार्थ्याला आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटायझेशनचा प्रभावी वापर आणि सामान्य जनतेप्रती संवेदनशिलता या सर्वांच्या संगमातून मिळालेला जातीचा दाखला हे सर्व शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी एक आदर्श आणि प्रेरणादायी उदाहरण ठरेल, यात शंकाच नाही.

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित कृषी उत्पादन निर्यातवाढ कार्यशाळेत शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन

अशोक गायकवाड

अलिबाग :जिल्ह्यांना निर्यात केंद्र म्हणून विकसित करून निर्यात वाढीकरिता जिल्हा निर्यात प्रचालन समिती अंतर्गत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून जिल्हा उद्योग केंद्र व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) अलिबाग येथे मार्गदर्शन कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेकरिता अपेडा (gricultural and Processed Food Products Export Development uthority) या संस्थेचे सहाय्यक संचालक प्रशांत वाघमारे, उद्योग सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे सतीश भामरे हे उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील स्थानिक साधन संपत्तीचा व भौगोलिक मानांकित चिन्ह प्राप्त अलिबागचा पांढरा कांदा व आंबा उत्पादन या घटकांचा निर्यात वाढीकरिता शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन जिल्हा उद्योग केंद्रामार्फत करण्यात येईल व जिल्हा निर्यात कृती आराखड्यात या गोष्टींचा समावेश करण्यात आल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

तसेच कृषी विभागाकडून कृषी माल निर्यातीकरिता शेतकऱ्यांना आवश्यक ते सहाय्य करण्यात येणार असल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक श्रीमती उज्वला बाणखेले यांनी स्पष्ट केले.

कृषी माल निर्यातीकरिताची प्रक्रिया, जागतिक उपलब्ध बाजारपेठ निर्यात विषयक कार्यपद्धती व कृषी मालाची जागतिक स्तरावरील प्रसिध्दी याकरिताच्या माहितीचे सादरीकरण अपेडा या संस्थेचे सहाय्यक संचालक प्रशांत वाघमारे यांच्याकडून करण्यात आले. नंतर कृषी माल निर्यातीबाबत उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन चर्चेद्वारे करण्यात आले.

कृषी प्रक्रिया उद्योग व उद्योग विभागाकडील आर्थिक अनुदानासंबंधी शासकीय योजना तसेच शेतकऱ्यांनी व्यापारी पद्धतीने कृषी उत्पादन घेवून उपलब्ध बाजारपेठेचा फायदा करून घेवून स्वतःचा आर्थिक फायदा करून घ्यावा, असे आवाहन उद्योग सहसंचालक श्री. सतीश भामरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले.

उपस्थित शेतकऱ्यांना वित्तीय व्यवस्थापनाविषयी नाबार्ड चे सहाय्यक महाव्यवस्थापक प्रदीप अपसुंदे व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील पांढरा कांदा उत्पादक शेतकरी व आंबा उत्पादक शेतकरी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.यावेळी इच्छुक शेतकऱ्यांनी कृषी माल प्रक्रिया उद्योग व निर्यात विषयक अधिक माहितीकरिता जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग या कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या यांनी केले आहे.

# जिल्हा प्रशासनाच्या कामाला प्रसारमाध्यमांची भरभरुन दाद...!

**आपलं महानगर | My महानगर.com**

## जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांना 'स्कॉच अवॉर्ड' जाहीर

### कातकरी उत्थान अभियानांतर्गत उल्लेखनीय कार्य

▶वार्ताहर : अलिबाग

रायगड जिल्ह्यातील आदिवासी कातकरी बांधवांच्या प्रगतीसाठी मागील वर्षभरात कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्रीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी राबविलेल्या उपक्रमाची 'स्कॉच अवॉर्ड्स'या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेने जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर या पुरस्काराच्या माध्यमातून घेतली आहे.

स्कॉच समूह हा १९९७ पासून सर्वसमावेशक वाढीवर लक्ष केंद्रित करून सामाजिक-आर्थिक समस्या हाताळणारा भारतातील अग्रगण्य थिंक टँक आहे. स्कॉच समूह धोरणात्मक निर्णयांमध्ये भारतीय समाज व्यवस्थेची गरज व त्यातील संदर्भ आणण्यासाठी सहकार्याची भूमिका बजावतो. त्यासोबतच फॉर्च्यून-५०० कंपन्या, सरकारी मालकीचे उद्योग, शासनाशी विविध प्रकारे संलग्न आहे. यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये क्षेत्रीय हस्तक्षेप, सल्लागार, संशोधन अहवाल, प्रभाव मूल्यांकन, धोरण संक्षिप्त, पुस्तके, जर्नल्स, कार्यशाळा



शासन, वित्त, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आणि सामाजिक क्षेत्रातील भारतातील सर्वोच्च स्वतंत्र नागरी सन्मान प्रदान करण्यात येतात.

साधारणत: मार्च २०२२ पासून सुरु झाली. दुसऱ्या टप्प्यात सादरीकरणासाठी निवड, तिसऱ्या टप्प्यात राबविलेल्या उपक्रमाच्या पडताळणीसाठी निवड, चौथ्या टप्प्यात तज्ञांचे मत, उपक्रमाची लोकप्रियता याचे गुणांकन, पाचव्या टप्प्यात आदिवासी-कातकरी बांधवांच्या समस्या, त्या सोडविण्याकरिता करण्यात आलेले उपाय, त्याचे परिणाम तसेच सप्तसूत्रीची अंमलबजावणी करताना येणारी आव्हाने, नवकल्पना व प्रतिकृती आदींचे सादरीकरण आणि शेवटच्या टप्प्यात हे सादरीकरण केल्यानंतर जवळपास ५०० हून अधिक नामांकनांमधून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील सप्तसूत्री कार्यक्रमाकरिता जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर व रायगड जिल्हा प्रशासनास जिल्हा प्रशासन या संवर्गातील रौप्यपदक जाहीर करण्यात आले. अशाप्रकारे हे अतिशय अवघड टप्पे पार पाडल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हा हे यश प्राप्त झाले आहे.

**एकत्रित विचार मंथनातून सप्तसूत्री कार्यक्रम**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर हे २४ ऑगस्ट २०२१ रोजी रायगड जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. जिल्ह्याचा अभ्यास करून येथील आदिवासी-कातकरी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रशासकीय अधिकारी, आदिवासी बांधवांसाठी काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था यांच्या एकत्रित विचार मंथनातून सप्तसूत्री कार्यक्रम आखला.

**नियोजनबद्ध उपक्रम, कार्यक्रम**

सप्तसूत्री कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने आरोग्य/बालविवाह रोखणे, कृषी विषयक योजनांची माहिती देवून अंमलबजावणी करणे, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व अभ्यासिका/ग्रंथालय, सर्व प्रकारच्या दाखल्यांचे वाटप रेशन कार्ड/आधार कार्ड वाटप, स्थलांतरण थांबविणे व रोजगार निर्मिती, वन हक्क अधिनियम २००६ ची अंमलबजावणी, याचा समावेश करण्यात आला. या सप्तसूत्रीच्या विविध नियोजनबद्ध उपक्रम, कार्यक्रम, मेळावे, शिबिरे घेण्यात आली.

## ई-रिक्षा धावली

**माथेरानमध्ये जल्लोषात स्वागत | राज्य सरकारकडून चाच[णी]**



। नेरळ । प्रतिनिधी । सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माथेरान मध्ये बुधवारी (२७ जुलै) ई-रिक्षाचे परीक्षण करण्यात आले. यामध्ये सहापैकी पाच कंपन्यांनी सहभाग घेऊन दस्तुरी नाका ते माथेरान शहर चाचणीत सहभाग घेतला.

या परीक्षणात प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आर.एस.कामत, विद्यासागर किल्लेदार, परिवहन विभागाचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी अजय कराळे, संजय पाटील तसेच डेप्युटी आरटीओ पनवेल येथील चंद्रकांत माने, नगरपालिका मुख्याधिकारी सुरेखा भणगे, महसूल माथेरान अधीक्षक दिक्षांत

»> पान २ वर




"ई रिक्षाची ही सुरुवातीची चाचणी असून आणखी चाचणी होणार आहे. आताच याबाबत निर्णय घेऊन अहवाल देणे चुकीचे ठरेल.

– अजय कराळे, आरटीओ अधिकारी

"ही रिक्षा माथेरानच्या सर्वसामान्य आ[...] विद्यार्थी यांच्या सेवेत ये[...] तो दिवस जवळ आला आहे. त्या दिवशी आम्ही दिवाळी साजरी करू आ[...] आताचा क्षण माझ्यासाठी आणि आमच्या हातरिक्षा संघटना यांच्यासाठी सुवर्ण अक्षरात लिहिण्यासारखा आहे.

– सुनील [...]
श्रमिक रिक्षा संघटना स[...]

**पुण्यनगरी**

## रायगडात होणार सव्वापाच लाख वृक्षांची लागवड

**वनविभागाचे वनमहोत्सवाअंतर्गत उद्दिष्ट**

। अलिबाग । राज्यात ७ ते १५ जुलै या कालावधीत वनमहोत्सव साजरा केला जाणार आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्यात वनविभागामार्फत ५ लाख २५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. जागतिक तापमानात होत असलेली वाढ, वातावरणात होणारे बदल, निसर्गाचे बदललेले ऋतुचक्र, अनियमित पर्जन्यमान आणि दुष्काळ या मुळे वातावरणाचा समतोल ढासळत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ७ जुलै ते १५ जुलै या कालावधीत राज्यभरात वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यात रायगड जिल्ह्यात ५ लाख २५ हजार वृक्षांचा समावेश असणार आहे.

जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, वन विभाग अलिबाग, वनविभाग रोहा आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्यासह सर्व शासकीय, निमशासकीय अस्थापना, ग्रामपंचायती या वृक्ष लागवड उपक्रमात सहभागी होणार आहेत. तीनविरा येथील वनविभागाच्या नसरीत यासाठी रोप तयार करण्यात आली आहेत. यात काजू, आंबा, कांचन, आवळा, फणस, खैर, बहावा, वड, जांभूळ, पुनई, चाफा गुलमोहर आदी वृक्षरोपांचा समावेश असणार आहे अशी माहिती अलिबागचे वन परिक्षेत्र अधिकारी आर. एच पाटील यांनी दिली. या वृक्ष लागवड कार्यक्रमात स्थानिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन वनविभागाने केले केले आहे.

"वनमहोत्सवात यावर्षी रायगड जिल्ह्यात ५ लाख २५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट वनविभागाने ठेवले आहे. त्यासाठी आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे. खड्डे खणून त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. सामाजिक संस्थांनीही या उपक्रमात मोठा सहभाग देण्याची तयारी दाखवली आहे. नागरीकांनीही वृक्ष लागवड आणि संवर्धनासाठी पुढे येण्याची गरज आहे.

–आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक, वन विभाग अलिबाग

Smart Navi Mumbai Raigad
Page No.5 July 08, 2022

**पुण्यनगरी**

## मतदार ओळखपत्रांशी आधार क्रमांक संलग्न मोहीम

**नागरिकांचा उत्तम प्रतिसाद**



। मुरुड : भारतीय निवडणूक आयोग, भारत सरकार दिल्ली व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या आदेशानुसार, १ ऑगस्ट २०२२ पासून मतदार यादीतील नोंदणीकृत मतदारांच्या मतदार ओळखपत्राशी आधारकार्ड क्रमांक संलग्न करण्याचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून नायब तहसीलदार अमित पुरी यांनी शहरातील वार्डनुसार बीएलओ यांच्या मार्फत मुरुड शहरातील नागरिकांकडून मतदार ओळखपत्राशी आधार क्रमांक संलग्न करण्याच्या मोहिमेला सुरुवात केली आहे. त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मुरुडमध्ये आयोजित या मोहिमेला बीएलओ जयेश चोडणेकर, मंडळ अधिकारी खुशाल राठोड, तलाठी रुपेश रेवसकर आदी उपस्थित होते.

निवडणूक आयोगाच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी आपल्या मतदार ओळखपत्राशी आधार क्रमांक संलग्न करण्याकरता जुनी पेठ येथे गर्दी केली होती.

या वेळी बीएलओ जयेश चोडणेकर यांनी फॉर्म नं. ६ ब विषयी मतदारांना सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले. या वेळी उपस्थिती नागरिकांचे फॉर्म नं. ६ ब भरून त्यांच्या आधारकार्डची व मतदान ओळखपत्राची झेरॉक्स प्रतीसह त्यांचे अर्ज स्वीकारण्यात आले.

# जिल्हा प्रशासनाच्या कामाला प्रसारमाध्यमांची भरभरुन दाद...!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**पुण्यनगरी**

## जिल्ह्यात ६२,८०१ जणांना उज्ज्वला गॅस जोडणी

**अलिबाग :** प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत रायगड जिल्हा प्रशासनाने प्रभावी कामगिरी केली आहे. मार्च अखेर शासनाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टाच्या ११४ टक्के काम झाले आहे. तर प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत १७ लाखांहून अधिकांना लाभ मिळाला आहे.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेमध्ये आतापर्यंत रायगड जिल्ह्यातील ६२ हजार ८०१ लाभार्थ्यांना मोफत गॅस जोडणी पुरवण्यात आलेली आहे. तसेच मार्च २०२२ अखेर रायगड जिल्ह्यासाठी १ हजार ५७० इष्टांक होता. रायगड जिल्ह्यात एकूण १ हजार ७९० नवीन गॅस जोडणी देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे रायगड जिल्ह्यात ११४ टक्के गॅस कनेक्शन पूर्ण झाले आहेत. जिल्ह्यातील गरीब कुटुंबातील सदस्यांना मोफत गॅस जोडणी देण्यात येते. त्यामुळे लाकूडतोड कमी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास थांबण्यास मदत होईल. तसेच धुराचे प्रमाण कमी झाल्याने महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार आहे.

**यंदा उद्दिष्टाच्या ११४ टक्के काम पूर्ण**

### गरीब कल्याण अन्न योजना

● प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत कोविडच्या प्रादुर्भावाच्या काळात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत येणाऱ्या अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दरमहा प्रति व्यक्ती ५ किलो अन्नधान्य मोफत दिले जाते. त्यामुळे कोरोना काळात या योजनेमुळे गरीब गरजू व्यक्तींना मोठा आधार प्राप्त झाला आहे. रायगड जिल्ह्यात १७ लाख ६७ हजार ९३१ लाभार्थ्यांना दरमहा मोफत ५ किलो अन्नधान्य मोफत देण्यात येते. ही योजना एप्रिल २०२० मध्ये सुरू झाली असून सप्टेंबर २०२२ पर्यंत कार्यरत असणार आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही रास्त भाव दुकानातून अन्नधान्य प्राप्त करून घेता येईल.

● *केंद्र शासनामार्फत सुरू असलेल्या योजनांबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मंगळवारी (दि. ३१) लाभार्थ्यांसोबत दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधणार आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा विभागामार्फत केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, एक देश एक रेशनकार्ड योजना, या योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी केली जात आहे.*

### एक देश, एक रेशनकार्ड योजना

● *भारतातील कोणत्याही राज्यातील नागरिक 'वन नेशन वन रेशन कार्ड' या योजनेद्वारे पोर्टेबिलिटीद्वारे कोणत्याही रास्त भाव धान्य दुकानातून अन्नधान्य प्राप्त करून घेऊ शकतो. रायगड जिल्ह्यात दरमहा सुमारे ९ हजार ते १० हजार लाभार्थी 'वन नेशन वन रेशन कार्ड' योजनेचा लाभ घेऊन अन्नधान्य प्राप्त करून घेत असतात, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी दिली.*

---

| मुंबई | मुंबई उपनगर | नवी मुंबई | ठाणे | रायगड | पालघर जिल्ह्यात एकाच वेळी वितरीत होणारे एकमेव दैनिक !

**बित्तंबातमी**

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत जिल्ह्यात एकूण १ लाख ७३ हजार ८९० लाभार्थींची नोंदणी– डॉ.महेंद्र कल्याणकर

**अशोक गायकवाड**

अलिबाग : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण १ लाख ७३ हजार ८९० लाभार्थ्यांनी नोंदणी केली असून पोर्टलवरील माहिती दुरुस्त करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व निवासी उपजिल्हाधिकारी (अतिरिक्त कार्यभार) श्री.सर्जेराव मस्के-पाटील यांनी केले आहे.



शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISN) योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबियांस रु.२ हजार प्रति हप्ता याप्रमाणे तीन हप्त्यांत एकूण रु.६ हजार प्रति वर्ष लाभ अनुज्ञेय आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी १) जमीन धारण करणारी संस्था, २) संविधानिक पद धारण करणारे/ केलेले आजी/माजी व्यक्ती, ३) आजी/माजी मंत्री, राज्यमंत्री, लोकसभा/राज्यसभा आजी/माजी सदस्य, विधानसभा/विधान परिषद आजी/माजी सदस्य, महानगरपालिकेचे आजी/माजी महापौर, जिल्हा परिषदेचे आजी/माजी अध्यक्ष, ४) केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थांच्या अखत्यारितील कार्यालयांमधील आणि स्वायत्त संस्थांचे सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील नियमित अधिकारी/ कर्मचारी (चतुर्थ श्रेणी/गट-ड वर्गातील कर्मचारी), ५) मागील वर्षात आयकर भरलेल्या व्यक्ती, ६) निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रु.१० हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे. (चतुर्थ श्रेणी/गट-ड वर्गातील कर्मचारी वगळून), ७) नोंदणीकृत व्यावसायिक, डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊंटंट), वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) इत्यादी क्षेत्रातील व्यक्ती पात्र असणार नाहीत. रायगड जिल्ह्यामध्ये एकूण १ लाख ७३ हजार ८९० लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत नोंदणी केली असून, माहे फेब्रुवारी २०१९ ते मार्च २०२२ या कालावधीत १० हप्त्यांमध्ये रक्कम रु.२ अब्ज ७५ कोटी २५ लाख ७० हजार लाभ वितरीत करण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यास मदत झाली आहे. पी.एम. किसान योजनेंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना पुढील एप्रिल-जुलै २०२२ या कालावधीचा लाभ प्राप्त होण्यापूर्वी e-KYC प्रमाणिकरणाची प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. त्यानुषंगाने राज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांना e-KYC करण्यासाठी OTP किंवा बायोमेट्रिक हे पर्याय उपलब्ध करून दिलेले असून, लाभार्थी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) https://pmkisan.gov.in या वेबसाईटवर OTP पध्दतीने किंवा ग्राहक सेवा केंद्र (CSC) केंद्रावर बायोमेट्रिक पध्दतीने e-KYC प्रमाणीकरण करू शकतील.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आझादी का अमृत महोत्सव वर्षांतर्गत दि.३१ मे २०२२ रोजी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISN) योजनेंतर्गत अकराव्या हप्त्याचे वितरण करण्यात येणार असून प्रधानमंत्री मोदी योजनेच्या काही निवडक लाभार्थ्यांशी दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधणार आहेत.तरी, सर्व नोंदणीकृत पात्र लाभार्थ्यांनी e-KYC प्रमाणिकरण पूर्ण करावे तसेच ज्या लाभार्थीची पी. एम. किसान पोर्टलवरील माहिती चुकीची असल्यामुळे लाभाची रक्कम प्राप्त झालेली नाही, अशा लाभार्थीनी आपले आधारकार्ड, बँक खाते पुस्तिकेची सुस्पष्ट प्रत व जमिनीच्या कागदपत्रांसह (७/१२ इत्यादी) नजीकच्या तलाठी, ग्रामसेवक किंवा कृषीसेवक यांच्याशी संपर्क साधून, पी.एम. किसान पोर्टलवरील माहिती दुरुस्त करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व निवासी उपजिल्हाधिकारी (अतिरिक्त कार्यभार) श्री.सर्जेराव मस्के-पाटील यांनी केले आहे.

---

## रायगडात एक देश एक रेशनकार्ड योजना प्रगतीपथावर

### १० हजार लाभार्थी घेतात योजनेचा लाभ; योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी

**रायगड : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र शासनामार्फत सुरु असलेल्या योजनांबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लाभार्थ्यांसोबत दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधणार आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा विभागामार्फत केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, एक देश एक रेशनकार्ड योजना, या योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी केली जात आहे. रायगड जिल्ह्यात दरमहा सुमारे ९ हजार ते १० हजार लाभार्थी वन नेशन वन रेशन कार्ड योजनेचा लाभ घे[...] अन्नधान्य प्राप्त करून घेत असतात.

**प्रधानमंत्री उज्ज्वला योजन[...]**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजने[...] जिल्ह्यातील गरीब कुटुंबाती[...]





भारतातील कोणत्याही राज्यातील नागरीक वन नेशन वन रेशन कार्ड या योजनेद्वारे पोर्टेबिलिटीद्वारे कोणत्याही रास्त भाव धान्य दुकानातून अन्नधान्य प्राप्त करून घेवू शकतो. रायगड जिल्ह्यात दरमहा सुमारे ९ हजार ते १० हजार लाभार्थी वन नेशन वन रेशन कार्ड योजनेचा लाभ घेवून अन्नधान्य प्राप्त करून घेत असतात, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी दिली आहे.

सदस्यांना मोफत गॅस जोडणी देण्यात येते. त्यामुळे लाकुडतोड कमी होवून पर्यावरणाचा ऱ्हास थांबण्यास मदत

पुरविण्यात आलेली आहे. तसेच मार्च २०२२ अखेर रायगड जिल्ह्यासाठी १ हजार ५७० इष्टांक होता. रायगड

**अन्न योजना**

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत कोविड-१९ च्या प्रादूर्भावाच्या काळात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत येणाऱ्या अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दरमहा प्रति व्यक्ती ०५ किलो अन्नधान्य मोफत दिले जाते. त्यामुळे करोना काळात या योजनेमुळे गरीब गरजू व्यक्तींना मोठा आधार प्राप्त झाला आहे. रायगड जिल्ह्यात १७ लाख ६७ हजार ९३१ लाभार्थ्यांना दरमहा मोफत ०५ किलो अन्नधान्य मोफत देण्यात येते. ही योजना माहे एप्रिल २०२०

---

## प्रधानमंत्री किसान सन्मान योजना रायगडात यशस्वी

### १ लाख ७३ हजार ८९० लाभार्थ्यांनी केली नोंदणी; शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावला

**अलिबाग : पुढारी वृत्तसेवा**

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबियांस रु.२ हजार प्रति हप्ता याप्रमाणे तीन हप्त्यांत एकूण रु.६ हजार प्रति वर्ष लाभ अनुज्ञेय आहे. रायगड जिल्ह्यामध्ये एकूण १ लाख ७३ हजार ८९० लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत नोंदणी केली असून, माहे फेब्रुवारी २०१९ ते मार्च २०२२ या कालावधीत १० हप्त्यांमध्ये रक्कम रु.२ अब्ज ७५ कोटी २५ लक्ष ७० हजार लाभ वितरीत करण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यास मदत झाली आहे.



या योजनेचा लाभ मिळण्यासाठी जमीन धारण करणारी संस्था, संविधानिक पद धारण करणारे केलेले आजी, माजी व्यक्ती, आजी, [...] राज्यसभा आजी, माजी सदस्य, विधानसभा, विधान परिषद आजी, माजी सदस्य, महानगरपालिकेचे आजी, माजी महापौर, जिल्हा परिषदेचे आजी, माजी अध्यक्ष,केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थांच्या अखत्यारितील कार्यालयांमधील आणि स्वायत्त संस्थांचे सर्व अधिकारी ,कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील [...] भरलेल्या व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रु.१० हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे. नोंदणीकृत व्यावसायिक, डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल, वास्तुशास्त्रज्ञ इत्यादी क्षेत्रातील व्यक्ती पात्र असणार नाहीत.

पी.एम. किसान योजनेंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना पुढील एप्रिल-जुलै २०२२ या कालावधीचा लाभ प्राप्त होण्यापूर्वी e-KYC प्रमाणिकरणाची [...] लाभार्थ्यांना e-KYC करण्यासाठी OTP किंवा बायोमेट्रिक हे पर्याय उपलब्ध करुन दिलेले असून, लाभार्थी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी https://pmkisan.gov.in या वेबसाईटवर ओटीपी पध्दतीने किंवा ग्राहक सेवा केंद्र केंद्रावर बायोमेट्रिक पध्दतीने e-KYC प्रमाणीकरण करु शकतील.

सर्व नोंदणीकृत पात्र लाभार्थ्यांनी e-KYC प्रमाणीकरण पूर्ण करावे तसेच ज्या लाभार्थीची पी. एम. किसान पोर्टलवरील माहिती चुकीची असल्यामुळे लाभाची रक्कम प्राप्त झालेली नाही, अशा लाभार्थीनी आपले आधारकार्ड, बँक खाते पुस्तिकेची सुस्पष्ट प्रत व जमिनीच्या कागदपत्रांसह नजीकच्या तलाठी, ग्रामसेवक किंवा कृषीसेवक यांच्याशी संपर्क साधून, पी.एम. किसान पोर्टलवरील माहिती दुरुस्त करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व निवासी उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील यांनी केले आहे.

---

**पुढारी**

## रायगड जिल्ह्यात सात हजार ३३३ घरकुलांची निर्मिती

### प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणअंतर्गत रायगडची उल्लेखनीय कामगिरी

**अलिबाग : पुढारी वृत्तसेवा**

रायगड जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणअंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली आहे. सन २०१६-१७ ते २०२१-२२ या मागील सहा वर्षात रायगड जिल्ह्यात योजनेच्या अनुदानातून सात हजार ३३३ लाभार्थ्यांनी घरकुले बांधली असून, आणखी २ हजार ४८० घरकुले बांधण्याचे काम सुरू असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक निलेश घुले यांनी दिली आहे.

जिल्हा परिषदेच्या सहकार्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या



कार्यालयामार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत शबरी आवास योजना, रमाई आवास योजना व आदिम जमाती घरकुल योजना या घरकुल योजना राबविण्यात येतात. यामधील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील भूमिहीन किंवा कच्चे घरात वास्तव्य करणाऱ्या लाभार्थ्यास घरकुलाचा लाभ देण्यात येतो.

२०१६/१७ ते २०२१/२२ या मागील सहा वर्षात रायगड जिल्ह्याला ९ हजार ८१३ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. यामधील ७ हजार ६७५ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी ७ हजार ३३३ घरकुले बांधून पूर्ण झाली असून, २ हजार ४८० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

**प्रधानमंत्री घरकुल योजना ग्रामीण दृष्टिक्षेप**

- योजनेअंतर्गत ६०% निधी केंद्र शासनाकडून व ४०% निधी राज्य शासनाकडून प्राप्त होतो.
- योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील भूमिहीन किंवा कच्चे घरात वास्तव्य करणा-या लाभार्थ्यास घरकुलाचा लाभ देण्यात येतो.
- या लाभार्थ्यांची निवड ही आर्थिक सामाजिक जात सर्वेक्षण २०११ नुसार व प्रपत्र ड नुसार प्राधान्यक्रमाने करण्यात येते.
- घरकुल बांधकामासाठी १ लाख २० हजार रुपये अनुदान स्वरूपात घरकुलाच्या प्रगतीनुसार देण्यात येते. तसेच मनरेगा अभिसरण स्वरूपात ९०/९५ दिवसाचा रोजगार अकुशल स्वरूपात जवळपास रुपये १८ हजार रुपये व शौचालय बांधकामासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रुपये १२ हजार रुपये असे एकूण १ लाख ५० हजार रुपये अनुदान देण्यात येते.

# परिवर्तन पुस्तिकेस मान्यवरांची दाद...

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव




मा. खासदार श्रीरंग बारणे



मा. खासदार सुनील तटकरे




मा. आमदार श्री. भरत गोगावले व
मा. आमदार श्री. रविंद्र पाटील



मा. आमदार श्री. महेंद्र थोरवे



मा. श्री. अशोक चव्हाण
(तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री)



मा. श्री. सुनील केदार
(तत्कालीन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय मंत्री)

## परिवर्तन पुस्तिकेस मान्यवरांची दाद...

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



**मा. श्री. विकास चंद्र रस्तोगी** (भा.प्र.से.)
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय



**मा. श्री. दीपक कपूर** (भा.प्र.से.)
अपर मुख्य सचिव तथा महासंचालक, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय



**मा. डॉ. निलमताई गोऱ्हे**
( उपसभापती, विधान परिषद)



**मा. प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे**
अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली



**मा. श्रीमती उल्का महाजन**
ज्येष्ठ समाजसेविका



आर.सी.एफ कंपनीचे कार्यकारी संचालक आर. आर. कुलकर्णी, कार्यकारी संचालक अनिरुद्ध खाडिलकर, मुख्य महाव्यवस्थापक श्रीनिवास कुलकर्णी, मुख्य व्यवस्थापक, मुंबई धनंजय खामकर, सिनियर व्यवस्थापक प्रमोद देशमुख, जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, व्यवस्थापक, मुंबई श्रीमती सुश्री शिंदे

# पर्यटन समृद्ध रायगड भ्रमंती




























# रायगड जिल्हा प्रशासनाच्या कामगिरीत मानाचा तुरा..!

## कातकरी उत्थान अभियानांतर्गत ''सप्तसूत्री'' च्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांना SKOCH अवॉर्ड जाहीर





रायगड जिल्ह्यातील आदिवासी कातकरी बांधवांच्या प्रगतीसाठी मागील वर्षभरात कातकरी उत्थान अभियानांतर्गत ''सप्तसूत्री''च्या माध्यमातून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी राबविलेल्या उपक्रमाची SKOCH अवॉर्ड्स या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेने जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर या पुरस्काराच्या माध्यमातून घेतली आहे.

SKOCH समूह हा १९९७ पासून सर्वसमावेशक वाढीवर लक्ष केंद्रित करून सामाजिक-आर्थिक समस्या हाताळणारा भारतातील अग्रगण्य थिंक टँक आहे. SKOCH समूह धोरणात्मक निर्णयांमध्ये भारतीय समाज व्यवस्थेची गरज व त्यातील संदर्भ आणण्यासाठी सहकार्याची भूमिका बजावतो. त्यासोबतच फॉर्च्यून-५०० कंपन्या, सरकारी मालकीचे उद्योग, शासनाशी विविध प्रकारे संलग्न आहे. यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये क्षेत्रीय हस्तक्षेप, सल्लागार, संशोधन अहवाल, प्रभाव मूल्यांकन, धोरण संक्षिप्त, पुस्तके, जर्नल्स, कार्यशाळा आणि परिषदांचा समावेश आहे. SKOCH समूहाकडून शासन, वित्त, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आणि सामाजिक क्षेत्रातील भारतातील सर्वोच्च स्वतंत्र नागरी सन्मान प्रदान करण्यात येतात.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर हे दि.२४ ऑगस्ट २०२१ रोजी रायगड जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. जिल्ह्याचा अभ्यास करून येथील आदिवासी-कातकरी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रशासकीय अधिकारी, आदिवासी बांधवांसाठी काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था यांच्या एकत्रित विचार मंथनातून ''सप्तसूत्री कार्यक्रम'' आखला. या सप्तसूत्री कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने आरोग्य/बालविवाह रोखण, कृषी विषयक योजनांची माहिती देवून अंमलबजावणी करण, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व अभ्यासिका/ ग्रंथालय, सर्व प्रकारच्या दाखल्यांचे वाटप रेशन कार्ड/आधार कार्ड वाटप, स्थलांतरण थांबविणे व रोजगार निर्मिती, वन हक्क अधिनियम २००६ ची अंमलबजावणी, याचा समावेश करण्यात आला. या सप्तसूत्रीच्या विविध नियोजनबद्ध उपक्रम, कार्यक्रम, मेळावे, शिबिरे घेण्यात आली.

या पुरस्कारासाठीची पहिल्या टप्प्यावरील कार्यवाही साधारणतः मार्च २०२२ पासून सुरु झाली. दुसऱ्या टप्प्यात सादरीकरणासाठी निवड, तिसऱ्या टप्प्यात राबविलेल्या उपक्रमाच्या पडताळणीसाठी निवड, चौथ्या टप्प्यात तज्ञांचे मत, उपक्रमाची लोकप्रियता याचे गुणांकन, पाचव्या टप्प्यात आदिवासी-कातकरी बांधवांच्या समस्या, त्या सोडविण्याकरिता करण्यात आलेले उपाय, त्याचे परिणाम तसेच सप्तसूत्रीची अंमलबजावणी करताना येणारी आव्हाने, नवकल्पना व प्रतिकृती आदींचे सादरीकरण आणि शेवटच्या टप्प्यात हे सादरीकरण केल्यानंतर जवळपास ५०० हून अधिक नामांकनांमधून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील ''सप्तसूत्री'' कार्यक्रमाकरिता जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर व रायगड जिल्हा प्रशासनास ''जिल्हा प्रशासन'' या संवर्गातील ''रौप्यपदक'' जाहीर करण्यात आले. अशाप्रकारे हे अतिशय अवघड टप्पे पार पाडल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हा प्रशासनाला हे यश प्राप्त झाले आहे.

# महाराष्ट्र शासन




महाराष्ट्र शासन
**रायगड जिल्हाधिकारी कार्यालय प्रकाशन**
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१.
**(केवळ अंतर्गत वितरणासाठी)**